# हरि गोविंद केळकर ह्यांचा साहित्य-संग्रह

------

१ ज्ञानोदय साप्ताहिकात प्रसिद्ध झालेले
आणि इतर लेख

२ पद्य रचना

------

## मीं बाप्तिस्म्याचे द्वारें प्रभु येशू ख्रिस्तास सर्वांसमक्ष अंगिकारलें

*ज्ञानोदय, ६ जानेवारी १८८२*

मी अल्लीबाग एथें आपल्या मामाच्या घरीं राहून तेथील सरकारी शाळेंत मराठी सहाव्या यत्तेचा अभ्यास केला. नंतर कांहीं दिवसांनीं सरकारी शाळांत बदलीचीं कामें करूं लागलों. तेव्हां आक्षी एथील सरकारी मराठी शाळेंत असिस्टंटच्या जागेवर असतां म्यां+ अल्लीबाग एथील मिशनेरी रे. मि. गणपतराव रघुनाथ नवलकर यांजपाशीं ज्यास्त पगारावर स्कूलमास्तरचें काम मागितलें, व तें मिळाल्यावर ता. १५ फेब्रुवारी सन १८८१ पासून पेण एथील नवीन मराठी फ्री चर्च मिशन स्कूलच्या मास्तरचें काम करूं लागलों. तेव्हां त्या शाळेवर असलेले उपदेशक मि. रा. बा. केसकर यांची व माझी मुळींच ओळख नसून मी कडकडीत हिंदुधर्माभिमानी ब्राह्मण व बाण्यानें वागणारा असल्यामुळें शाळेच्या कामाशिवाय त्यांचें व माझें फारसें बोलणें होत नसें, व त्यांनीं कांहीं गोष्टी सांगितल्या तर म्यां त्या तुच्छ मानाव्या. पुढें त्यांचा माझा स्नेह जडल्यावर मी त्यांशीं मित्रभावानें बोलूं लागलों. तरी मला धर्मसंबंधीं शोध करण्याची जरुरी दिसत नव्हती. परंतु परमेश्वर कृपेनें बरेच दिवसांनंतर ईश्वरी शास्त्र वाचून पाहण्याची इच्छा झाली, आणि इतर गोष्टींची भ्रांती फिटून असें वाटूं लागलें कीं, ख्रिस्ती हा एक धर्म आहे व त्यावर ज्याची श्रद्धा बसते तो ख्रिस्ती होतो. तेव्हां म्यां मनांत म्हटलें कीं, चाऱ्ही शुभवर्तमानांतील मजकूर एकसारखाच असावा, कदाचित् थोडथोड्या गोष्टी वेगळ्या असतील, परंतु सारांश हाच कीं येशु ख्रिस्ताचे चमत्कार. तेव्हां तीं सोडून मी पौल वगैरे सद्भक्तांची पत्रें वाचूं लागलों, आणि मात्थीच्या शुभवर्तमानाच्या पांचव्या, सहाव्या व सातव्या अध्यायांतील नीति वाचूं लागलों. तेव्हां ख्रिस्ती शास्त्राची नीति फार चांगली जाणून त्याच्या विरुद्ध बोलण्याचें धैर्य होईना.

नंतर कांहीं दिवसांनीं हिंदु लोकांनीं मानिलेले मंत्रतंत्र, भुतें, चेटकें वगैरे हीं जर खरीं असतील तर मात्र हिंदु शास्त्र ईश्वरदत्त आहे असें मानिलें पाहिजे, असें जाणून त्यांच्या शोधामागें लागलों. परंतु मि. केसकर यांनीं सुचविलें कीं, तुम्ही सत्याचा शोध करा म्हणजे सर्व लबाड्या एकदम समजतील. जगांतील सर्व लबाड्या शोधूं लागला तर सर्व आयुष्य पुरणार नाहीं. परंतु हें सांगणें त्यांच्या स्वार्थाचें आहे असें मला वाटलें. शोध करूं लागलों तेव्हां मंत्रक्रिया सर्वच मिथ्या आहे किंवा काय ते बरोबर समजेना. तरी इकडे पवित्र आत्म्याची टोंचणी मजवर चालली होती. मि. केसकर यांनीं सांगितलें कीं, परमेश्वरास गुरु करून व आग्रहानें विनंति करून शोध कराल, तर सर्व खऱ्या गोष्टी समजतील. त्यावरून मी तसें करूं लागलों. रे. बाबा पदमनजी यांनीं 'श्री येशु ख्रिस्त कृत शांतिकल्याणकारक सुसंवाद' या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे त्याच्या प्रारंभीं हे अमोलिक शब्द दृष्टीस पडले, 'जो कोणी हीं आशीर्वचनें लक्ष लावून वाचील त्यास ख्रिस्ताची सत्सुखाची कल्पना इतरांच्या कल्पनेहून किती भिन्न आहे हें दिसून येईल.' हें वाचून म्यां मनांत निश्चय केला कीं, मी हें पुस्तक फार मन लावून वाचीन. त्याप्रमाणें तें वाचल्यानंतर ख्रिस्तावर माझा विश्वास बसण्याचें कार्य झालें. परंतु असें वाटलें की, ख्रिस्ती शास्त्र ईश्वरदत्त आहे, परंतु काय करावें हें सुचेना. इकडे आमच्या चालींतील मित्रांशीं याविषयीं उघडपणें बोलल्यावाचून राहवेना, तरी दोन्हीं शास्त्रांपासून निराळाच राहून असे.

नंतर एका इस्राएल मित्राकडून 'यहूदी व ख्रिस्ती यांच्या धर्मसंबंधीं मतभेदांविषयीं विचार' या नांवाचें पुस्तक मला वाचावयास मिळालें. त्यावरून ख्रिस्तावर माझा विश्वास दृढ बसला. मला वाटतें कीं, तें पुस्तक पूर्वीं वाचलें नसतें तर इतक्या लवकर असा विश्वास बसला नसता. हें प्रभूकडूनच झालें. नंतर माझीं धर्मसंबंधीं मतें बदललीं आहेत असें सर्व लोकांत व मि. केसकर यांजपाशीं मी स्पष्टपणें बोलूं लागलों. तेव्हां त्यांनीं मला

---

+ 'मी'ची तृतीया

विचारलें कीं, तुम्हांस तुमच्या पापांची क्षमा झाली आहे असा अनुभव आला काय? तेव्हां म्यां म्हटलें, नाहीं. त्याच दिवशीं संध्याकाळीं नदीवर जाऊन आम्ही उभयतांनीं प्रभूची प्रार्थना केली. त्याच्या दुसऱ्या दिवशीं मी 'सिद्धांत रत्नमाला' नांवाचें पुस्तक वाचीत आपल्या बिऱ्हाडीं खोलींत बसलों असतां पापक्षमेचा अनुभव आला. नंतर एका विद्वान इस्राएल मित्राकडे माझ्या एका हिंदु मित्रानें नेलें त्याच्याशीं या गोष्टी बोलतां ख्रिस्ती असल्याप्रमाणें बोलणें झालें आणि जुन्या करारांत मशिहाविषयीं जीं भविष्यें आहेत त्यांचीहि चांगली माहिती झाली. तरी मी आपल्या बिऱ्हाडींच जेवीत होतों. शेवटीं बाप्तिस्मा होण्याचे दिवसापूर्वी म्हणजे रविवार ता. २५ डिसेंबर १८८१ रोजाच्या पूर्वी एक दोन दिवस मि. केसकर यांच्या घरीं जेवूं लागलों. 'ईश्वरी भक्तांस सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात' या शास्त्रवचनाचा त्या दिवशीं पूर्ण अनुभव आला कारण त्या दिवशीं रात्रीं मजवर, मजला पूर्वी न समजलेलें असें एक मोठें अरिष्ट आपोआप टळलें. म्हणून मी प्रभूचे फार उपकार मानतो. असो.

वर लिहिल्याप्रमाणें रविवारीं मराठी फ्री चर्च मिशन स्कुलांत सायंकाळीं माझा व मि. रा. बा. केसकर यांचें लहान लेंकरूं ज्याचें नांव मोशे शांतवन ठेविलें त्याचा बाप्तिस्मा रे. मेकिकन साहेब यांनीं ख्रिस्ताच्या आज्ञेप्रमाणें केला. त्यावेळीं सर्व जातीची व धर्माची मिळून सुमारें दोन हजारापर्यंत मनुष्यें जमलीं होतीं, असा माझा अजमास आहे. तसेंच त्यावेळीं मशारनिल्हे* रे. मेकिकन साहेब व रे. गणपतराव रघुनाथ नवलकर व मिस्तर रामभाऊ केसकर व त्यांचें कुटुंबाचीं सर्व माणसें इतकी ख्रिस्ती मंडळी होती. त्यावेळीं रे. गणपतराव व रे. मेकिकन या उभयतांनीं मराठींत अंतःकरणाची शुद्धता, ख्रिस्ती होणारास कोणते अधिकार प्राप्त होतात, परमेश्वर इच्छेनेंच मनुष्य ख्रिस्ताकडे वळतो वगैरे विषयांवर भाषणें केलीं. नंतर मी बाप्तिस्म्याचें द्वारें प्रभु येशु ख्रिस्तास सर्वांसमक्ष अंगिकारलें. मी सर्व ख्रिस्ती भावां-बहिणींस विनंति करतों कीं, म्यां विश्वासांत स्थिर असावें म्हणून मजसाठीं प्रार्थना करा. पेण, ता. ३१ डिसेंबर १८८१ इ.

------------

* उपरिनिर्दिष्ट

## खऱ्या एकेश्वर मताचा वास्तविक उद्गम
## हिंदु धर्म आहे कीं ख्रिस्ती धर्म?

*ज्ञानोदय, २७ ऑगस्ट १८८५*

कित्येक दिवसांमागें आपल्या पत्रांतून व सुबोधपत्रिकेंतून एकेश्वर मताच्या उद्गमाविषयीं बराच वादविवाद चालला होता हें सर्वांस महशूर आहेच. आमचे विद्वान ख्रिस्ती बंधु रे. निळकंठशास्त्री गोरे यांचें 'एकेश्वर मत ख्रिस्ती धर्माविषयीं कळत नाहीं व कळण्याजोगें नाहीं' हें जें म्हणणें त्याजवर पत्रिकाकर्त्यांनीं अनेक आक्षेप काढून बरीच चर्चा केली आहे, व एकेश्वर मत 'आम्हांस आमच्याच (हिंदु) धर्मग्रंथांत सांपडलें' असें प्रतिपादन केलें आहे, व रामदासकृत दासबोधांतून एक उताराहि दिला आहे. त्या त्यांच्या लेखास आमच्या एका विद्वान ख्रिस्ती बंधूनें ज्ञानोदयांतून उत्तर दिलेंच आहे. पण पुन्हां त्याच गोष्टीविषयीं कांहीं लिहावेंसें वाटल्यावरून चार ओळी लिहितो त्याजकडे आमच्या एकेश्वरी बंधूंनीं लक्ष्य द्यावें अशी त्यांस विनंती आहे.

आमच्या या अष्टागर प्रांतांत गीता, भारत, भागवत वगैरे संस्कृत ग्रंथ वाचून त्यांचा अर्थ समजणारे बरेच गृहस्थ आहेत, व त्यांस 'सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणंव्रज' इत्याद्यनेक पूर्वोक्त ग्रंथांतील वाक्येंहि मुखोद्गत आहेत. तसेंच दासबोध वाचणारे दासानुयायीहि बरेच आहेत व तुकारामाचे अभंग मुखपाठ करून नित्य भजनाच्या वेळीं ते म्हणणारेहि बरेच आहेत. त्या गृहस्थांची त्या त्या ग्रंथांच्या ईश्वरप्राणिततत्वावर पूर्ण श्रद्धाहि आहे, आणि त्यांतील वाचनांचा त्यांस अर्थहि समजतो. असें असून ज्या पूर्वोक्त ग्रंथाच्या व्यासंगानें आमच्या ह्या पाश्चिमात्य विद्येनें प्रकाशित झालेल्या विद्वान बांधवांस एकेश्वर मताची प्रेरणा होती, त्याच ग्रंथाच्या या भाविक वाचकांस व श्रोत्यांस ती स्फूर्ति कां बरें होत नाहीं? देव ३३ कोटी आहेत, जातिभेद ईश्वरकृत आहे, मूर्ति ईश्वर आहे ह्या व अशाच प्रकारच्या कोट्यावधि भ्रामक मतांचे अज्ञान पडलेल्यांच्या नेत्रांवरून कां बरें दूर होत नाहीं? याचें कारण तरी काय? याचें कारण दुसरें काय असावयाचें आहे? याचें कारण एकच आहे व ते ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेचेंहि एक सबल प्रमाण आहे. तें हें कीं, आमच्या या प्रांतबंधूंस पाश्चिमात्य विद्येचा गंधहि नसून ख्रिस्ती धर्मसिद्धांताच्या माहितीच्या नांवानें भोपळ्याएवढें शून्य असतें. हेच वर लिहिलेले ग्रंथ म्हणजे एकेश्वरी लोकांसच वाचतां येत नाहींत असें नाहीं. त्यांस मात्र त्यांचा अर्थ समजतो आणि यांस समजत नाहीं असेंहि नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांच्याविषयीं एक गोष्ट आहे ती ही कीं, जशी एकेश्वरी लोकांची त्या ग्रंथाच्या ईश्वरप्रणीततत्वावर श्रद्धा नाहीं तशी यांची गोष्ट नसून त्या ग्रंथांच्या ईश्वरप्रणीततत्वावर आमच्या प्रांतस्थांचा दृढ विश्वास आहे. असें असूनहि त्यांस एकेश्वर मत कळत नाही याचें कारण काय? उत्तर पुन्हां तेंच मिळतें कीं, ख्रिस्ती धर्मपरायणविद्य ग्रंथ यांच्या वाचनांत तर नाहींत पण स्वप्नांतहि आलेले नाहींत. तेव्हां शास्त्रीबोवांचें म्हणणें खरें ठरत नाहीं काय?

आज ही गोष्ट माझ्या मनांत येण्यास श्रावण महिना कारण झाला. या श्रावण महिन्यांत मूर्तिपूजेच्या अत्याचाराचे जितके प्रकार पाहण्यांत येतात, तितके दुसऱ्या कोणत्याहि महिन्यांत येत नाहींत. प्रत्येक दिवशीं निरनिराळ्या दैवतांची पूजा. एकादे वेळीं तर असें होतें कीं, एकाच दिवशीं दोन तीन दैवतें घरीं येऊन बसतात, आणि जर कां त्याच दिवशीं श्राद्ध तिथें आलीं तर मग काय विचारतां? 'उर्ध्वाये दिशे ब्रह्मणेनमः' असें होऊन यजमानाची व यजमानपत्नीची एकच धांदल होऊन जाते.

ह्या गोष्टी एकेश्वरी लोक पाहत नसतील काय? नसतील कशा? ह्या गोष्टी ते पाहतात इतकेंच नाहीं तर त्या त्यांच्या अंतःकरणांस लगटून राहिलेल्या आहेत. पण त्यांचा काय उपयोग? थीओडोर पार्कर यांच्यासारख्या ख्रिस्ती धर्म विरोधी पाश्चिमात्य विद्वानांच्या ग्रंथाभ्यासानें ज्यांचीं मनें ख्रिस्ती धर्माविषयीं व पापक्षमेच्या

अगत्याविषयीं शिथिल झालेलीं आहेत, ख्रिस्ती धर्माची होत असलेली वृद्धि पाहून ज्यांच्या पायांची आग मस्तकास जाऊन पोंचली आहे व खिस्ती धर्माकडून एकेश्वरी मत कळतें असें कबुल केल्यास आपणांकडे लघुत्व येतें अशी कोपर्निकस, गालिलिओ वगैरे ज्योतिष्यांच्या वेळच्या युरोपस्थ लोकांच्यासारखी समजूत होऊन ज्यांची हृदयें व्यर्थाभिमानानें भरलीं आहेत, अशा आमच्या एकेश्वरी बंधूंस 'हिंदु धर्मग्रंथावरून नव्हे पण ख्रिस्ती धर्मग्रंथावरूनच एकेश्वरी मत कळतें व कळलें' हें कबुल करवत नाहीं. एवढेंच काय तें, तर त्यांस आम्हां ख्रिस्ती लोकांचा निरुपाय आहे. अशास कितीहि प्रमाणें दिलीं तरी तीं निरर्थकच होणारीं, पण मी पुन्हां एकदां द्विरुक्ति करतो कीं, एकेश्वर मत ख्रिस्ती धर्माविना पूर्णपणें कधींच समजावयाचें नाहीं व हें एकेश्वर मतानुयायांनाहि प्रांजलबुद्धीनें कबुल करावें अशी माझी त्यांस विनंती आहे.

हा विषय माझ्यानें एथेंच पुरा करवत नाहीं. एकेश्वरी मत ख्रिस्ती धर्म प्रकाशानें कळलें, इतकें त्यांनीं मान्य केलें म्हणजे त्यांची इतिकर्तव्यता झाली असें नाहीं. तर ज्या एकाच शास्त्रावरून एकेश्वर मत स्पष्टपणें दिसून येतें त्यांत 'देव त्र्येक आहे' इत्यादि मानव बुद्धीस दुर्गम अशा कित्येक गूढ गोष्टी जरी असल्या तरी त्यांसच ईश्वरास प्रगट करणारें व ईश्वरोक्त शास्त्र असें मानिलेंच पाहिजे, आणि त्यांत प्रकट केलेला जो खरा देव त्याचें भजन त्यांतच प्रकट केलेल्या मार्गानें केलें पाहिजे. 'जग ज्ञानानें देवाला जाणत नाहीं.' 'बाप कोण आहे हें पुत्रावांचून व ज्याच्याजवळ प्रकट करावयास पुत्राची इच्छा असेल त्यावांचून कोणाला ठाऊक नाहीं.' अल्लिबाग, ता. १५-८-१८८५.

------------

## महदन्तर

*ज्ञानोदय, २ सप्टेंबर १८८६*

गेल्या जुलै महिन्याच्या २४ व्या तारखेच्या बॉम्बे गार्डियन पत्रांत एली लक्ष्मण लोखंडे जालनेकर यांच्या 'शिशु-तुल्य' विश्वासाविषयीं कोणी गृहस्थाने प्रसिद्ध केलेलें पत्र माझ्या पहाण्यांत आलें. त्यावरून जे एक दोन विचार सुचले ते कसें तरी वेड्या वाकड्या रीतीनें लिहून आपणाकडे पाठविले आहेत. कृपा करून आपण आपल्या पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

जसें ख्रिस्तभक्त लक्ष्मण याच्या घरीं एके दिवशीं पुष्कळ पाहुणे आले तसेंच प्रसिद्ध रामभक्त कबीर यांच्या घरीं एके दिवशीं पुष्कळ बैरागी पाहुणें आले होते. जसें लक्ष्मणापाशीं त्यांच्यापुढें ठेवण्यास 'एक भाकरीचा तुकडा'सुद्धां नव्हता तसेंच कबीर याच्या घरांत एक भाजीचें पानही नव्हतें. जसा लक्ष्मणास 'आता काय करावें' म्हणून विचार पडला होता तसाच कबीरासही पडला होता. पण लक्ष्मणानें आपल्यावरचा प्रसंग कसा टाळला? आपल्या पूर्वजांच्या संप्रदायाप्रमाणें कोणा मनुष्यांस मारून नागवून व त्याचें द्रव्य हरण करून त्यानें प्रसंग साजरा केला काय? नाहीं. तो म्हणाला, 'माझें धर्मांतर होण्यापूर्वी जर तसा प्रसंग मजवर येता तर मी बाजारांहून आपल्या गांवाकडे जाणाऱ्यांतून एखाद्यास लुटलें असतें. आम्ही आमच्या जातीचे लोक काळोखांत एखाद्या आड जागीं दडून बसतो आणि रस्त्यानें जाणाऱ्या लोकांस एकाएकीं गाठून आम्ही आपल्या सोट्याच्या उपट्या घालून त्यांस बेशुद्ध करितो. नंतर त्याच्याजवळ असेल नसेल तें लुबाडून घेतो. पण माझ्यानें आतां तसें करवत नाहीं.' ज्या ख्रिस्ती उपदेशकास तो ही गोष्ट सांगत होता त्यानें विचारलें, 'तर त्वां+ काय केलें?' लक्ष्मणानें म्हटलें, 'मी आपल्या खोपटीच्या एका कोपऱ्यांत जाऊन गुढगे टेकून साहाय्यार्थ परमेश्वराची प्रार्थना केली. मी बोललों, हे प्रभो, मजवर प्रसंग आला आहे हें तूं जाणतोस. माझ्या घरीं पाहुणे तर पुष्कळ आले आहेत आणि त्यांपुढें ठेवण्यास मजजवळ एक भाकरीचा तुकडा नाहीं. चोरी तर माझ्यानें आतां करवणार नाहीं, कारण त्वां माझ्या मनाचा पालट करून त्यांतून चोरी करण्याची इच्छा काढून टाकिली आहेस. हे देवा, तूं माझी सामुग्री करशील तर मी त्यांस जेऊं घालीन, नाहीं तर त्यांच्यापुढें पदर पसरून त्यांची माफी मागेन. मी म्हणेन कीं माझ्या घरांत अन्न नाहीं यास्तव आपणां सर्वांसच उपाशीं रहाणें भाग आहे. पण परमेश्वरानें माझी प्रार्थना तुच्छ मानिली नाहीं. प्रार्थना झाल्यावर मी घरून निघालों व चावडीवर आपलें नित्याचें जागल्याचें काम करावयास गेलों व उतारूकडून लवकरच मला एक ओंजळभर ढबू पैसे मिळाले. मी ताबडतोब त्या पैशांचे दाणे विकत घेतले. माझ्या बायकोनें ते दळून त्यांच्या भाकरी केल्या व आम्ही पाहुण्यांस जेऊं घातलें.'

पण कबीरानें काय केलें? तो म्हणाला, इतक्या साधूंचे पाय आपल्या घरीं लागले हा आपणास एक अलभ्य लाभ झाला. त्यांस विन्मुख तर घालवितां येत नाहीं. घरांत तर अन्न नाहीं. तर काय करावें? त्यानें परमेश्वराची प्रार्थना केली काय? कांहीं होवो, कसाही प्रसंग असो, अनन्वित कृत्य दोषार्हच, म्हणून तें करूं नयें हें त्याच्या मनांत तरी आलें काय? नाहीं, गरीब बापडा त्यानें चोरी तर केलीच पण वरती आपल्या पोटच्या गोळ्याचा खूनही केला. व अशा अयोग्य रीतीनें आणलेल्या पदार्थांचा परिपाक करून साधूंस जेऊं घातलें. बायकोनें 'कमाल कोठें आहे?' म्हणून विचारलें तेव्हां त्यानें लबाडी केली. तरी ज्यानें चोरी, पोटच्या मुलाचा खून व लबाडी केली त्यावर 'धर्मसंस्थापना करण्यास अवतार केलेला' राम प्रसन्न झाला!

---

+ 'तू'ची तृतीया

लक्ष्मण लोखंडे यानें धर्मांतर केलें होतें. त्यानें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला होता. त्यापासून त्यास काय लाभ झाला? त्यास हा लाभ झाला कीं, 'त्याच्यांतून सर्व दुर्वासना निघून गेल्या.' व परमेश्वराच्या आज्ञा त्यास प्रियकर वाटूं लागल्या.

कबीरानेंही धर्मांतर केलें होतें. पंतांनीं म्हटलें आहेः-

माया हे संसृतिची जाळूनि सशोक तो कवी रमला
रामपदाब्जा अलिसा बहुमत समुदोक तो कबीर मला
- सन्मणिमाला

पण कबीरास त्याच्या नव्या धर्मापासून काय लाभ झाला? मानवी स्वाभाविक पापवासना त्याच्या मनांतून निघून गेली काय? असें दिसत तर नाहीं.

लक्ष्मण ख्रिस्ताची भक्ति मनोभावानें करूं लागल्यापासून त्याच्या दुर्वृत्तींनीं पलायन केलें. पण कबीर रामाची भक्ति एकनिष्ठपणें करीत असतांही त्याच्या मनावर दुर्वृत्तीचें साम्राज्य चालत होतें ह्या गोष्टीचें इंगित काय, व लक्ष्मण आणि कबीर यांच्या आचरणांत एवढें जमीन अस्मानाचें अंतर का? हा प्रश्न विचारणीय आहे. या गोष्टीचा प्रार्थनासमाजिस्ट विचार करतील काय?

------------

## हा खरोखर देवाचा पुत्र होता

*ज्ञानोदय, २२ डिसेंबर १८८७, १२ जानेवारी १८८८*

प्रसिद्ध नेपोलियन बोनापार्ट यानें मरणाच्यापूर्वी येशू खरोखर अमानुष* पुरुष होता असें कबूल केलें व ज्यांनीं ज्यांनीं म्हणून येशू ख्रिस्ताच्या दिव्य आचरणाचा विचार केला आहे त्यांची अशीच खात्री झाल्याची शेंकडों उदाहरणें सापडतील. फार तर काय पण ईश्वराचें अस्तित्वच अमान्य करणाऱ्या अशा कित्येक विद्वान नास्तिकांचीही त्याच्या अमानुषतेविषयीं खात्री झाली आहे. एक नास्तिक पंडीत म्हणतो कीं, 'जर साक्रेतिसाचें वर्तन आणि मरण हीं देवासारखीं आहेत तर ख्रिस्ताचें वर्तन आणि मरण हीं देवासारखीं आहेत.' तोच ग्रंथकार असेंही म्हणतो कीं, 'मेरीच्या पुत्राची साप्रोनिकसेच्या पुत्राशीं तुलना करणें हें केवढें अंधत्वाचें व दुराग्रहाचें कर्म आहे बरें!'

आतां अशा नास्तिकांची ख्रिस्ताच्या देवत्वाविषयीं खात्री व्हावी, आणि ईश्वराचें अस्तित्व मानणारे व सर्व गोष्टी समदृष्टीनें पहाण्याचा बाणा मिरविणारे आमचे विद्वान प्रार्थनासमाजिष्ट मित्र व त्यांचे अनुयायी यांची येशूच्या अमानुषतेविषयीं व देवत्वाविषयीं खात्री होऊं नये व त्यांनीं त्यास राममोहनराय, बाबू केशव चंद्र सेन, तुकाराम, थिओडोर पारकर, महंमद यांच्या किंवा या सारख्यांच्या पंक्तीस बसवावें ही केवढी दुःखाची व आश्चर्याची गोष्ट आहे बरें!

येशू हा खरोखर देवाचा पुत्र होता हें सिद्ध करण्यास अनेक प्रमाणें देतां येतील. पण सर्वांत बलवत्तर प्रमाण म्हटलें म्हणजे त्याची निष्पापता हेंच होय.

वेदोक्त, पुराणोक्त, शास्त्रोक्त, नित्यनैमित्तिक कर्में व अनुष्टानें केल्यावर तीं ज्यांस समर्पण करावयाची असा जो देवकी पुत्र कृष्ण, किंवा ज्यास आमच्या प्रार्थनासमाजिष्ट मित्रांनीं 'देव अवतार घेत नाहीं' असें स्वमुखानें म्हणत असतां व तें आपल्या स्वयंकृत ब्रह्मसंहितेंत रजिष्टरही केलें असतां केवळ अवतीर्ण देवच बनविलें आहे असा जो त्यांचा लाडका तुकाराम यांच्यासारखाच ख्रीस्त जरी मानवकुळांत जन्मला होता व 'जातस्य हि ध्रवो मृत्युः' या नियमास जरी तो अपवाद नव्हता (त्याच्या अपूर्व जननाची, स्वेच्छामरणाची व पुनरुत्थानाची गोष्ट क्षणभर एकीकडे ठेऊं.) तरी तो मानव नसून आम्हां सारख्यां प्राकृत जनांहून तर काय पण ज्यांस लोक पुण्यपुरुष म्हणून मानितांत अशा व निर्दिष्ट केलेल्या पुरुषद्वयासारख्याहूनही तो कांहीं विशेष हें सिद्ध करावयास मी वर दिलेलें प्रमाण बस्स आहे. ख्रीस्ताचें देवत्व सिद्ध करण्यास आम्हाजवळ दुसरीं प्रमाणें नसतीं व तो निष्पाप होता ('त्यानें कधीं पाप केलें नाहीं' १ पेत्रस २:२२) एवढें एकच प्रमाण जरी उपलब्ध असतें तरी तें बस्स होतें.

आतां ख्रीस्त निष्पाप होता हें कशावरून? असा प्रश्न जर आम्हांस कोणी करील तर या पृच्छकास प्रत्युत्तर देण्यांस आम्हांपाशीं मुख्य अशीं तीन प्रमाणें आहेत, तीं येणेंप्रमाणें:-

पहिलें प्रमाण - ख्रीस्ताच्या आद्यशिष्यांनीं जीं त्याचीं चरित्रवर्णनें ग्रंथित केलीं आहेत त्यांत ख्रीस्ताकडून म्हणजे अमुक एक प्रमाद घडला असें तर त्यांनीं कोठेंच लिहिलेलें नाहीं. पण उलट तो निष्पाप, निष्कलंक, पवित्र पुरुष होता असें अनेक ठिकाणीं त्यांनीं लिहिलें आहे. लोकांनीं ज्यास पवित्र पुरुष म्हणून मानिलें आहे अशांच्या -

---

* अद्भुत, दिव्य

त्यांच्याच भक्त मंडळीनें लिहिलेल्या - चरित्राकडे पाहिलें असतां त्यांत त्या पुण्यपुरुषाकडून घडलेल्या पापकर्माची (!) फरडच्या फरड दृष्टीस पडते. पण येशूच्या चरित्रांत त्याच्या एका प्रमादाचा तरी उल्लेख असायचा होता. पण तो नाहीं. कोणी म्हणेल, येशूच्या शिष्यांनीं त्याचीं पापिष्ट कर्मे त्याचा महिमा वाढविण्याकरितां बुद्ध्या वगळलीं असतील व ज्या पुरुषांस तुम्ही दोष देता त्यांच्या चरित्रग्रंथांत तीं त्या ग्रंथकारांनीं बुद्ध्या घसडली असतील, नसतील कशावरून! असें म्हणणारांस तूर्त एवढेंच उत्तर बस्स कीं, इतर मानलेल्या पुण्यपुरुषांच्या चरित्रवर्णनकारांवर 'तुम्हीं प्रस्तुत आरंभिलेल्या ग्रंथांत ह्या देवाकडून इतकीं पातकें झालीं असें लिहा' म्हणून कोणी जुलूम केला होता काय? किंवा त्या पातकमालिकांचें चित्तवेधक वर्णन केलें असतां त्यांस कोल्हापूर पाठशालाधिपतीकडून किंवा दक्षिणा प्रैज कमिटीकडून बक्षीस मिळण्याची आशा होती काय? तसेंच ख्रीस्तचरित्रलेखकांस, जर ख्रीस्ताचीं कांहीं अनन्वित कर्मे वर्णन करावयाचीं होतीं तर त्यांचा कोणी हात धरला होता काय? किंवा त्यांनीं तसें केल्यास त्यांचें रोमन अधिकाऱ्यांकडून किंवा यहुद्यांच्या सान्हेद्रीम सभेकडून परिपन्य होण्याचें भय होतें काय? नाहीं. अशीं कोणतींच गोष्ट नव्हती. तर ख्रीस्तचरित्रकारांनीं त्याचीं मंगलकर्मे वर्णन करण्यांत त्याची महिमावृद्धि आहे असें मानून व ख्रीस्तेतरपुरुष चरित्रकारांनीं त्या पुरुषांचीं अमंगलकर्मे वर्णन करण्यांत त्याची महिमावृद्धि आहे असें मानून उभय प्रकारच्या ग्रंथकारांनीं आपण वर्णन करूं घेतलेल्या पुरुषांच्या महिमावृद्ध्यर्थच आपापले ग्रंथ लिहिले. तेव्हां उभयतांच्या वर्णनांचा हेतु एकच आणि पर्यवसान एकाच गोष्टीकडे अस्तु. ख्रीस्ताच्या चरित्रग्रंथांतून एकांतही तद्दोषवर्णनपर असें एकही वाक्य नाहीं. पण त्याची निष्पापता दाखविणाऱ्या वाक्यांनीं तर ते ओतप्रोत भरले आहेत. म्हणून जे कांहीं आतांच आम्ही वर म्हटलें त्याच्या पुष्टीकरणार्थ त्याच्या चरित्रग्रंथांतील कित्येक वचनें दिल्यानें व त्यांचीं स्थळें दाखविल्यानें आमच्या म्हणण्याची दृढता होणार आहे. यास्तव कित्येक वचनें येथें उतरून घेतों.

(१) तो खरेपणानें पूर्ण होता. (योहान १:१४)
(२) तो चांगला माणूस होता. (प्रेषितांचीं कृत्यें २१:२४)
(३) पवित्रतेच्या आत्मसंबंधानें तो देवाचा पुत्र असा ठरला. (रोमेकर १:४)
(४) ज्यानें तुम्हांस बोलाविलें तो पवित्र आहे. (१ पेत्रस १:१५)
(५) येशू ख्रिस्त न्यायी आहे. (१ योहान २:१)
(६) तो शुद्ध आहे. (१ योहान ३:३)

ह्यावरून दिसून येतें कीं, ख्रीस्ताचे जे प्रथमचे शिष्य आणि चरित्रकार यांची साक्ष पाहतां त्यानें कधीं पाप केलें नाहीं तर तो सर्वस्वी निष्पाप होता असें ठरलें.

दुसरें प्रमाण - ख्रिस्तानें स्वतां मी पापी आहे असें कधीं म्हटलें नाहीं. कदाचित् कोणी एरव्ही 'मी पापी आहे मी पापी आहे' असें गाणें गात बसणार नाहीं. पण जेव्हां त्याची परमेश्वरभक्तीची वेळ येईल तेव्हां त्या पित्यापाशीं त्यास आपलें दैन्य कबूल केल्याखेरीज कसें राहवेल? व आपण खरोखर पापलिप्त असून जर तो तें परमेश्वरासमोर कबूल करणार नाहीं तर अशा पुरुषास परमेश्वरभक्त तरी कसें म्हणावें? येशूनें मानवदेह व मनुष्यस्वभाव धारण केला असल्यामुळें त्यानें त्या स्वभावास अनुसरून 'परमेश्वराची प्रार्थना केली'. यानें अनेक वेळां प्रार्थना केल्याविषयींचा उल्लेख आहे असे एकंदर नऊ शास्त्रलेख आम्हांस अवगत आहेत. त्यांपैकीं 'प्रभूची प्रार्थना' म्हणून जी एक जगद्विख्यात प्रार्थना आहे तींत 'जसें आम्ही आपल्या ऋण्यांस सोडितों तसें तूं आमचीं ऋणें आम्हांस सोड' आणि 'आम्हांस परिक्षेच्या अवस्थेंत नेऊं नको' असे जे शब्द आहेत त्याकडून स्वतां ख्रिस्तांस कांहींच लघुत्व येत नाहीं कारण कीं ती प्रार्थना मुळींच त्यानें आपल्या शिष्यवर्गास प्रार्थनापद्धति म्हणून शिकविली आहे. ती म्हणजे त्याची स्वतांची प्रार्थना आहे असें अगदी नाहीं. बाकी राहिलेल्या ज्या आठ

प्रार्थना त्यांत 'देवा मी पातकी आहे', 'मज पाप्यावर दया कर', अशा किंवा अशा प्रकारच्या शब्दांचा गंधलेशही नाहीं. वास्तविकच आहे. ख्रीस्त पडला निष्पाप, तो आपणास पातकी असें कसें म्हणवून घेईल? प्रार्थनासमाजिष्ट त्यास सज्जन म्हणतात, महासाधूही म्हणतात, पण त्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं त्यास सज्जन म्हणा, महासाधू म्हणा, किंवा बाबू केशव चंद्र सेन म्हणत त्या गौण अर्थानें देवपुत्र म्हणा, पण जर तो मनुष्यच होता तर तो पापलिप्त असलाच पाहिजे. आणि जर तो पापलिप्त होता तर आपली ती दैन्यावस्था कबूल करून पापक्षमेप्रीत्यर्थ परमेश्वराची करुणा भाकणें हें त्याच्या सज्ञनत्वास योग्य होतें. कारण सज्ञनतेचें बीज हेंच आहे कीं आपण भ्रष्ट, अमंगळ, पतित आहों व परमेश्वर पवित्र, शुद्ध आणि पतितपावन आहे हें जाणणें व आपली भ्रष्टावस्था जाणण्याकरितां त्या परमविशुद्धाची करुणा भाकणें व ख्रिस्तानें तर 'मी पातकी आहे' असें स्वमुखानें आपल्या प्रार्थनेंत कधींच म्हटलें नाहीं. मग आमचे प्रार्थनासमाजिष्ट मित्र त्यास महासाधू तरी कसें म्हणतात ते त्यांसच माहीत. ते साधूत्व कशावरून प्रतिपादन करितात हें निदान आम्हांस तरी कळत नाहीं.

ख्रीस्तानें प्रार्थना केल्याशिवाय ज्यांत उल्लेख केला आहे अशीं जीं शास्त्रस्थळें आम्हांस माहीत आहेत म्हणून आम्ही आतांच वर म्हटलें तीं येणेंप्रमाणेंः-

मात्थी अ. ६ः९-१३, अ. ११ः१५-२६, अ. २६ः३९-४४, अ. २७ः४६,
लूक अ. ३ः४६
योहान अ. ११ः४१-४२, अ. १२ः२७-२८, अ. १७ सर्व

ह्या दुसऱ्या प्रमाणाच्या प्रतिपादनावरून दिसून येईल कीं ख्रीस्ताच्या स्वतांच्या साक्षीवरून तो निष्पाप ठरतो.

तिसरें प्रमाण - ख्रीस्ताचे जे प्रत्यक्ष शत्रू त्यांस देखील त्याचा कोणताही दोष आढळून आला नाहीं. मित्राच्या साक्षीपेक्षां शत्रूची साक्ष मोठ्या महत्वाची मानितात. ख्रिस्ताचे शिष्य त्याच्या निर्दोषतेविषयीं साक्ष देतात त्यांत कोणांस विशेष न वाटेल तर न वाटो. पण त्याचे जे धडधडीत हाडवैरी त्यांस देखील त्याचा दोष आढळूं नये ह्याहून अधिक आश्चर्याची गोष्ट ती कोणती असावयाची आहे? बरें त्याचे वैरी तरी कोण? कोणी यःकश्चित गांवढेंकर? नाहीं. तर यहुद्यांतील मोठीं मोठीं धेडें. बरें ते त्याचे वैरी त्याच्या टपणीस एक दोन दिवस बसले होते काय? नाहीं. तर त्याच्या लौकिक कार्यारंभापासून तो तहत त्याच्या मरणापर्यंत ते त्याच्या पाठीस लागले होते. तो मेल्यावर त्याच्या प्रेताचा देखील त्यांनीं पिच्छा सोडला नाहीं. बरें, असे जे दीर्घ द्रोही शत्रू त्यांस देखील त्याचा कोणताही दोष दिसून आला नाहीं ही काय लहान गोष्ट आहे? बरें, पंतयस पिलातसापुढें त्याची चौकशी झाली तेव्हां त्यांस तरी येशूकडे कांहीं दोष आढळायचा होता? त्यांस नाहीं तर नाहीं, हेरोदापुढें चौकशी झाली तेव्हां त्यांस तरी? आढळून येणार कोठून? लोकांनीं खोटे नाटे साक्षी मिळविण्याचाही यत्न केला पण त्यांस यश मिळालें नाहीं. पिलातसानें तर 'याकडे मला कांहीं दोष सांपडत नाहीं' असा आपला अभिप्राय धडधडीत स्वमुखानें त्रिवार वदून दाखविला (लूक २३ः४, १४, १५). पण लोकांनीं जेव्हां एकच गिल्ला केला व त्यास 'खांबीं दे' म्हणून दुराग्रहच धरिला व जेव्हां पिलातसानें पाहिलें कीं आपण यांच्या म्हणण्यास मान्य न झालों तर एकादा मोठाच दंगा होईल. तेव्हां त्यानें भित्रेपणानें त्यास खांबीं देण्याकरितां लोकांच्या स्वाधीन केलें (मात्थी २७ः२६). पण हें करण्यापूर्वी त्यानें अनेक आढेवेढे घेतले व अनेकदां होना होना केलेंच व येशूला खांबीं देण्याकरितां लोकांच्या स्वाधीन करितांना तरी हें जें कृत्य आपण करीत आहों तें अनन्वित आहे असें त्याचें त्यासच वाटून तें त्याच्या मनास खाऊं लागलें. म्हणून त्यानें आपल्या मनाची समजी करण्याकरितां पाणी घेऊन समुदायाच्या समक्ष - जणूं कांहीं पापक्षालन करण्याकरितां म्हणून - आपले हात धुवून म्हटलें, 'या नीतिमानाच्या

रक्ताविषयीं मी निर्दोष आहे' (मात्थी २७:२४). वा! केवढें हें बलवत्तर प्रमाण! डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस टपत बसलेल्या त्याच्या शत्रूंस व रोमन अधिकाऱ्यांस ख्रीस्ताचा कांहीं एक दोष सांपडूं नये ह्याहून त्याच्या निर्दोषतेच्या कोणत्या प्रमाणाची आम्ही अपेक्षा करावी? (ह्या तिसऱ्या प्रमाणाचें सविस्तर निरुपण एका निराळ्याच निबंधांत करण्याचा विचार असल्यामुळें येथें त्याचें केवळ दिग्दर्शन केलें आहे.)

ख्रीस्ताचें निष्पापत्व सिद्ध करण्यांस जीं तीन मुख्य प्रमाणें आम्हांपाशीं आहेत म्हणून म्हणतो तीं हींच आहेत. यावरून व त्याच्या संबंधानें जीं शास्त्रस्थळें दिलीं आहेत, तीं पाहून त्यांचें योग्य मनन केल्यास दिसून येईल कीं, तो निष्पाप होता. (१) ज्यांनीं त्यांस एकांती व लोकांती पाहिलें अशा त्याच्या शिष्यांची आपल्या गुरूच्या निष्पापत्वाविषयीं पूर्ण खात्री होती. (२) त्यानें स्वमुखानें मी पापी आहे असें कधींच म्हटलें नाहीं. हें तर काय पण (३) त्याच्या धडधडीत हाडवैऱ्यांस किंवा त्याचा न्याय करणाऱ्यांस त्याचा कोणताही दोष दिसून आला नाहीं. या तीनच गोष्टींवरून त्याच्या निष्पापत्वाचें प्रमाण होतें हें सिद्ध झालें.

पण तो निर्दोष होता एवढ्यावरूनच तो ईश्वरी पुरुष होता असें आमचें म्हणणें नाहीं. कारण देवदूतही निर्दोष आहेत. परंतु त्यांच्यापैकीं कोणींही कधीं आपणास देवपुत्र म्हणविलें नाहीं. तसेंच जेव्हां जेव्हां कोणी त्यांस ईश्वरी मान देऊं जात तेव्हां तो ते नाकारीत. पण येशू ख्रिस्तानें तसें केलें नाहीं. त्यानें आपणास देवपुत्र म्हटलें. 'मी आणि बाप एक आहों', असेंही म्हटलें. 'मजकडे आल्यावांचून कोणाचें बापाकडे जाणें होणार नाहीं', असेंही त्यानें प्रतिपादन केलें. व जें कांहीं त्यानें म्हटलें त्यास आपल्या स्वतांच्या विशुद्ध आचरणानें व चमत्कारादिक दुसऱ्या दृश्य गोष्टींनीं प्रमाण पाठविलें.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यास कोणाही प्रांजल, विचारी मनुष्यास दिसून येईल कीं, येशू केवळ कोणी मानवेतर निर्दोष पुरुष होता इतकेंच नाहीं तर परमविशुद्ध, परमपूज्य, मंगलधाम, सर्व सद्गुणनिधान जो परमेश्वर तत्स्वरूपी तो होता. म्हणजे पवित्र शास्त्र परिभाषेंत म्हटलें असतां 'खरोखर तो देवाचा पुत्र होता' (मात्थी २७:५४).

(येशू सत्यवादी होता असें म्हणत असतां जे त्याचें देवत्व मान्य करीत नाहींत त्यांनीं 'मी देवाचा पुत्र आहे', 'तुम्ही म्हणता तो मी आहे', ह्या ख्रिस्तानें आपल्या राष्ट्राच्या मुख्य अधिकाऱ्यापुढें परात्पराच्या नांवाच्या शपथेवर केलेल्या प्रतिज्ञेचा चांगला विचार करावा. - बाबा पदमनजी कृत 'येशू ख्रिस्ताचें चरित्र', खंड ६, अध्याय ९, पान ३३२.)

------------

## नवीन श्राद्धपद्धति

*ज्ञानोदय, ९ फेब्रुवारी १८८८*

(----) यांच्या अकालिक मृत्यूच्या संबंधानें लिहीत असतां समाजबंधूंनीं त्यांच्या आत्म्याकरितां प्रार्थना केली असें सुबोधपत्रिकाकर्ते म्हणतात. मृतांच्या आत्म्यांकरितां प्रार्थना करणें योग्य आहे काय? मृतांच्या आत्म्यास सुखशांति मिळावी म्हणून प्रार्थना करणें जर योग्य आहे तर श्राद्धपक्ष करण्यांत किंवा फात्या* पढण्यांत काय गैर आहे? मनुष्य मरण पावून स्वर्गांत गेल्यावरही जर त्याचें सुखदुःख त्याच्या सुहृद आप्तांच्या किंवा इष्ट मित्रांच्या सुवर्तनावर किंवा कुवर्तनावर अगर दानधर्मावर किंवा प्रार्थना पुरश्चरणावर+ अवलंबून असेल तर ही केवढी दुःखाची गोष्ट आहे? स्वर्गाची स्थिति अशी अशाश्वत असेल तर शेंकडों जणांस स्वर्ग सोडून नरकांत जावें लागेल. तसेंच शेंकडों जणांस अनायासें स्वर्ग-प्राप्ति होईल. मनुष्य मरण पावल्यावर स्वर्गांत जाणें किंवा नरकांत जाणें हें त्याच्या पश्चात् राहिलेल्या आप्तांच्या सुवर्तनावर किंवा कुवर्तनावर अगर त्यांच्या दानधर्म करण्यावर किंवा न करण्यावर किंवा प्रार्थना पुरश्चरणावर नसून केवळ त्याच्या मृत्युभूमीवरील वास्तव्य काळांतील स्वतांच्या वर्तनावर अवलंबून आहे असें मला वाटतें.

प्रार्थना समाजाच्या धूरिधारकांनीं या त्यांच्या नवीन श्राद्धपद्धतीच्या योग्यायोग्यतेविषयीं ती बाल्यावस्थेंत आहे तोंच विचार करावा अशी माझी त्यांस विनंती आहे. अलिबाग, १३ जानेवारी १८८८.

------------

* मृतासाठी वाचला जाणारा कुराणाचा भाग

+ मंत्रांचे जपानुष्ठान

## बरें करितांना थकूं नये

*ज्ञानोदय, १२ एप्रिल १८८८*

या देशांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरितां व अज्ञानाचा नाश करण्याकरितां ख्रिस्ती लोकांनीं जे यत्न चालविले आहेत त्यांचीं फलें कधीं कधीं एकदम दिसत नाहींत म्हणून ते यत्न निरुपयोगी आहेत असें कोणीं समजूं नये. यथाकालीं त्यांचीं फलें दिसतीलच.

आज हे विचार मनांत येण्यास रे. बाबा पदमनजी यांचें चरित्र कारण होय. बाबासाहेबांच्या मनांतील अज्ञान दूर होण्यास ज्या अनेक गोष्टी कारण झाल्या त्यांपैकीं एक गोष्ट ज्ञानोदयांतील लेख होय.

ज्ञानोदय आज सुमारें अर्धशतकपर्यंत जें अविश्रांत काम करीत आहे त्याचें काय फल हें कालांतरानें सरासरी व ज्या दिवशीं परमेश्वर सर्व गूढ गोष्टी व्यक्त करील त्या दिवशीं पूर्णपणें समजणारें आहे. पण बाबासाहेबांच्या ख्रिस्ती होण्यास साधनीभूत झालेल्या ज्या अनेक गोष्टी, त्यांतील एक गोष्ट जर ज्ञानोदयांतील लेख आहे तर ज्ञानोदयाच्या श्रमाचें हें काय लहान फल आहे? जो पुरुष आम्हां ख्रिस्ती मंडळीस प्रतिपौलसाप्रमाणें भासतो, ज्याचे वजनदार लेख म्हणजे अज्ञानपर्वतांचें चूर्ण करणारीं वज्रेंच, ख्रिस्ती धर्माविरुद्ध शब्द काढणारांस किंवा टाक उचलणारांस ज्यांचा दरारा, कोणत्याहि सत्य गोष्टीविरुद्ध लिहिलेल्या लेखांस उत्तरें देण्यास जो सर्वदा तयार, ख्रिस्ती धर्माचीं सत्यें लोकांपुढें मांडण्याचा प्रसंग आल्यास एकाद्या सर्वसाधारण विषयावर बोलून, जो वेळ मारून नेणारा नव्हे, ट्रॅक्ट सोसायटीची अर्धी मराठी डेपो केवळ ज्याच्या पुस्कांनीं भरलेली, व ज्याच्या नांवाचा आम्हां नेटिव ख्रिस्ती लोकांस मोठा अभिमान वाटतो अशा पुरुषाच्या ख्रिस्ती होण्याच्या कामीं ज्ञानोदयांतील लेख यत्किंचित कां होईना पण जर साधनीभूत झालेले आहेत तर ज्ञानोदयाच्या श्रमाचें सार्थक्य झालें नाहीं असें कोण म्हणेल?

ज्ञानोदयांतील लेख जसे बाबासाहेबांच्या तसे आणखी अनेकांच्या उपयोगी पडले असतील. मी ख्रिस्ती धर्माचा विचार करीत होतो त्यावेळीं ज्ञानोदयाच्या पहिल्या पृष्ठावरील मराठी कॉलमांतील निबंधाकडून माझें फार साह्य झालेलें आहे. ही गोष्ट मी आपल्या बाप्तिस्म्याची हकीगत प्रसिद्ध केली तेव्हांच लिहिली पाहिजे होती. ती ऐकून त्या निबंधाचे जनक स्वर्गवासी मि. शाहूराव कुकडे यांस आनंद झाला असता. पण झाल्या गोष्टीस निरुपाय आहे,

------------

## महाबळेश्वर येथें पाहण्यांत येणाऱ्या कित्येक गोष्टी

*ज्ञानोदय, ३० मे १८८९*

येथें येण्यापूर्वी माझा समज असा होता कीं, महाबळेश्वर जरी एका उंच डोंगरावर वसलें आहे तरी तें एका नारिंगाप्रमाणें एकसारख्या सपाटीच्या गोल डोंगरावर वसलें असेल, आणि ज्याप्रमाणें मुंबईस घरोघरीं जातांना मनुष्य एकसारख्या पातळ सपाटीवर चालत जातो, त्याप्रमाणें येथें मनुष्याला एकसारख्या गोल पृष्ठभागावर चालत जावें लागत असेल. परंतु येथें आल्यावर तो सर्व भ्रम नाहींसा झाला. येथील जमीन उंच खोल आहे, व बहूत करून प्रत्येक बंगला एकेका टेकडीवर बांधलेला आहे. म्हणून एका घरून दुसऱ्या घरीं जायचें झालें म्हणजे चढावें व उतरावें लागतें. येथें प्रत्येक बंगल्याला कांहींना कांहीं तरी चमत्कारिक इंग्रजी नांव आहे. उदाहरणार्थ, ईगल्स नेस्ट म्हणजे गरुडाचें घरटें, बेला विस्टा म्हणजे सुंदर पोद, ग्रीन हिल म्हणजे हिरवी टेकडी, क्रोके कॉटेज म्हणजे चेंडू दांडू, बावर म्हणजे लता मंडप, इत्यादि.

येथें पर्वताला निरनिराळीं टोंकें आहेत. त्यांनाही इंग्रजींत निरनिराळीं नांवें आहेत. एका टोंकापासून दुसरें टोंक जवळ दिसतें, पण मध्यें खोरें असल्यामुळें डोंगराच्या कडेकडेनें तिकडे जाण्यास बराच हेलपाटा घ्यावा लागतो. अशा एखाद्या टोंकावर संध्याकाळीं उभें राहून सूर्यास्त पाहण्यास फार मजा वाटते. संपूर्ण सूर्यबिंब आकाशांत दिसतें, व त्याजकडे पाहून डोळे मुळींच दिपत नाहींत. तेथें उभें राहून डोंगर, खोरीं, निरनिराळीं झाडें, डोंगरास लागून जाणारीं धुकीं, अंगास लागणारा मंदमंद शीतल वायू, त्यावर आरूढ होऊन येणारे पुष्पगंध इत्यादि प्रकार पाहून मनास मोठा आल्हाद प्राप्त होतो, व ईश्वराचा थोरपणा व आपलें लघुत्व लक्षांत येऊन असें वाटतें कीं, ईश्वरानें आम्हां मानवांकरितां या सृष्टींत काय काय चमत्कार उत्पन्न करून ठेवले आहेत तरी आम्ही त्याची सेवा योग्य प्रकारें करीत नाहीं हा आमचा किती कृतघ्नपणा होय.

जे साहेबलोक किंवा एतद्देशीय लोक नेहमीं येथें येतात त्यांस हें स्थळ साधारण होऊन बसलें असेल, तथापि ईश्वरनिर्मित कृत्यें मनुष्याच्या कृत्रिमी पदार्थांपेक्षां श्रेष्ठ आहेत व हें त्यांचें श्रेष्ठत्व कधीं कमी होणार नाहीं, म्हणून नेहमीं येणारे लोकसुद्धां येथें आल्यावर पूर्वी अनेक वेळां पाहिलेलीं डोंगर, खोरीं, वगैरे ठिकाणें व तेथील नवनीत सृष्टीसौंदर्य पुनःपुनः पाहण्यास जातात.

उन्हाळ्याच्या दिवसांत महाबळेश्वर येथें हवा खाण्याकरितां येणाऱ्या बडे लोकांची प्रतिवर्षी मोठी यात्रा जमत असते. त्याप्रमाणें यंदाही मोठी गर्दी झालेली होती. राज्ञीपुत्र ड्यूक ऑफ कनॉट, मुंहईचे गव्हर्नर लॉर्ड रे व त्यांचे मंत्री, इंदूरचे होळकर, महाराज्याच्या राणीसाहेब, बडोद्याचे गाईकवाड, भावनगरचे ठाकूरसाहेब, मुधोळकर, मिरजकर वगैरे संस्थानिक व यांशिवाय मुलकी, लष्करी, न्याय व विद्या खात्यांतील कामगार, तसेंच निरनिराळ्या ठिकाणचे व निरनिराळ्या मिशनांचे मिशनेरी वगैरे बड्या बड्या प्रकरणांची आश्रित मंडळीसुद्धां एकच गर्दी होऊन राहिली होती.

हवामानः आपल्या इकडे भरथंडीच्या दिवसांत साधारणपणें जितकी थंडी असते तितकीच येथें उन्हाळ्यांत असते. शिवाय इकडे वारंवार धुकें येतें व मधून मधून पाऊसही पडतो. एकंदरींत हवेचा फारसा नेम नसतो. असें सांगतात कीं दाहा वर्षांपूर्वी जितकी येथें थंडी असे तितकी, फार लोक येऊं लागल्यामुळें व पुष्कळ झाडें तोडिल्यामुळें आतां नाहीं. एकादे दिवशीं दिवसभर अतिशय उष्मा होतो. सायंकाळीं आकाश ढगांनीं भरून जाते, रात्रीं एखाद दुसरी सर पडते व दुसरे दिवशीं सकाळीं जिकडे तिकडे सर्व सृष्टि प्रफुल्लित होऊन जाते.

उत्कृष्ट देखावेः येथें ठिकठिकाणांहून उत्कृष्ट देखावे दृष्टीस पडतात. कृष्णा, कोईना, वाईनगंगा, सावित्री, गायत्री या पांच नद्या येथें उगम पावतात. या सर्व नद्या निरनिराळ्या ठिकाणांहून दिसतात. तसेंच पर्वतावर जें धुकें ओथंबलेलें असतें तें पाहण्याची मोठी मजा आहे. शिवाय येथें निरनिराळीं टोंकें (पॉइन्ट्स) आहेत. तसेंच प्रतापगड, मकरनगड वगैरे इतिहासप्रसिद्ध स्थळेंही येथून जवळच आहेत. एकंदरींत येथें उत्कृष्ट प्रतीचा सृष्टि देखावा दृष्टीस पडतो.

सहल करणारी मंडळीः येथें आलेली बहुतेक मंडळी हवा खाण्याकरितांच आलेली म्हणून अर्थातच त्यांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे हवा खाण्याचेंच. मोठ्या पहाटेंस उठून थोडासा उपहार करून बाहेर फिरावयास निघणाऱ्या मंडळींच्या टोळ्या दृष्टीस पडतात. सकाळीं फिरावयास जाणाऱ्यांत पायांनीं जाणारे फार. घोड्यावरून जाणारे त्याहून थोडे. गाडींत बसून जाणारे तर क्वचितच दृष्टीस पडतात. संध्याकाळीं पायीं चालणाऱ्यांची, घोड्यावरून जाणाऱ्यांची व गाडींतून जाणाऱ्यांची एकच गर्दी उडते.

करमणूकीच्या गोष्टीः येथें करमणूकीचे अनेक प्रकार आहेत. चेंडू दांडू खेळण्याच्या कित्येक जागा आहेत. त्या ठिकाणीं कित्येक युरोपियन स्त्रिया व पुरुष आपली खेळण्याची हौस पुरवून घेतात. युरेपियन लोकांत बाल, पार्टीज यांचा धडाका असतो व कित्येक एतद्देशीय बड्या लोकांत नायकिणीचें नृत्य, वादन यांचा धूमाकूळ असतो. याशिवाय येथें घोड्यांच्या शर्यती होतात. दर शनिवारीं एका ठिकाणीं येथें इंग्रजी बाजा वाजत असतो. लहान मुलांस येथें रे. गार्डननामक बागांत जाऊन लांकडी घोड्यावर बसून खांबाभोवतीं फिरण्याकरितां चांगली मजा करून ठेविली आहे. शिकारप्रिय लोक वाघ वगैरेची शिकार करितात. ड्यूक ऑफ कनॉट यांनीं एक मोठी थोरली वाघीण मारिली. गरीबगुरीबांची करमणूक म्हटली म्हणजे वर लिहिलेल्या बड्या लोकांच्या कित्येक करमणूकीच्या वेळीं तेथें जाऊन दूर उभें राहून मौज पहाण्याची.

बाजारांत मिळणारे पदार्थः बाजारांत निर्वाहाचे पदार्थ मिळतात. त्याखेरीज बांबुच्या काठ्याची जुडगी डोक्यावर घेऊन विकावयास आलेलीं माणसें जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. सकाळच्या प्रहरीं धर्मशाळेसमोरच्या जाग्यांत बैलांचे गाडीवाले, कारवींच्या भाज्या विकणारे, गवत विकणारे व आंडीं व कोंबड्या विकणारे यांची एकच गर्दी झालेली असते. प्रहर दिवसां तेथें जाऊन पहावें तों सर्व सामसूम. दोन प्रहरीं मधाची पोळी व मध विकणारे बंगलो-बंगलीं फिरतात. शिवाय या दिवसांत येथें बुरुडकाम व वेताच्या खुर्च्या वगैरे करण्याचें काम फार जारीनें चालतें. याशिवाय खेळणी वगैरे मौजेचे पदार्थ, घोंगड्या, बनाती, कापडे, जोडे वगैरे जिनसांचा व्यापार करणारे येथें तीन महिने दुकान घालून बसतात. फार तर काय पण ट्रेचर आणि कंपनी, बाथाम अणि कंपनी यांाचीही दुकानें एथें आलीं आहेत.

मेजवान्यांचा कडाकाः येथें जे राजे जमले आहेत त्यांतून कित्येकांनीं गव्हर्नर आदीकरून बड्या युरोपियन गृहस्थांस व त्या अनुषंगानें कित्येक बड्या नेटीव गृहस्थांना मेजवान्या दिल्या. एका राजानें अशा एका मेजवानीस एका नेटिव ख्रिस्ती गृहस्थासही बोलविलें होतें. तसेंच यूरोपियन मुलांसही फीटी नामक मेजवान्या देण्यांत आल्या, पण येथील नेटिव गरीब मुलांस अशा प्रकारची मेजवानी दिल्याचें कोठें ऐकिवांत आलें नाहीं.

दानधर्मः तरी दोघां राजांनीं येथील गरीब लोकांस घोंगड्या वाटल्या व कित्येकांकडे ब्राह्मणभोजनें होत असत. गायकवाड महाराजांचा कारखाना फार नेमस्त आहे म्हणतात. पन्नास ब्राह्मण बोलाविलें असल्यास एकही आगंतुक घेत नाहींत. शिवाय त्यांनीं सोळा रुपये दोन आण्यांचें एक अशीं कित्येक गोप्रदानें ब्राह्मणांस दिलीं.

पुस्तकांची विक्रीः येथें हिंदु धर्माची लहान लहान पुस्तकें पोथ्या वगैरे विकणारा एक मनुष्य बाजारांत दृष्टीस पडतो. पण बैबल सोसायटीचा पुस्तकें विकणारा या ठिकाणीं आलेला नाहीं. तरी एतद्देशीय ख्रिस्ती गृहस्थानें ट्राक्ट सोसायटीचीं कित्येक पुस्तकें आणवून त्यांतून कित्येक विकलीं व कित्येक फुकट वाटलीं.

बैबलाचें मराठी भाषांतर करणारी मंडळीः येथें बैबलाचें मराठी भाषांतर करण्याकरितां म्हणून नित्य एक कमिटी भरत असते. या कमिटींत तीन परदेशस्थ व तीन एतद्देशीय ख्रिस्ती असे एकंदर सहा असामी आहेत.

इंग्रजी व्याख्यानेंः येथील नेटिव लायब्ररींत धर्मसंबंधीं तीन इंग्रजी व्याख्यानें झालीं. पहिलें व्याख्यान नगर येथील रे. ह्यूम साहेब यांनीं दिलें. दुसरें व्याख्यान ग्लासगो येथील प्रोफेसर डॉक्टर लिंडसे यांनीं दिलें, आणि तिसरें व्याख्यान ग्लासगो येथील रे. ॲबट साहेब यांनीं दिलें. प्रत्येक व्याख्यानाच्या वेळीं बरीच सुशिक्षित मंडळी असे. रावसाहेब विष्णू मोरेश्वर भिडे हे तिन्ही प्रसंगीं हजर असून प्रत्येक व्याख्यानाच्या शेवटीं त्यांनीं थोडथोडें समयोचित भाषणही केलें.

इंग्लिश चर्चचें देऊळः या ठिकाणीं एक सरकारी देऊळ आहे. तें विशेषेंकरून युरोपियनांकरितां आहे. तरी तेथें सर्वांस जाण्याची मोकळीक आहे. इंग्लिश देवळांच्या रीतीप्रमाणें येथेंही गायन उत्तम प्रकारचें होतें. येथें श्रोतृजनांचा समुदाय बराच मोठा असतो. व विशेष संतोषाची गोष्ट ही कीं जे कित्येक लोक आपापल्या हुद्याच्या गांवीं असतां देवळांत म्हणून दृष्टीस पडावयाचे नाहींत तसले गृहस्थ येथें देवळांत आलेले असतात.

प्रार्थनेनिमित्त सभाः दर शनवारीं सायंकाळीं येथें डाक्टर बिसल यांच्या घरीं ख्रिस्ती लोकांकरितां प्रार्थनेची सभा भरत असते.

शाब्बाथ शाळाः या ठिकाणीं अमेरिकन मिशनाचें एक देऊळ आहे. ते मध्यवस्तींत असल्यामुळें त्याची उपयुक्तता विशेषच वाढलेली आहे. त्या ठिकाणीं दर रविवारीं सकाळीं शाब्बाथ शाळा भरत असते. साडेसात वाजल्याबरोबर पेटीचा बाजा वाजण्यास सुरुवात होते. त्यासरसी मुलगे व मुली भराभर आंत येऊं लागतात, व बरीच मोठी गर्दी जमते. प्रथम मेहरबान ॲबट साहेब हे मुलांस 'तारण दे पतिताला', 'माळी दादा रे माळी दादा', 'सद्गुरुवांचूनि तारण होईना', 'प्रिय वाटतो हो येशू प्रिय वाटतो', वगैरे प्रसिद्ध गीतांतून एखादे गीत शिकवीत. गीत गाऊन झाल्यावर निरनिराळे वर्ग करण्यांस येत. नंतर त्यांस शास्त्रांतून कित्येक भाग शिकविले जात. अमेरिकन मिशन संबंधाच्या बहुतेक मडमा या ठिकाणीं हजर असून निरनिराळे वर्ग शिकविण्याचें काम बहुदा त्याच करीत. तरी एक दोन मिशनेरी तेथें असतच व तेही वर्ग शिकविण्याचें काम करीत. शास्त्रभाग शिकविणें झाल्यावर पुनः सर्व मिळून एक दोन गीतें गाण्यांत येऊन मग प्रार्थना होई. नंतर तेथें जमलेल्यांतून वाचता येणाऱ्या मंडळीस ट्राक्टें वाटण्यांत येत असत. शाब्बाथ शाळेंस लहान मुलेंच येत असें नाहीं तर मोठे पुरुष व स्त्रियाही येत. शिवाय ख्रिस्ती लोकही पुष्कळ असत.

देऊळ व रस्त्यावरील उपदेशः संध्याकाळीं चार वाजतां याच ठिकाणीं देऊळ भरें. तेव्हांही मंडळीची मोठी गर्दी असे. ती इतकी कीं इकडे तिकडे फिरकण्याचा इलाज चालत नसें. देऊळ आटपल्यावर देवळाच्या पडवींत उपदेश होई व जे कोणीं इंग्रजी जाणणारे असतील त्यांशीं कधींमधीं देवळांत वादविवाद होई. मराठी उपदेश ऐकण्यास लोकांची फारच गर्दी जमे. या ठिकाणच्या कामाकडून शेंकडों सुशिक्षित, अडाणी, पुरुष, स्त्रिया, मुलें यांच्या कानीं शुभवर्तमान पडलेलें आहे.

यात्रमाणें उन्हाळ्याच्या सुटींत महाबळेश्वर येथें असतांना ज्या कित्येक गोष्टी दृष्टीस पडल्या त्या लिहून कळविल्या आहेत.

------------

## सुबोधपत्रिकेच्या एका आरोपास उत्तर

*ज्ञानोदय, १९ सप्टेंबर १८८९*

आगष्ट तारीख ११ च्या सुबोधपत्रिकेंत पत्रिकाकारांनीं 'ख्रिस्ती लोकांत व विशेषेंकरून एतद्देशीय ख्रिस्ती लोकांत धर्मसंबंधीं विचारांमध्यें जो दुराग्रहाचा भाग दिसतो' त्या संबंधानें कांहीं विचार प्रसिद्ध केले आहेत. ते येणेंप्रमाणें:- १ परदेशस्थ विद्वान ख्रिस्ती, २ परदेशस्थ अविद्वान ख्रिस्ती, ३ एतद्देशीय उच्चवर्णाचे ख्रिस्ती, ४ एतद्देशीय 'कनिष्ट' वर्णाचे ख्रिस्ती. पत्रिकाकारांच्या मतें 'परदेशस्थ विद्वान ख्रिस्ती लोकांतील हा दुराग्रह मूलक धर्माभिमान जात आहे'. पण परदेशस्थ अविद्वान ख्रिस्ती व एतद्देशीय उच्चवर्णाचे ख्रिस्ती यांची काय अवस्था आहे याविषयीं ते कांहींच लिहीत नाहींत. 'एतद्देशीय कनिष्ट वर्णाचे ख्रिस्ती लोकांत हा ख्रिस्ती धर्माविषयीं दुराभिमान वाढत आहे', असें म्हणतात.

आतां ख्रिस्ती लोकांत ख्रिस्ती धर्माविषयीं दुराग्रह वाढत आहे म्हणजे काय? तर ऐका. 'ख्रिस्ती मनुष्यानें हिंदु धर्माचा द्वेष केला पाहिजे. हिंदु धर्मांत चांगलें म्हणून कांहींच नाहीं, असें समजलें पाहिजे. माझा धर्म मात्र सर्वोत्तम व इतरांचे अगदीं कवडीच्या मोलाचे अशी त्याची दृढ समजूत झाली पाहिजे.'

आतां ही महावाक्यें पत्रिकाकारांस कोणत्या ख्रिस्ती ग्रंथांत सांपडली हें आम्हांस तर कळत नाहीं, किंवा कोणा ख्रिस्ती धर्मप्रचारकाच्या तोंडांतून पडलेलीं पुष्पें वेंचून त्यांनीं आपल्या ख्रिस्ती बांधवांवर त्यांची वृष्टि केली हें आम्हांस तर कळत नाहीं. हिंदुधर्मग्रंथांत जीं कांहीं कांहीं उत्तम वाक्यें सांपडतात त्यांतील कित्येक निवडक वेंच्यांचीं पुस्तकें ख्रिस्ती लोकांनीं लिहिलेलीं नाहींत काय? आमचे ख्रिस्ती पंडित बाबा पदमनजी यांनीं साहित्यशतक म्हणून जें एक पुस्तक केलें आहे त्यांत हिंदुधर्मग्रंथांतील सद्वचनें थोडीं घेतलीं आहेत काय? तसेंच दुसऱ्या एका ख्रिस्ती पंडितानें आर्यनीतिसुधा या नांवाचें एक लहानसें पुस्तक करून त्यांत भगवद्गीतेंतील उत्तम उत्तम वचनांचा संग्रह केलेला आहे कीं नाहीं? ख्रिस्ती लोकांच्या उपदेशांत तुकारामाचे अभंगांतील वचनांचा उपयोग किती वेळां करण्यांत येतो? तसेंच आमच्या ज्ञानोदयांत किती वेळां एखादें उत्तम श्रुतिवाक्य घेऊन त्यावर बोध लिहिलेला असतो? ह्या इतक्या गोष्टींपैकीं एकही गोष्ट पत्रिकाकारांच्या लक्षांत न येऊन त्यांनीं ख्रिस्ती लोकांवर हिंदुधर्मद्वेष्टे म्हणून जबर व्यर्थ आरोप आणून सर्व हिंदु लोकांनीं एकदम त्यांजवर उलटून पडावें म्हणून त्यांस चेतविण्याचा प्रयत्न केला आहे तो त्यांचा त्यांसच शोभतो. आम्ही हिंदुशास्त्रांतील काय पण कोणत्याही शास्त्रांतील उत्तम वचनांस मान देतो, पण इतकेंच कीं 'जें मानायास योग्य त्यापेक्षां अधिक मात्र आम्ही मानीत नाहीं.' पण यावरून आम्ही हिंदुधर्माचे द्वेष्टे ठरलों काय? आम्ही प्रार्थनासमाजाच्या धर्मप्रचारकांप्रमाणें दाखवायचे दांत वेगळे आणि गिळण्याचे दांत वेगळे असें मात्र करीत नाहीं. प्रार्थनासमाजाच्या मुखशाळेंत सभा भरेल तेव्हां मात्र रे. लेटवर्ड साहेबांच्या प्रश्नांस उत्तर देतांना भगवद्गीता ही कृष्णानें अर्जुनास सांगितली असें कांहीं नाहीं, ती व्यासानें लिहिली व ही वाचणारास अमुक अमुक फलप्राप्ती होईल व ही भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनास कथन केली हें त्यानेंच लिहिलें असें म्हणावयाचें. पण प्रार्थनासमाज मंदिरांत उतरून हेच गृहस्थ हरदास बोवा बनले म्हणजे भगवद्गीतेंतल्या वाक्यावरून कीर्तन करतांना हे मी म्हणतो असें नाहीं तर हें प्रत्यक्ष भगवंत भगवद्गीतेंत म्हणतात असें श्रोतृसमाजाच्या पुढें मोठ्या मधुर स्वरानें बोलावयाचें. ही शांभवी विद्या मात्र आम्हांस साधत नाहीं व एवढ्यावरूनच जर पत्रिकाकर्ते आम्हांस हिंदुधर्मद्वेष्टे म्हणत असतील तर खुशाल म्हणोत बापडे.

दुसरा आरोप या पहिल्याचेंच भावंड आहे. पण आम्ही ख्रिस्ती धर्मव्यतिरिक्त इतर धर्मास सर्वोपरी कवडीच्या कामाचे मानतो असें अगदी नाहीं. तर त्यांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें मानतो. तरी त्यांत

कित्येक भाग असे आहेत कीं ज्या आमच्या ख्रिस्ती बांधवांनीं व ख्रिस्ती मुलांनीं त्यांच्या सुदैवानें ते वाचले नाहींत. त्यांच्या वाचनांत ते कधींही न येतील अशी तजवीज आम्ही करितों.

हें एकंदर सर्व ख्रिस्ती लोकांवरच्या आरोपावरच्या शंकेचें निवारण झालें. आतां पत्रिकाकारांच्या म्हणण्याचा आशय असा दिसतो कीं या देशांत जे कोणी कनिष्ट जातींतील लोकांतून ख्रिस्ती होतात त्यांना धर्मशिक्षण म्हणून जें कांहीं मिळतें तें बैबलचें व त्यांचें अध्ययन म्हणजे काय तें बैबलांतील अध्याय व ओव्या. अशी गोष्ट असल्यामुळें त्यांच्यांत हा ख्रिस्ती धर्माविषयीं दुराग्रह वाढत आहे.

आतां धर्मशिक्षण याची पत्रिकाकार काय व्याख्या करीत असतील कोण जाणें. कनिष्ट प्रतीच्या हिंदु लोकांस हिंदुधर्मग्रंथाची माहिती कमी असते ही गोष्ट खरी. पण हा दोष कोणाचा? त्यांचा कीं अतिशूद्रानें अमुक ग्रंथ वाचिला असतां त्याच्या घशांत शिशाचा रस करून ओतावा म्हणून ज्यांनीं नियम केला त्यांचा? त्यांस धर्मसंबंधीं शिक्षण नसतें एवढें उणें काढण्यास मात्र पत्रिकाकारांस फावलें पण त्यांस धर्मशिक्षण देण्याचे त्यांनीं आज प्रार्थनासमाज स्थापन झाल्या दिवसापासून काय काय प्रयत्न केले? आपण खाईना आणि शेजारीण बाईला देईना यांतली ही अवस्था. असो. ही गोष्ट झाली. पण महार मांग लोकांस अगदींच माहिती नसते काय? पूर्वीची काय गोष्ट असेल ती असो पण इंग्रजी झाल्यापासून ती स्थिति अगदीं बदलली आहे. थोड्या वर्षांपूर्वी मी पुण्यांत असतां एका ख्रिस्ती गृहस्थाबरोबर प्रातःकाळीं उपदेशास जात असे. तेव्हां आठवड्यांतून दोनदां महार लोकांस उपदेश करण्याचा त्या ख्रिस्ती गृहस्थांचा परिपाठ असे त्याप्रमाणें मीही त्याजबरोबर गेलों. दोन्हीं ठिकाणीं असें पाहण्यांत आलें कीं त्या लोकांतील पुष्कळ जणांस चांगलें वाचितां येत असून त्यांत जे त्यांचे गुरुजी सारखे प्रमुख गृहस्थ होते त्यांस आमच्या इकडच्या टाळकुट्या हरदासांपेक्षां हिंदुधर्माचें पुष्कळ ज्ञान होतें. व ते गृहस्थ महार हें जर मला कोणी सांगितलें नसतें तर मी त्यांस खुशालपणें देशस्थ ब्राह्मण समजलों असतों. शिवाय खुद्द कार्तीस्वामीच्या भिडेचे ब्राह्मण ज्यांचें अध्ययन अकटोपासून विकटोपर्यंत असे कां थोडे आहेत?

तरी धर्मशिक्षण म्हणून जें कांहीं आहे तें ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत सारखेंच असतें. म्हणजे ‘बाबा देव आपला उत्पन्नकर्ता आहे त्याचें आपण भजन पूजन केलें पाहिजे, सर्व भूतमात्रावर दया केली पाहिजे, आपण आपल्या सर्व कर्मांबद्दल त्या उत्पन्नकर्त्यास जबाबदार आहों’ अशा प्रकारचें ख्रिस्ती मुलांस सांजसकाळीं मिळणारें धर्मशिक्षण जसें ब्राह्मणाच्या किंवा मराठ्याच्या मुलांस दिलें जात नाहीं, तसेंच तें महाराच्या मुलांस दिलें जात नाहीं. पण ज्या प्रकारचें धर्मशिक्षण ब्राह्मणाच्या मुलांस दिलें जातें तशा प्रकारचें मराठ्याच्या व महाराच्या मुलांसही मिळतें. हें धर्मशिक्षण म्हणजे जाती धर्म. ब्राह्मणाचा मुलगा जसा सकाळीं स्नान संध्या करून देवपूजा करितो तसाच मराठ्याचाही मुलगा आंघोळ करून गंध लावतो व तसाच महाराचाही मुलगा जें कांहीं त्याच्या नियमाप्रमाणें करावयाचें तें करितो. मिळून एथून तेथून धर्मशिक्षण म्हणून सर्वांचें सारखेंच. शिवाय अलीकडे संस्कृत ग्रंथांचीं इंग्रजी व मराठी भाषांतरें झाल्यामुळें व तीं पाहिजे त्या लोकांस मिळूं लागल्यामुळें ज्यांस बायबलांतील अध्याय व ओव्या ठाऊक करून घेण्यापुरतें ज्ञान आहे त्यांस कोणत्याही हिंदु धर्मग्रंथाचें साधारणपणें तरी ज्ञान प्राप्त करून घेतां येईल. कनिष्ट प्रतीच्या जातींतील ख्रिस्ती लोकांस ख्रिस्ती शास्त्राखेरीज कोणत्याही धर्मग्रंथाची माहिती नाहीं अशी पत्रिकाकारांची जर समजूत असेल तर ती फार चुकीची आहे. अहमदनगर येथें ईश्वरविद्येच्या वर्गांतील विद्यार्थ्यांची परीक्षा होते त्यावेळीं प्रश्नाच्या कागदांत हिंदुधर्मासंबंधीं किती प्रश्न असतात याचा त्यांनीं शोध करावा.

## कोंकणांतील उपदेशाच्या फेरीचा वृत्तांत

*ज्ञानोदय, ५ डिसेंबर १८८९*

'तूं आपलें अन्न जलावर टाक.' (उपदेशक ११:१)

दिवाळी सणांतील पहिला व मुख्य दिवस नर्कचतुर्दशी याच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे गुरुवार ता. २४ ऑक्टोबर रोजीं फ्री चर्च मिशनरी रे. डॉक्टर मकीखन साहेब व त्यांची पत्नी यांबरोबर, शास्त्री नामक आगबोटींत बसून आम्हीं निघालों तों संध्याकाळीं दिवसाउजेडी बाणकोट येथें येऊन पोचलों. कोंकणांत 'परसांत अफाट समुद्र आणि अंगणांत उंच सह्याद्रि' म्हणून जें बापट यांणीं म्हटलें आहे त्याची, हें गांव पाहिल्याबरोबर आठवण होते. पेशव्यांकडून प्रथमच जे नहु* गांव इंग्रजास मिळाले त्यांपैकीं बाणकोट हा एक होय. येथें कैक वर्षेपर्यंत जिल्ह्याचें सदर स्टेशन असें. पुढें सरकारनें आपलें ठाणें मालवणांस नेलें. शेवटीं तेथून काढून ते रत्नागिरीस आणिलें. हल्लीं हा गांव रत्नागिरी जिल्ह्यांत मोडतो. या ठिकाणीं सरकारी शाळा आहे, तसेंच सर-कारकून कचेरी आहे. शालामास्तर, कचेरींतील कारकून, व तेथें जी एक खाणावळ आहे तींतील मनुष्यें हीच काय ती पांढरपेशे मंडळी. मुख्य वस्ती मुसलमानांची. या ठिकाणीं बडे लोकांसाठीं 'रहदारी बंगला' असून प्राकृत लोकांसाठीं धर्मशाळा आहे. मुंबईहून दासगांवकडे जाणाऱ्यांस व दांसगांवकडून मुंबईकडे येणाऱ्यांस या ठिकाणीं उतरावें लागून एक रात्र काढावी लागते. यामुळें येथें उतारूंची गर्दी फार, आणि धर्मशाळा तर एवढीशी! कंपनीनें धर्मशाळेपुढें मांडव घातला आहे. पण जमीन इतकी मऊ (?) आहे कीं सकाळीं आंगाची कणीक चांगलीच तिंबून निघते. जमीन करण्यास फारसा खर्च येणार आहे असें नाहीं. पण उतारूंच्या सोईकडे लक्ष देतो कोण? 'कोंकणांत केळकर आणि हिंदुस्थानांत होळकर' अशी ज्या केळकरांच्या नांवावरून म्हण पडलेली आहे त्या केळशीच्या केळकरांचा येथें समुद्रकाठीं वाडा आहे. धर्मशाळेच्या मागच्या अंगणांत भिंतीस लागून एक मुसलमानाचें दुकान असून तेथें चहा बिसकिटें, फळ फळावळ, विड्या, पानतंबाखू वगैरे जिन्नस मिळतात. तेथें जवळच एक पांढऱ्या शुभ्र वस्त्रांनीं आच्छादिलेला एक ताबूत आहे. हे दिवस मोहरमाचे नसतां तो ताबूत तेथे असण्याचें कारण असें आहे कीं गेल्या मोहरमांत मानापानाच्या संबंधानें कांहीं लढा पडल्यामुळें त्याच्या यजमानानें तो तसाच तेथें ठेवून दिला आहे व तें सगळेंच प्रकरण भिजत पडलें आहे. रत्नागिरीहून लवकरच टांक साहेब येऊन तो तंटा मिटवून टाकणार आहेत.

बाणकोट या गांवाविषयीं आमच्या फ्री चर्च मिशनाच्या लोकांस मोठें कौतुक वाटतें. याचें कारण हें कीं आमच्या मिशनाचे डॉक्टर विल्सन साहेब व दुसरे कित्येक मिशनरी या गांवीं राहून दक्षिण कोंकणांत उपदेशाचें काम करीत असत. त्या काळांत इकडे फ्री चर्च मिशनाच्या एकंदर ऐंशी शाळा होत्या. एका म्हाताऱ्या मनुष्याच्या सांगण्यावरून कळतें कीं शिपाई लोकांच्या बराकींच्या एका भागांत पाद्री विल्सन साहेब रहात असत. या ठिकाणीं वेळ नसल्यामुळें आम्हांकडून उपदेशाचें काम कांहीं एक झालें नाहीं. असो.

ता. २५ शुक्रवार रोजीं सकाळीं धाकट्या आगबोटींत बसून दासगांवास जाण्याकरितां निघालों. दासगांवास बोटींतून जाणें म्हणजे अर्थात् सावित्री नदींतून. या नदींतून जात असतां दोहों किनाऱ्यावरची शोभा फारच मनोहर दिसते. तशांत आम्हीं सकाळीं जाणारे, मग काय विचारतां? या नदींत दोन लहानशीं बेटें आहेत. त्यांपैकीं धाकट्या बेटाजवळ एक लग्न गडप झालें अशी दंतकथा आहे, म्हणून जेव्हां जेव्हां आतां त्या नदींतून वऱ्हाड मंडळी जाते तेव्हां या बेटाजवळ आल्याबरोबर एक नारळ द्यावा लागतो. बायका मुलें तर तें वलांडून जाईपर्यंत

---

* नव्वद

तोंडांतून ब्रसुद्धां काढीत नाहींत! रात्रीं या ठिकाणीं सूर सनई वगैरे वाद्यांचा मंगल ध्वनि ऐकूं येतो म्हणून सांगतात! धन्य आहे मनुष्याच्या भोळेपणाची. असो.

सुमारें सवादहा वाजतां दासगांवास पोंचलों. महाड तालुक्यांत वस्तीच्या संबंधानें महाडाच्या खालोखाल असें दासगांव हेंच गांव आहे. पण वस्ती फार भिकार दिसते. टुमदारपणा तो कसा नाहींच. मुसलमान, भोई व अतिशूद्र वगैरेंचीं मिळून तीनशेंच्या वर घरें आहेत. मुसलमानांचीं घरें पाऊणशाहून जास्त नाहींत. तरी शाळेंत त्या जातीच्या मुलांचा भरणा फार. येथें कित्येक कोष्ट्यांचीं घरें असून या ठिकाणीं सुती लुगडीं तयार होतात. तीं महाडास विकण्यास नेतात.

या गांवीं हल्लीं जेथें रहदारी बंगला आहे त्याच ठिकाणीं डॉक्टर विल्सन साहेब पंधरा पंधरा दिवस तंबू ठोकून रहात व जवळच्या टेकडीवर फिरावयास जात, असें एका मुसलमानानें आपल्या बापापासून ऐकलेलें सांगितलें. तसेंच विचारपूस करितां असेंहि समजलें कीं थोड्या वर्षांमागें बाबाजी नांवाचे कोणी ख्रिस्ती उपदेशक महाडाहून आठवड्यांतून एकदोनदां येऊन ह्या ठिकाणीं उपदेश करीत असत. हे गृहस्थ अमेरिकन मिशनाच्या संबंधानें असावेत. कारण तेथील एका मुसलमानानें सांगितलें कीं मी मुंबईस जातों तेव्हां त्यांस भेंडीबाजाराच्या देवळापाशीं उपदेश करितांना पहातों. या ठिकाणीं संध्याकाळीं आम्हीं उपदेश केला. मिसेस मकीखन मडमसाहेबही आम्हांबरोबर होत्या. त्या मंडळीस गीत गाऊन दाखवीत. उपदेश झाल्यावर पुस्तकें वाटलीं. अमुक ठिकाणीं अमुकच पुस्तकें वाटलीं याचें जरी आतां स्मरण नाहीं तरी आम्हांपाशीं ख्रीस्तवर्तन, त्रिभुवनाची गोष्ट, शंकानिवृत्ति, हिंदु धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांची तुलना, मूर्तिपूजेविषयीं संभाषणें, आत्मारामपंत आणि मृत्यु शिवाई, पद्यमणिमाला हीं पुस्तकें होतीं. शिवाय चित्रयुक्त बोधाचे सुटे कागदही पुष्कळ होते.

दासगांव येथील टिकिट-मास्तर मुंबईकर वाणी असून त्यांची मातोश्रीही त्यांजबरोबर असते. ही बाई बोलण्याचालण्यांत खळबळीत असून तिला मराठी वाचतां येतें. तिनें मजजवळ 'एक चांगलें परमेश्वराच्या स्तुतीचें पुस्तक' मागितलें. तिनें सांगितलें कीं आम्ही मुंबईंत असतां माझ्या नातीस गोऱ्या मुली शिकविण्यास येत व मंजूळ स्वरानें गाणें गाऊन दाखवीत. बिचारीचीं सारीं नातवंडें एका रात्रीं वाख्यानें* मेलीं. तरी तिला त्या गोऱ्या मुलींची व त्यांनीं गाऊन दाखविलेल्या गाण्यांची आठवण आहे. या मुंबई शहरांत युरोपियन व एतद्देशीय ख्रिस्ती बाया घरोघरीं स्त्रियांस शिकविण्याकरितां जात असतात. त्यांच्या त्या कामांत त्यांस कितपत यश येतें याची मला माहिती नाहीं कारण तो माझा विषयच नव्हे. पण या बाईच्या मनांत 'परमेश्वराच्या स्तुतीचीं' ख्रिस्ती पुस्तकें मागण्याची जी इच्छा उद्भवली ती असल्या शिकवण्यास जाणाऱ्या बायांचें फळ होय.

ता. २६ रोजीं प्रातःकाळीं होडींत बसून महाडास जाण्यास निघालों. ओहटीची वेळ असल्यामुळें होडी चालली होती तेथें पाणी फार उथळ होतें. तळ दिसे व पाण्यांतल्या स्फटिकासारख्या गारा चकाकतांना दिसत. तितक्या पाण्यांतून कोणीहि चालूं शकेल. तरी कांहीं ठिकाणीं पाणी फार खोल असे. नदीच्या दोहों तीरांची शोभा फारच रमणीय दिसे. तशांत सकाळचा वेळ! डॉक्टर मकीखन साहेब व त्यांची पत्नी यांस पदोपदीं स्कॉटलंड देशांतील निरनिराळ्या ठिकाणांचें स्मरण होई! साहजिकच आहे!

या नदीच्या दोहों तिरांवर लवाळ्यासारखें एक प्रकारचें दाट गवत उगवलेलें असतें. त्यास इकडे 'पाईन' व महाबळेश्वराकडे 'कोळुंब' असें म्हणतात. मला वाटतें कीं गवती टोप्या करण्याच्या कामीं या गवताचा उपयोग

---

* महामारीनें

करतां येईल. तसेंच युरोपियन वगैरे लोकांच्या मुलींच्या हातांत सूत, लोंकर वगैरे शिवणकामाचें साहित्य ठेवण्याच्या ज्या लहान मोठ्या सांबळ्या असतात त्याही करितां येतील. आमच्या इकडचे उपपदधारी जे हात धुवून नौकरीच्याच पाठीस लागले आहेत ते अशा कांहीं गोष्टींच्या शोधांकडे मन लावतील तर देशाचें कल्याण होऊन त्यांनीं आपल्या विद्वत्तेचें कांहीं खरें चीज केलें असें होईल.

महाडास म्युनिसिपालिटीची मराठी-इंग्रजी शाळा आहे. तिचें नांव न्यू इंग्लिश स्कूल. संगीत शाकुंतल झाल्यापासून जिकडे तिकडे संगीत पुस्तकें झालीं. त्यांची येथपर्यंत मजल येऊन ठेपली आहे कीं हल्लीं येथें संगीत हजामत नांवाचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. तशींच ही न्यू इंग्लिश स्कुलें बोकळलीं आहेत. कांहीं वर्षांमागें येथें अमेरिकन मिशनाची एक इंग्रजी शाळा होती. पण ती आतां नाहीं.

या गांवीं बाजारपेठेंत टपाल कचेरीजवळ उभें राहून आम्ही उपदेश केला. मंडळी बरीच जमली होती, आणि तीही ब्राह्मण जातीची. पण दंगाधोपा कांहीं एक झाला नाहीं. मागें बऱ्याच वर्षांपूर्वीं रे. बाबासाहेब, डॉक्टर शेषाद्री, हे या गांवीं उपदेश करीत असतां लोकांनीं बरीच दंगल केली होती. तसेंच येथें अमेरिकन मिशनाचें कोणी ख्रिस्ती उपदेशक असत. त्यांसही फार त्रास पोंचे असें ऐकिवांत आहे. पण त्यावेळीं तसा कांहीं प्रकार झाला नाहीं म्हणून आनंद वाटतो.

उपदेशाहून परत आल्यावर तेथील डॉक्टर साहेबांस भेटून त्यांस, त्यांचे मदतनीस यांस, शेजारच्या इंजिनियरच्या कचेरींतील कारकुनांस व गांवांतील कित्येक मुलें पुस्तकांच्या आशेनें बरीच लांब वाट चालून आमच्या बिऱ्हाडाजवळ आलीं होतीं, त्यांसही पुस्तकें दिलीं.

त्यानंतर थोडा उपाहार करून, खटाऱ्यांत बसून पोलादपुरास जाण्याकरितां फुटक्या तीन सांजा निघालों. वाटेनें एक मोठी नदी ओलांडून जावें लागतें. त्या ठिकाणीं व वाट फुटून जाणें येणें दुरापास्त झालें होतें. अशा दुसऱ्या एका ठिकाणीं गुदस्त* सालीं वाचिलेल्या ठगाच्या जबानींतील वारंवार आठवण येई. इंग्रजी राज्यापासून इतर गोष्टींत आमचें कितीही नुकसान झालें असलें तरी ह्या अमलांत आमच्या आज्या-पणज्यांच्या स्वप्नांत देखील आलें नसेल असें स्वास्थ्य आम्ही अनुभवीत आहों यांत संशय नाहीं.

दुसरे दिवशीं म्हणजे ता. २७ रोजीं रविवार होता. त्या विश्रामवारीं पोलादपूर येथें मुक्काम करण्याचा पहिल्यापासून बेत होता, त्याप्रमाणें त्या दिवशीं व सोमवारीं तेथेंच राहिलों.

------------

* मागील वर्षी

## कोंकणांतील उपदेशाच्या फेरीचा वृत्तांत

*ज्ञानोदय, १२ डिसेंबर १८८९*

पोलादपूर हें लहानसेंच पण प्रेक्षणीय गांव आहे. या गांवांत तीन प्रकारच्या लोकांचीं अगदीं निरनिराळीं तीन मकाणें आहेत. एका ठिकाणीं कुणबी लोकांची वस्ती, मध्यें परभु गुजर वगैरे पांढरपेशे लोकांची वस्ती, आणि त्याच्या पलीकडे महारवाडा. कुणबी लोक व महार लोक शेतकी करणारे आहेत. परभु लोकांच्या वतनी जमिनी आहेत व गुजर व्यापार करितात. मारवाडी औषधालाही नाहीं. थोडीं ब्राह्मणांचीं घरें आहेत. हें गांव प्रेक्षणीय आहे इतकेंच नाहीं तर लोकहि खाऊन-पिऊन सुखी दिसतात. या ठिकाणच्या महार वगैरे लोकांची घरें फारच स्वच्छ दिसतात. इतका स्वच्छ महारवाडा आपण अजून कोठें पाहिला नाहीं.

पोलादपूर या गांवाचें पहिलें नांव कोंडवी असें होतें. ह्या गांवीं पोलादजंग म्हणून एक मोंगल सरदार रहात असे. त्याच्या नांवावरून या गांवास हल्लीचें नांव पडलें. पोलादजंगाची कबर गांवाच्या मध्यभागीं शिवरीच्या झाडाखालीं आहे. ती लहानशींच आहे. जवळ एक तांबडें निशाण आहे. या कबरीवर व आसपास पातेरा पडला असून वेली इतक्या वाढल्या आहेत कीं कांहीं दिवसांनीं तें थडगें दिसेनासें होईल. मोंगल सरदाराचें थडगें एक कडकडीत देवस्थान बनलें आहे! हा देव नवसास पावतो! एका परभु गृहस्थानें म्हटलें, ‘फार लांब कशाला? मी एक दिवशीं येथचे एक दोन धोंडे काढून आपल्या आवडांत नेले तों महिनाभर आजारीं पडलों. या थडग्यावरील वेली वगैरे किटाळ काढून कोणी जागा चांगली साफसूफ करूं लागल्यास जंगदेव त्यास तसें करूं देत नाहीं.’ मी म्हटलें, ‘आतांच माझ्या हातांत कोयता घाल तर मी त्या वेली तोडून दाखवितों! या देवताऱ्यानें माझें कांहीं एक बरें वाईट करवत नाहीं.’

या गांवीं नदीतीरीं आमच्या मिशनच्या पहिल्या मिशनरी साहेबांची कबर आहे. तेथें संध्याकाळच्या वेळीं क्षणभर उभें राहून सृष्टींचें सौंदर्य पाहून चित्तवृत्ति गंभीर होऊन गेली व कांहीं वेळ तर आमच्यानें एक शब्दहि बोलवेना. ही कबर चांगल्या सुस्थितींत असून तिच्या रस्त्याकडील बाजूस संगमरवरी शिलेवर इंग्रजी भाषेंत असा एक लेख आहेः- ‘रेव्हरेंड डॉनल्ड मिचेल, स्कॉटिश मिशनरी सोसायटीचे पहिले मिशनरी, यांच्या स्मरणार्थ. या देशांतील अज्ञानतमोग्रस्त लोकांस शुभवर्तमानाचा उपदेशक होण्याकरितां त्यांनीं मुंबईच्या ज्या सैन्यांत ते सनदी नोकर होते तें सोडिलें, परंतु ते आपल्या उपदेशकाच्या सेवेच्या पहिल्या वर्षाच्या आंतच या विश्वासाच्या कामाप्रीत्यर्थ निवडलेल्या जाग्यांतून दूर केले गेले. ते ता. २० नोव्हेंबर १८२३ रोजीं मरण पावले.’

जशी पोलादजंगाची कबर तशीच ही जागाहि एक देवस्थान बनलें आहे. पांढरपेशे लोक या देवांस भजत नाहींत, पण कुणबी व महार वगैरे लग्नकार्याच्या वेळीं किंवा घरांत कोणी आजारी पडले असतां या साहेबाची पिडा समजून त्यास पाव, दारु वगैरे पदार्थ आणून वहातात! अमावस्येस व पौर्णिमेस तो साहेब कोणी न कोणास झपाटतो व ‘मी पाद्री साहेब आहे’ म्हणून सांगतो! त्यावेळीं ही अशी पाव दारूनें त्याची समजूत करावी लागते! कधीं मधीं मध्यरात्रीं गुलबाशीचीं फुलें तोडतांना तो दृष्टीस पडतो, व अलीकडे तर तो लोकांस फार त्रास देऊं लागला आहे असें ते समजतात. अरेरे! या देशांतील अज्ञान घालविण्याकरितां जो आलेला त्याच्या कबरेकडून अज्ञान पसरावें, ज्यानें आजन्मांत कोणास त्रास दिला नसेल तो मेल्यावर इतक्या वर्षांनीं त्रास देतो असा लोकांचा समज व्हावा, आणि ज्यानें दारूस स्पर्शही केला नसेल त्याच्या थड्यापुढें लोकांनीं दारु आणून वहावी ही केवढी दुःखाची गोष्ट आहे! निदान या ठिकाणीं तरी आमच्या मिशनानें एक उपदेशक ठेवावा अशी माझी त्यांस विनंति आहे.

या ठिकाणीं महारवाड्यांत आम्ही एकदां उपदेश केला. मुलें, स्त्रिया व पुरुष यांचा घोळका जमला होता. ती दुपारची वेळ असल्यानें त्यांच्या मागें दुसऱ्या कोणत्याहि कामाचा वेध नव्हता. त्यामुळें तीं सर्व आमचा उपदेश स्वस्थचित्तानें ऐकून होतीं. वाचणाऱ्याच्या नांवानें आवळ्या एवढें पूज! तेव्हां आमच्या सांप्रदायाप्रमाणें उपदेश झाल्यावर पुस्तकें वाटण्याची जरूरच नव्हती.

मध्यवस्तींत एका देवळासमोर नदीच्या घाटावर उभें राहून रविवारीं व सोमवारीं तिसरें प्रहरीं आम्ही उपदेश केला. या दोन्ही प्रसंगीं मुलें, स्त्रिया व पुरुष यांच्या वस्तीच्या मानानें मोठा जमाव असे. मिसेस मकीखन मडमसाहेब नेहमींप्रमाणें गीत गाऊन उपदेशाच्या वेळीं फार मदत करीत.

मंगळवार ता. २९ रोजीं सकाळीं सात वाजतां वाडें येथें जाण्याकरतां निघालों. पोलादपुराहून वाडें सुमारें १४ मैल आहे. वाट सर्व डोंगरांतून जाते. एका ठिकाणीं एक लहानसा धबधबा आहे. तेथें चित्तास फार समाधान वाटतें. वरच्या बाजूस प्रतापगड किल्ल्याचा बुरुज स्पष्ट दिसतो. उतारू लोक येथें उतरून उपहार वगैरे करून व क्षणभर विश्रांति घेऊन पुढें जातात. आम्ही वाड्यांस तिसरें प्रहरीं पोंचलों.

वाडें एक लहानसें खेडें आहे. येथून सातारा जिल्ह्याची हद्द. येथें एक पोलिस कामगार व त्याच्या हाताखालीं आठ शिपाई यांचें ठाणें आहे. इंजिनियरचा क्लार्क या गांवीं रहातो व नहराकडे जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांचा कर घेण्याचें हें ठिकाण आहे. येथेंहि एक रहदारी बंगला आहे. तो लहान आहे तरी इतका सुंदर आहे कीं त्याच्या तोडीचा दुसरा रहदारी बंगला या देशांत नाहीं असें म्हणतात.

या बंगल्याच्या पडवींत बसलें असतां प्रतापगड किल्ला व त्यांतील देवीच्या देवळाचा कळस दिसतो व रात्रीं नगारा झडत असतो त्याचा आवाज येथें ऐकूं येतो. येथून महाबळेश्वर केवळ अकरा मैलांवर आहे. म्हणून जे लोक उन्हाळ्याच्या मोसमांत हवा खाण्याकरितां महाबळेश्वरीं येतात ते एकदां तरी या गांवीं येऊन प्रतापगड पाहून जातात. ज्यांस प्रतापगड पायांनीं चढून जाण्याचें सामर्थ्य नसेल त्यांस खुर्चीवर बसून जाण्याची सोय आहे. खुर्चीकरितां सव्वा दोन रुपये खर्चिलें म्हणलें झालें! प्रतापगड किल्ल्यांत शिवछत्रपतीच्या वेळचें एक प्रसिद्ध देवीचें देऊळ आहे. देवळाच्या पुढें नगारखाना आहे. दर मंगळवारीं, दर पौर्णिमेस येथें नगारा झडतो. शिवाय प्रत्यहीं रात्रीं तीनदां झडतो तो वेगळाच. या देवीविषयीं अशी एक दंतकथा सांगतात कीं ती पहिल्यानें कोल्हापूरजवळ एका तळ्यांत होती. तिनें शिवाजीच्या स्वप्नांत येऊन, मला येथून काढून तुळशी डोंगरावर नेऊन बसवा अशी आज्ञा केली. पण ती कोणाच्या हातीं येईना. शेवटीं तिच्याच सूचनेवरून सोनावळे हवालदार जे हल्लीं या देवीचे पुजारी आहेत त्यांच्या वंशापैकीं एक पुरुष तळ्यांत शिरतांच त्यांच्या हातावर, फुलासारखी हलकी होऊन येऊन बसली!

या किल्ल्याच्या एका बुरुजास अबदुल्लाचा बुरुज असें म्हणतात. त्या ठिकाणीं अबदुल्लाचें शीर पुरल्यावर त्यास हें नांव पडलें आहे. शिवाजीच्या कचेरीची जागा व त्याचा वाडा हीं अगदीं उध्वस्त झालीं होतीं. तरी त्यांत कांहीं ब्राह्मण कुटुंबें गुदस्तापर्यंत रहात असत पण तो गुदस्तां जळून खाक झाला.

अबदुल्ला बुरुजाच्या समोरच एका लहानशा टेंकडीवर अबदुलखानची कबर आहे. प्रतापगडाकडून त्या कबरेकडे जातांना अर्ध्या वाटेवर एक नंदुर्गीचें झाड लागते. त्या ठिकाणीं अबदुल्लाचा शिवाजीनें वध केला असें म्हणतात.

या वधाच्या संबंधानें तेथील लोक अशी कथा सांगतात कीं संकेताप्रमाणें शिवाजी जिवा नांवाच्या एका नाहावी गड्यास बरोबर घेऊन अबदुल्लास भेटण्यासाठीं गेला. भेटीच्या वेळीं अबदुल्लानें शिवाजीची मान बगलेंत इतकी गच्च आवळून धरिली कीं, तो अगदीं व्याकूळ होऊन त्यानें डोळे पांढरे केले. तेव्हां जिवाच्या सूचनेवरून शिवाजीनें हातांतील वाघनख तत्काल त्याच्या पोटांत खुपसिलें. तेव्हां शिवाजीच्या डोक्यावर तरवारीचा वार केला. तेणेंकरून शिवाजी बेसावध झाला. तेव्हां अबदुलखान पोट बांधून पालखींत बसून पळूं लागला. इकडे शिवाजी लवकरच ताजातवाना होऊन त्याच्या मागोमाग लागला. त्याची आणि शिवाजीची वर ज्या नंदुर्गीच्या झाडाचा उल्लेख केला आहे तेथें गांठ पडली. त्यावेळीं शिवाजीनें तरवारीनें त्याचें मुंडकें कापून आणिलें आणि हल्लीं ज्यांस अबदुल्ला बुरुज म्हणतात त्याच्या तटांत पुरीलें.

अबदुल्लाची कबर लहानशीच आहे. तेथून प्रतापगड व आंतील देवीच्या देवळाचा कळस हीं स्पष्ट दिसतात. एकीकडे कोयना नदीचा प्रवाह दिसतो. टेंकडीच्या पायथ्याशीं पाट नांवाचें एक खेडें आहे. अबदुल्ला ज्या ठिकाणीं एक महिनाभर सैन्यासह राहिला होता तें स्थळ तेथून दिसतें. तेथें त्यावेळीं त्यानें लहानसा कोट बांधिला होता. त्याच्या खाणाखुणा अद्याप आहेत.

पहाणारा कोणीही असला तरी ह्या स्थळीं येऊन ह्या सर्व जागा पाहिल्यावर त्याच्या मनाची एक विलक्षण प्रकारची स्थिति होते. शिवछत्रपति गेले, अबदुल्ला खान गेले, हिंदुपदपादशाही मोडली, व यवनी राज्यही अस्तंगत झालें आणि हिंदु आणि मुसलमान ह्या दोघांसही आपलें पूर्व वैर विसरून तिसऱ्याच्याच अमलाखालीं रहावें लागत आहे. हल्लीं जर शिवाजी व अबदुल्ला हे पुन्हां उठले तर दोघांतही आपसांतील वैर विसरून दुसऱ्याच एका कामाला लागावें लागेल, वगैरे नाना प्रकारचे तरंग मनांत उत्पन्न होतात.

या ठिकाणीं उपदेशाचें काम आम्हांकडून कांहीं एक झालें नाहीं म्हटलें तरी चालेल. केवळ तेथील नाकेदारास आम्ही कांहीं पुस्तकें दिलीं तेवढेंच.

येथें आमच्या उपदेशाच्या फेरीचा वृत्तांत संपला.

'येथें थोडें तेथें थोडें' (यशया २८:१०).

------------

## पोलादपूर येथें फ्री चर्च मिशनच्या कामाचा आरंभ

*ज्ञानोदय, २६ जून १८९०*

मुंबईपासून सुमारें १०० मैलांवर चिपळूणच्या वाटेवर सावित्री नदीच्या कांठीं पोलादपूर हें गांव वसलें आहे. या ठिकाणीं सर्व वस्ती हिंदु-मुसलमान यांचीच आहे. ब्राह्मणांचीं घरें फार थोडीं आहेत. पण परभु, गुजर, मराठे व चांभार, महार वगैरे जातींचीं घरें बरींच आहेत.एकंदर लोकसंख्या १४०० आहे. सर्व जातींचे लोक मराठी भाषा बोलतात.

ह्या ठिकाणीं मिशनकामाची सुरुवात करण्याचा निश्चय करून फ्री चर्च मिशनानें त्या कामाकरितां माझीच योजना केली. त्याप्रमाणें ता. १३ माहे फेब्रुवारी रोजीं प्रातःकाळीं येथें येऊन दाखल झालों.

त्याच दिवशीं दोन प्रहरीं चांभारवाड्यांत शाळेच्या कामास सुरुवात केली. पहिल्या दिवशीं एक मुलगा मिळाला. लोक कांहीं केल्या मुलें शाळेंत घालीचनात. मजविषयीं त्यांच्या मनांत निरनिराळ्या कल्पना येऊन चुकल्या होत्या. कोणास वाटे कीं हा आमच्या मुलांस धरून नेण्याकरितां आला आहे. कित्येकांस वाटें कीं, आमच्या मुलांच्या तोंडांत कांहीं पदार्थ घालून त्यांस बाटविण्याकरितां आला आहे. तरी प्रत्यहीं एकेकाच्या दाराशीं जोडेफाड करून समजूत पाडतां पाडतां सुमारें एक महिन्यांत १७ मुलें मिळालीं. हल्लीं हजेरीपटावर ३८ मुलें आहेत. या शाळेस आजपर्यंत सोयीवार स्वतंत्र जागा नव्हती. परंतु मिशनानें या शाळेकरितां म्हणून शाळागृह बांधविल्यामुळें ती अडचण नाहींशी झाली. शाळागृह फारसें सुंदर किंवा ऐसपैस आहे असें नाहीं. तरी गुजर, परभु वगैरे श्रीमंत पांढरपेशे लोकांचीं घरें खेरीज करून त्याची बरोबरी करणारीं थोडींच घरें गांवांत आहेत.

मुलांचें व्यावहारिक व धर्मसंबंधीं ज्ञान बेताचेंच आहे. या शाळेच्या संबंधानें दर रविवारीं शाब्बाथ शाळा भरत असते. मी शास्त्रांतील उपदेशसार हें पुस्तक शिकविण्यास आरंभ केला आहे. शाब्बाथ शाळा सुटल्यावर जे लोक जमतात त्यांस मात्थीचें शुभवर्तमानांतून थोडा थोडा भाग वाचून दाखवितों. मागील शनिवारीं इकडे पेरण्या झाल्या व रविवारीं सहजगत्या पेरणाऱ्याचा दाखला वाचण्याची पाळी आली तेव्हां त्याचा अर्थ त्यांस चांगला समजला व त्यांतील गोष्टी त्यांच्या लक्षांत रहावयाचा बराच संभव आहे हें सांगावयास नको.

मी महार-चांभारांच्या मुलांस धडधडीत शिवतों व त्या लोकांत उघडपणें हिंडतों फिरतों यामुळें पांढरपेशे लोक मला शिवत नाहींत. परीट माझे कपडे धुवीत  नाहींत. दुकानदार जिनसांची पुडी करून दुरूनच अंगावर टाकतो. अशी स्थिति असल्यामुळें पांढरपेशे लोकांत माझें उपदेशाचें काम फारसें चालत नाहीं. त्यांत गुजर लोकांत मुळींच नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

तरी दर शुक्रवारीं सकाळीं ९ वाजतां सरकारी मराठी शाळेजवळ पेठेंत नेमानें उपदेश करीत असतों. त्या वेळीं कधीं कधीं पांढरपेशे लोकांशीं गांठ पडून त्यांशीं धर्मसंबंधीं वादविवाद करण्याचा व त्यांस लहान लहान धर्मसंबंधीं पुस्तकें वाचण्याकरितां बक्षीस देण्याचा प्रसंग मिळतो.

आल्या दिवसापासून सकाळीं नित्य नदीवर स्नानास जात असतों. त्या वेळीं एकीकडे स्नानचें स्नान होऊन दुसरीकडे मराठी गाडीवाले व पाणीधुणें करण्यास आलेल्या आयाबाया यांच्याशीं धर्मसंबंधीं भाषण करण्याचा बहुतकरून प्रसंग मिळतो.

येथील मराठी शाळेचे हेडमास्तर यांचा व माझा स्नेह जडला असल्यामुळें व त्यांचे फर्स्ट असिस्टंट यांचा अल्लिबागचाच संबंध असल्यामुळें त्यांस धर्मसंबंधीं पुस्तकें वाचण्यास देत असतों. लवकरच हेडमास्तर यांस इंग्रजी यात्रिक क्रम समजावून देण्यास सुरुवात करणार आहे.

याचप्रमाणें येथें ख्रिस्ती धर्माच्या घोषणाचें कामास नुकतीच सुरुवात झाली आहे. हें काम जरी फ्री चर्च मिशनानें सुरूं केलें आहे व जरी तें मजकडून सुरूं झालें आहे तरी तें काम फ्री चर्च मिशनाचें किंवा माझें नसून ज्यांना ख्रिस्ताच्या आज्ञा प्रमाण, अशा एकंदर ख्रिस्ती मंडळीचें तें आहे. म्हणून सर्व ख्रिस्ती मित्रांनीं या कामास शुभ चिंतावें व त्याच्या वृद्ध्यर्थ देवाची प्रार्थना करावी अशी त्यांस या दुर्बलाची सविनय प्रार्थना आहे.

------------

## ठाण्याच्या विहिरींत गंगा आली

*ज्ञानोदय, ७ एप्रिल १८९२*

जिल्ह्याचे कलेक्टर वगैरे अधिकारी यांच्या कचेऱ्या जरी जिल्ह्याच्या मुख्य गांवीं असतात तरी, ते जसे मधून मधून बाहेर गांवीं 'स्वारीस' जातात त्याप्रमाणेंच एका तऱ्हेनें गंगेची गोष्ट आहे. गंगेचें मुख्य माहात्म काशीस आहे तरी कधीं मधीं तीही 'स्वारीस' निघते. दर बारा बारा वर्षांनीं बृहस्पति सिंहराशीवर असतां ती एकदां गोदेच्या भेटींस येते पण त्यावेळीं गोदेचें पाणी वाढतें कीं नाहीं याची भ्रांतच आहे. तशीच बहुदा नेमानें बारा वर्षांनीं कोकणांत राजापुरास ती येते. पाच सहा वर्षांपूर्वी अल्लीबागेजवळच्या पैझारी नांवाच्या खेड्यांतील एका डबक्यांत ती आली होती व तेथें भटांची बरीच पोळी पिकली होती. शेवटीं सोमवार ता. २१ मार्च १८९२ रोजीं तिनें ठाणेंकरांसही एकदांचें दर्शन दिलें. येथें स्टेशन रोडवर पारशाच्या दारुच्या गुत्याच्या समोरच रस्त्याच्या बाजूस एक जुनी विहीर आहे. सुरखी टांक असून सोमवारीं तिसरें प्रहरीं एकाएकीं तींत सुमारें दोन पुरुष पाणी चढलें. 'गंगा आली' ही बातमी लवकरच जिकडे तिकडे पसरून तेथें बरीच गर्दी जमली व स्नानाचा तडाका सुरूं झाला. संकल्प सांगणारे ब्राह्मण मात्र कोठें दिसले नाहींत. स्नानें करणाऱ्या भाविकांत पांढरपेशी मंडळी मुळींच नव्हती म्हटली तरी चालेल. एका कुणब्याची आंघोळ खलास झाल्याबरोबर तो बऱ्याच मोठ्यानें पण आपणाशींच म्हणतो, 'चला पाप धुतलें'. बिचाऱ्याला कांहीं विशेष पाप टोंचीत होते कीं काय कोण जाणें.

दक्षिण कॅलिफोर्निया प्रांतांत ज्या ठिकाणीं पूर्वी सर्व प्रदेश वालुकामय असून जेथें पाण्याचा एक थेंबही नव्हता अशा ३० मैल रुंदीचें साल्टन लेक नामक जें एक मोठें सरोवर थोड्या दिवसांपूर्वी एकाएकीं उत्पन्न झालें तसा कांहीं प्रकार जर आमच्या इकडे झाला तर सर्व तीर्थेंच एकवट होऊन अवतीर्ण झालीं असें म्हणतील व 'न्हाव्या भटा झाली धणी' असें होईल.

एखादां ख्रिस्ती उपदेशक उपदेश करूं लागला असतां आमचे इंग्रजी शिकलेले तरूण पुढें होऊन आपल्या शास्त्रीय (सायंटिफिक) ज्ञानाचें मोठें पांडित्य करून दाखवितात. पण तेच राजश्री ग्रहण पर्वणी झाली, 'गंगा आली' किंवा अशीच एकादी लोकांस अद्भुत वाटणारी गोष्ट घडली कीं त्यांचें ज्योतिषशास्त्र व त्यांची 'फिजिकल जिऑग्रफी' कोणीकडे जाऊन बसते ह्याचा पत्ताच लागत नाहीं. खरोखर आमच्या लोकांत अजून नैतिक धैर्य फार कमी आहे. दुःखाची गोष्ट.

श्लोक
भुजंगप्रयात

जया मानवा सत्यता मुक्तता दे।
खरा मुक्त तो मर्त्य लोकांत नांदे ।
नसे मुक्तता अन्य कोणां मिळाली ।
परी गुंतलें सर्वही दास्यजाळीं ॥

ठाणें, ता. २४ मार्च १८९२

------------

## ठाणें जिल्ह्यांतील शुभवर्तमानाच्या प्रसाराचें काम

*ज्ञानोदय, १ डिसेंबर १८९२, ८ डिसेंबर १८९२*

'अंधळे पाहतात, पांगळे चालतात, कोडी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठतात, व दरिद्र्यांस शुभवर्तमान सांगण्यात येतें.' (लूक ७:२२)

मंगळवार आक्टोबर ता. २५ रोजीं कर्जतास पोंचलों. तेथील धर्मशाळेंत बिऱ्हाड लावून 'कोणास औषधें पाहिजे असतील तर तिसरें प्रहरीं फुकट मिळतील' अशी बातमी गांवभर पसरण्याची तजवीज करून डाक्टर लाजरस व मी कर्जतच्या जवळच उल्लास नदी पलीकडे दहीवली म्हणून एक मोठा ब्राह्मणवस्तीचा गांव आहे त्या ठिकाणीं गेलों. जातानां थोडक्यांत चुकलें नाहीं तर होडी पालथी होऊन आम्हांस जलसमाधि मिळण्याची वेळ आली होती. पण आम्ही आणखी कांहीं दिवस 'जीवंतांच्या भूमींत' रहावें असा ईश्वरी संकेत होता म्हणून सुखरूप पलीकडे पोचलों. दहीवलींत गेल्यावर एका शिंप्याच्या दुकानांत बसून उपदेश केला. वेळ दुपारची होती म्हणून श्रोते मंडळीचा मोठा घोळका नव्हता, तरी बरेच लोक होते. उपदेश झाल्यावर आम्हीं ट्राक्टें वांटलीं. नंतर आम्ही कर्जतास परत आलों. या ठिकाणीं हें एकदांच सांगून ठेवितों कीं ज्या ज्या ठिकाणीं डाक्टर लाजारस जातात त्या त्या ठिकाणीं, मग ते फक्त उपदेशाकरितां गेलेले असोत, घरीं जाऊन खाटेस खिळलेल्या रोग्यास येऊन पहाण्याची लोक विनवणी करितात, व तेही आनंदानें त्यांची ती विनंती मान्य करून त्यांच्या घरीं जातात, व दुखणाइतांच्या रोगांची काळजीपूर्वक चिकित्सा करून त्यांस ताबडतोब औषधांची यादी लिहून देतात. मग औषधांची पेटी संगती असल्यावर त्यांस ताबडतोब औषध मिळतें, पण संगती पेटी नसल्यास त्यांस ठाण्यांस यावें लागतें, तरी रोग्यांस स्वतां येण्याची दगदग वांचते. या गोष्टींत गरीब श्रीमंत, उंच नीच याचा कांहीं एक भेद ते करीत नाहींत म्हणून या जिल्हाभर ते फार लोकप्रिय झाले आहेत. असो. कर्जतास परत येऊन पहातों तों तेथें लोक आमची वाट पहात बसले आहेत. त्यांस रात्र पडेपर्यंत औषधें दिलीं, उपदेश केला व ट्राक्टें वांटलीं.

दुसरें दिवशीं मि. सांवळ्याराम चक्रनारायण व मि. आनंदराव पटेकर यांनीं वेणगांवांस जाऊन उपदेश केला. वेणगांव हा लहानसाच पण ब्राह्मणवस्तीचा गांव आहे. वेळ सकाळची होती म्हणून त्यांस पुष्कळ श्रोते मंडळी मिळाली. उपदेश फार चांगला झाला. नंतर वादविवाद झाला. पृच्छकांच्या प्रश्नांस उत्तरेंही पण चांगलीं समर्पक मिळालीं. तसेंच तेथें त्यांनीं ट्राक्टेंहीं वांटलीं. नंतर आम्ही खोपवलीस येऊन पोंचलों व तेथील एका जुन्या मोडक्या इमारतींत बिऱ्हाड लाविलें. खोपवली हा गांव पूर्वीं फार रहदारीचा होता. पण हल्लीं तो अगदीं मोडकळीस आला आहे. या ठिकाणीं एक महादेवाचें देऊळ आहे. त्या समोरील नंदी व पोखरण हीं पाहण्यासारखीं आहेत. तशा प्रकारचा सुबक नंदी सगळ्या हिंदुस्थानांत नाहीं असें म्हणतात. हें देऊळ व पोखरण हीं नाना फडणवीस यांनीं बांधिलीं असें सांगतात. तसेंच येथून जवळच लहानशा टेंकडीवर एक विठोबाचें देऊळ आहे. मि. विनायकराव व मी उभे राहिलों व दुसऱ्या ठिकाणीं डाक्टर लाजरस व मि. सांवळ्याराम उभे राहिले. दोन्हीही ठिकाणीं पुष्कळ लोक जमून बराच उपदेश झाला. नंतर बिऱ्हाडीं परत आल्यावर औषधें दिलीं, उपदेश केला व ट्राक्टें वांटलीं.

दुसरें दिवशीं खालापुरास आलों. आम्ही आल्याची बातमी लवकरच गांवभर पसरली, तेव्हांपासून लोक औषधांकरितां येऊं लागले. एक घोळका गेला कीं दुसरा येई. रात्र पडून अंधार पडेपर्यंत असें चाललें होतें. थोडा वेळ जेवणानिमित्त व एक तासभर आम्ही गांवांत उपदेशास गेलों होतों तोंच काय तो विसांवा!

गांवांत आम्ही सगळ्यांनीं एकाच ठिकाणीं उभे राहून उपदेश केला. या ठिकाणीं पुष्कळ लोक जमले. ते सर्व पांढरपेशे होते. उपदेशही चांगला झाला. नंतर पुन्हां धर्मशाळेंत परत येऊन औषधें देऊं लागलों. या फेरीच्या वेळीं सातारा येथील रे. ब्रूस साहेब यांनीं तयार करून छापिलेल्या 'कर्म मार्ग व्यर्थ' नामक हस्तपत्रकाचा भक्कम पुरवठा आम्ही आपणाबरोबर घेतला होता व ब्राह्मण वगैरे पांढरपेशे लोकांस देणें झालें म्हणजे तींच ट्राक्टें फार करून देत असूं.

दुसरें दिवशीं चौकास आलों. या ठिकाणीं मारवाडी लोकांची बरींच दुकानें आहेत व त्यांची पोळी बरीच पिकते असें दिसलें. तेथील रहदारी बंगल्यांत आम्ही उतरलों होतों तेथें तिसरें प्रहरीं पुष्कळ लोक जमले. त्यांस आम्हीं औषधें दिलीं, उपदेश केला व ट्राक्टें वांटलीं. संध्याकाळीं गांवांत उपदेश केला. त्यावेळीं पुष्कळ लोक जमले होते. पण विशेष हा कीं त्यांत मारवाडी लोक बरेच होते.

दुसरें दिवशीं पनवेलीस जाण्याकरितां निघालों. पनवेलच्या वाटेवर अगदीं सडकेस लागून चौक व पनवेल यांच्या मध्यावर बारव म्हणून एक खेडेंगांव आहे. तेथें शूद्र, अतिशूद्र वगैरे गरीब लोकांची बरीच मोठी वस्ती आहे. सगळ्या गांवांत एक वाचणारा! तेव्हां एकापेक्षां अधिक ट्राक्टें वांटण्याची खटपट पडलीच नाहीं. या भिकार खेड्यांतल्या त्या गरीब लोकांच्या कल्याणाकरितां म्हणून एकही संस्था नाहीं. पण त्यांच्या देहाच्या व आत्म्याच्या नाशाकरितां एक दारूचा गुत्ता मात्र अगदीं गांवाजवळच चांगल्या सोईवार ठिकाणीं ठेवून दिला आहे!

येथून पुढें थोड्या अंतरावर सडकेच्या बाजूस पानतंबाखूचीं कांहीं दुकानें आहेत. त्या ठिकाणीं एक मुसलमान एक मोठें थोरलें हिंदुस्थानी पुस्तक वाचीत बसला होता. माझ्या विनंतीवरून 'इसा अलेसलाम' विषयीं जी गोष्ट तो वाचीत होता ती पुन्हां त्यानें पहिल्यापासून अखेरपर्यंत वाचून दाखविली. नुकतेंच परवां मुसलमानी धर्माची दीक्षा स्वीकारल्यावर वेब साहेबांनीं आपल्या व्याख्यानांत 'अब्राहम झाला त्यापूर्वीं मी आहे' (योहान ८:५८) या ओवीचें आपल्या पदरचें नवीन भाषांतर करून येशूचें देवपण नष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्याप्रमाणें येशूच्या चरित्रांतील एक गोष्ट फिरवून लिहून, तो इतर पैगंबरांप्रमाणेंच एक पैगंबरच आहे असें भासविण्याचा प्रयत्न केला होता. म्हणून आम्हांस फार दुःख वाटलें. आम्हांपाशीं हिंदुस्थानी नवा करार नव्हता व त्या मुसलमानास मराठीचें फारसें ज्ञान असल्याचें दिसलें नाहीं, म्हणून दुःखानें पण निरुपायामुळें त्यांस कांहीं एक उत्तर न करितां पुढें चालतें झालों, व पनवेलीस येऊन पोंचलों.

या ठिकाणीं आल्यावर जेवणखाण होऊन जरा ऊन उतरल्यावर आम्ही गांवांत गेलों. या ठिकाणीं सरकारी दवाखाना आहे. यामुळें औषधें देण्याची जरुरी दिसली नाहीं. प्रथम आम्ही दवाखान्यांत जाऊन डाक्टर साहेबांची भेट घेतली. हे डाक्टर इस्राएल आहेत. यांचा पुष्कळ ख्रिस्ती गृहस्थांशीं परिचय आहे. ख्रिस्ती लोकांशीं त्यांचें वर्तन नेहमीं सौजन्याचें असतें. त्यांतून डाक्टर लाजरस हे त्यांच्या चांगल्या ओळखीचे आहेत. म्हणून त्यांनीं आम्हां सर्वांचा चांगला आदरसत्कार केला. 'बिऱ्हाडपाण्याची सोय नसेल तर तीही करितो' म्हणून सांगितलें. थोड्या वेळानें त्यांनीं आम्हांस त्यांच्या दवाखान्याजवळ एक हिंदुस्थानी शाळा आहे ती पहावयास नेलें. ह्या शाळेंत मुसलमानांचीं मुलें व मुलीं शिकतात. विद्यार्थ्यांची संख्या बरीच मोठी आहे. मुलींस शिकविण्यांस एक मुसलमानीन बाई आहे. मुलांस थोडें मराठीही शिकवितात. डाक्टर लाजरस यांनीं व मी मिळून मुलामुलींच्या अभ्यासाची थोडी चांचणी पाहिली, अभ्यास फार चांगला चालतो व एकंदर व्यवस्था फार चांगली आहे. येथील डाक्टरसाहेबांच्या देखरेखीखालीं ह्या शाळेची फार सुधारणा होत आहे.

ही शाळा पाहून झाल्यावर आम्ही रा. रा. सखारामशास्त्री व कृष्णशास्त्री वैद्य यांचा 'शास्त्रोक्त व अनुभविक औषधें' तयार करण्याचा कारखाना पहाण्यास गेलों. एतद्देशीय औषधांचा एवढा मोठा कारखाना आपण कधीं कोठें पाहिला नाहीं असें डाक्टर लाजरस यांचें म्हणणें आहे. या कारखान्यांत तयार होणाऱ्या औषधांपैकीं कित्येक औषधांचा पनवेल येथील डाक्टर दवाखान्यांत व आपल्या कुटुंबांत उपयोग करीत असतात, व तीं फार गुणकारी आहेत असें त्यांस दिसून आलें आहे. कुमारी आसव हें औषध लहान मुलांस देण्यांस फार उपयोगी आहे. तसेंच डाक्टर लाजरस म्हणतात कीं इंग्रजी खोकल्याच्या औषधानें ज्यांस गुण येत नाहीं त्यांस या कारखान्यांतलें औषध फार चांगलें लागू पडतें. डा. लाजरस नेहमीं पुष्कळ एतद्देशीय औषधें वापरीत असतात. असो. शास्त्री मजकूर यांनीं आम्हांस आपला सर्व दवाखाना दाखविला. नंतर नमुन्याखातर म्हणून डा. लाजरस यांस कित्येक औषधें दिलीं. तसेंच आम्हां सर्वांस औषधांच्या यादीचें पुस्तक व जाहिराती दिल्या व शेवटीं पानसुपारी देऊन आमची चांगली बोळवण केली.

संध्याकाळीं बाजारांतल्या मुख्य नाक्यावर उभे राहून आम्ही उपदेश केला. हिंदु मुसलमान वगैरे सर्व जातीच्या लोकांची मोठी भीड झाली होती व सर्वांची भाषणें होईपर्यंत एक सारखी तशीच गर्दी होती. उपदेशाच्या ठिकाणीं पनवेल येथील डाक्टर, फौजदार वगैरे कामगार मंडळी आली असून पोलीसचा फार चांगला बंदोबस्त होता. कांहीं एक दंगाधोपा झाला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तळोज्यास आलों. या ठिकाणीं आम्ही उपदेश केला नाहीं किंवा फारशीं ट्राक्टेंहीं वाटलीं नाहींत. तरी तो आदितवारचा दिवस असल्यामुळें जशी आम्ही ठाण्यास दर आदितवारीं भक्ति करितो तशी तेथेंही केली. त्यावेळीं पुष्कळ लोक सभोवतीं जमून आमच्या 'नमाजी'चा तो सर्व प्रकार पहात होते. तेव्हां त्यावेळीं झालेला उपदेश शांत रीतीनें लक्ष देऊन त्यांनीं ऐकिला. येथें पुष्कळ लोकांस औषधें देण्यांत आलीं. रात्रीं दहा वाजेपर्यंत औषधें देतच होतों. औषधें वाटतां वाटतां आम्ही अगदीं कंटाळून गेलों. मुसलमान लोक जात्याच मोठे पाहुणचार करणारे. तशांत येथील मुसलमान फार श्रीमंत. शिवाय डाक्टर लाजरस यांस ते चांगले ओळखीत. आणि त्यांनीं खुद्द त्यांच्याच गांवीं जाऊन कित्येक घरीं जाऊन त्यांस औषधें दिलीं. मग काय विचारतां? चहा पितां पितां व गोड घास खातां खातां आम्ही विटून गेलों. रात्रीं जेवणाचीही खूप चंगळ उडाली. दुसरें दिवशीं सकाळीं 'बडे फज्रर' निघून मुंबईस आलों व तेथून आगगाडींत बसून ठाण्यास सुखरूप येऊन पोंचलों.

या उपदेशाच्या फेरीच्या हकीकतींत कांहीं एक फुगवून लिहिलें नाहीं. वर्णन करण्यासारख्या शेंकडों गोष्टी व त्यावेळीं प्रसंगोपात्त सुचलेले विचार हीं सर्व सोडून द्यावीं लागलीं तरी आम्हां सर्वांचा ज्या गोष्टींविषयीं बळकट ग्रह झाला असे कित्येक विचार लिहिल्यावांचून माझ्यानें ही हकीकत पुरी करवत नाहीं. (१) येशू ख्रिस्त या जगांत असतां त्याच्या जवळ नाना रोगांनीं व पीडांनीं त्रस्त झालेलीं माणसें येत असत तेव्हां तो कसा दुःखकारक देखावा दिसत असेल, त्यांचा त्यास कसा कळवळा येत असेल, व त्यांचीं दुखणीं व रोग बरीं करितां करितां व त्यांस उपदेश करितां करितां मनुष्य या नात्यानें तो कसा श्रमून जात असेल व त्यास अन्न खाण्यास देखील कशी फुरसत होत नसेल या गोष्टीचें जणुं हुबेहूब चित्र आमच्या मनावर उमटून गेलें. (२) 'बापाच्या अन्यायामुळें लेंकरांचें शासन' कसें होतें हेंही आम्हांस पूर्तेपणीं समजून आलें. जे लोक देवाचा नियम मोडून 'वीसनखीची बाधा' मुद्दाम विकत घेतात त्याचें शासन त्यांस तर होतेंच, पण त्यांच्या बायकांस व लेकरांसही त्यांच्या त्या पापाचें प्रायश्चित्त भोगावें लागतें. ख्रिस्ती शास्त्रांत सांगितलेलें वचन खरें आहे. (३) शुभवर्तमानाचा प्रसार करण्याच्या कामीं 'औषधें देणें ' हें केवढें बलवत्तर साधन आहे हेंही आम्हांस दिसून आलें. सर्व ठिकाणीं आमचा जो मोठा मान झाला तो 'दादा संगीं वहिनी सोयरी' या नात्यानें. दादा नसला तर वहिनीस कोण पुसत

होतें? ख्रिस्ती उपदेशकाचा मान बहुदा शेण, माती, धोंडे यांनीं व्हावयाचा. पण जवळ औषधांची पेटी असली म्हणजे तोच प्रकार किती निराळा असतो! (४) ख्रिस्ती लोकांनीं आपापल्या पूर्वाश्रमांतला पोषाक ठेविल्यावरून त्यांस पाहिल्याबरोबर लोक कसे खवळतात व दंगा करण्यास प्रवृत्त होतात हेंही आम्हांस पक्के दिसून आलें. आम्ही निरनिराळ्या ठिकाणीं जोडी जोडीनें उभे रहात असूं त्यावेळीं एक बूटपाटलोनवाला तर एक धोतरवाला अशी जोडी करावी लागे. त्याचें मर्म काय असेल? आमची तर पक्की खातरी होऊन चुकली कीं ख्रिस्ती उपदेशकांस बूटपाटलोनीचाच पोषाख अधिक सुखाचा व विशेष निर्भय होय.

या फेरींत व अशा प्रकारच्या दुसऱ्या प्रसंगीं मिळून शेंकडों लोकांस पुष्कळ औषधें देण्यांत येऊन शुभवर्तमान गाजविण्यांत आलें. तसेंच शेंकडों ट्राक्टेंही वांटण्यांत आलीं. याबद्दल,

आम्हां देवा नको । तुजची केवळ ॥
असो सदाकाळ । थोरपण ॥

असें आम्ही म्हणतो. ईश्वरानें या कामावर व अशा प्रकारच्या आम्हांकडून व इतरांकडून होणाऱ्या दुसऱ्या कामांवर आपला विपुल आशीर्वाद पाठवून योग्यकाळीं 'कोठें तीसपट, कोठें साठपट व कोठें शंभरपट पीक द्यावें' म्हणून प्रार्थना करण्याची ख्रिस्ती मित्रांस विनंती करून रजा घेतों.

------------

## कर्जत वर्णन

*ज्ञानोदय, १० ऑगस्ट १८९३*

आज पुष्कळ दिवसांपासून आमच्या मिशनच्या संबंधांतील खिस्ती लोकांनीं या ठिकाणीं जाऊन येऊन उपदेशाचें काम केलेलें आहे. परंतु आजपर्यंत तेथें कायमचें ठाणें घातलेलें नव्हतें.

कर्जत हें गांव मुंबईपासून सुमारें ६२ मैलांवर, ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेलवेच्या लाईनीवर, मुंबई व पुणें यांच्या बरोबर मध्यावर, कोंकणच्या माथ्याशीं व घाटाच्या पायथ्याशीं वसलेलें आहे. खुद्द हें गांव फारसें मोठें नाहीं. तरी हें आगगाडीचें व तालुक्याचें ठिकाण असल्यामुळें प्रतिवर्षीं येथील वस्ती वाढत आहे. पांच दहा वर्षांत हें लहानसें टूमदार शहर बनेल यांत संशय नाहीं. याच्या सभोंवतीं मोठ्या वस्तीचें गांव व खेडींपाडीं पुष्कळ असून कोठें पायीं अगर घोड्यावरून, कोठें बैलगाडींतून व कोठें आगगाडींतून अशा तिन्ही चारी प्रकारांनीं बाहेरगांवीं जाण्यायेण्याची फार सोय आहे.

तसेंच या कर्जत तालुक्यांत मोठमोठ्या वस्तीचे जे पुष्कळ गांव आहेत त्यांची ही विशेष तऱ्हा आहे कीं ते गांव जरी ब्राह्मण मराठे वगैरे लोकांनीं भरलेले आहेत तरी त्या गांवांच्या शेजारींच कातवाडी धनगर लोकांचीही तशीच मोठी वस्ती आहे. महार वगैरेची मात्र फार तुरळक वस्ती आहे. तेव्हां सुधारणेच्या व विद्वत्तेच्या शिखरांस पोचलेले जे ब्राह्मण त्यांपासून तो तहत कंदमुळें खाऊन जीव रक्षण करणारे व विद्येच्या व सुधारणेच्या नांवानें त्यांचें आवळ्याएवढें पूज्य असे  वनचर जे कातवाडी त्यांपर्यंत अशा सर्व जातींच्या व स्थितींतल्या लोकांची या प्रांतांत वस्ती आहे. तेव्हां या वरील दोन्ही कारणांमुळें मिशनचें ठाणें घालण्यास हा गांव फार सोयीचा आहे यांत संशय नाहीं.

तेव्हां अशा या ठिकाणीं कायमचें मिशन ठाणें घालण्याचा विचार बरेंच दिवसांपासून आमच्या मिशनरी मंडळांत घाटत होता. शेवटीं एकदां कायमचा निश्चय होऊन ठाणें घालण्याचा ठराव झाला, व येथें काम करण्यास मि. विनायकराव पटेकर यांस मजबरोबर मदतीस देऊन या ठिकाणीं जाण्याचा मला हुकूम झाला. तेव्हां त्या हुकुमाबरहुकूम होईल तितकी त्वरा करून घराची वगैरे तजवीज झाल्यावर गेल्या मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत आम्ही येथें येऊन दाखल झालों व एप्रिल महिन्याच्या आरंभापासून कामास खरी सुरुवात झाली. इतर सर्वत्र ठिकाणीं मिशन कामाच्या ज्या शाखा सुरू असतात त्या बहुतेक सर्व या ठिकाणीं सुरू आहेत, म्हणजेः-

(१) डाक्टर लाजरस हे दर मंगळवारी येऊन जे कोणी रोगी मिळतील त्यांस औषध देतात. या औषधें देण्याकडून पुष्कळ लोकांची - स्त्रियांची व मुलांची - देखील ओळख पडते व त्यांचा व आपला ऋणानुबंध होतो.

(२) रोज सकाळीं साडेअकरा वाजेपासून तों दीड वोजेपर्यंत एक इंग्रजी वर्ग भरतो. तो मी शिकवितों. आधीं ती इंग्रजी शाळा आणि तशांत मामलेदार, अव्वल कारकून, नाईक पोस्ट मास्तर, टिकीट मास्तर, वगैरे कामदार लोकांचीं व इतर उदमी लोकांचीं मुलें तींत असल्यामुळें गांवांतील मोठ्या लोकांची ओळख पडते, व त्यामुळें फायदा हा होतो. येथें किंवा बाहेरगांवीं लोकांवर वजन पडून उपदेशाच्या वेळीं कोणी गडबड करीत नाहींत. तसेंच ख्रिस्ती उपदेशक म्हणजे आपले नुसते 'बायबल मास्तर' असा जो लोकांचा समज झालेला आहे तोही

नाहींसा होतो. तेव्हां अशा दोन्ही प्रकारांनीं या शाळेकडून मला उपयोग असा होतो कीं शाब्बाथ शाळेच्या कामास या शाळेकडून फार साह्य होतें.

(३) दर रविवारीं सकाळीं शाब्बाथ शाळा भरते व तिसरे प्रहरीं ईश्वरोपासना होते. हीं दोन्हीं कामें मलाच करावीं लागतात.

(४) रविवार खेरीज करून प्रत्येक दिवशीं सकाळीं अगर संध्याकाळीं बाहेरगांवीं उपदेशास जातों. हल्लीं पावसामुळें हें काम नियमित चालत नाहीं.

(५) आमच्या घरीं जे लोक भेटीस अगर 'सहज बसावयास' येतात त्यांच्याशीं धर्मसंबंधीं भाषण चालतें. असे प्रसंग वारंवार येतात.

(६) ख्रिस्ती पुस्तकें व पत्रिका यांचा बराच संग्रह मजपाशीं आहे व तो दर महिन्यास वाढत आहे. ट्राक्ट सोसैटीचीं लहान लहान पुस्तकें, फुकट वांटण्याचीं पत्रकें व मुलांसाठीं चित्रयुक्त गोष्टींचीं पत्रकें यांचा बराच संग्रह मजपाशीं आहे. तसेंच सातारा येथील रे. ब्रूस साहेब हेही मेहरबानीनें आपल्या कोलंबियन प्रेसांत छापलेल्या पत्रिका मला मोफत पाठवितात. तेव्हां या पुस्तकांचा व पत्रिकांचा वरील सर्व प्रसंगीं उपयोग होतो. म्हणजे औषधें घेणाऱ्या दुखणेंकऱ्यांस व त्यांबरोबर आलेल्या त्यांच्या नातलगांस, इंग्रजी वर्गांतील व शाब्बाथ शाळेंतील मुलांस, बाहेर उपदेश ऐकण्यास जमलेल्या श्रोते मंडळीस, घरीं भेटीस अगर 'सहज बसावयास' येणाऱ्या गृहस्थांस, कोणांस पुस्तकें व बहुतकरून सर्वांस पत्रिका वांटतों. शिवाय ज्ञानोदय, बालबोधमेवा, ऐक्यप्रदर्शपत्रिका, प्रॉग्रेस वगैरे साप्ताहिक व मासिक पुस्तकें मी घेत असतों ती लोकांस वाचायास देतों.

यावरून दिसून येईल कीं ख्रिस्ती धर्माचे ज्ञानाचा प्रसार करण्याचे जे प्रकार आहेत त्यांतील बहुतेक येथें सुरूं झाले आहेत. तूर्त हे प्रकार केवळ बाल्यावस्थेंत आहेत. तेव्हां तूर्त तरी हा 'माणसाच्या हाताएवढा ढग समुद्रांतून वर चढत आहे' असें दिसतें. तरी लवकरच 'ढगांनीं व वाऱ्यांनीं आकाश काळें होऊन मोठा पाऊस' पडावा व 'आहावास रथावर बसून इज्रेलास जाणें भाग' पडावें अशी आमची आशा व प्रार्थना आहे, व तशीच ज्ञानोदयाच्या ख्रिस्ती वाचकांची असावी अशी माझी त्यांस विनंती आहे.

ता. क. येथील कामाची देखरेख करण्याकरितां मुंबईचे रे. डॉक्टर मकीकन साहेब हे वारंवार येत असतात.

------------

## रामचंद्र बाळाजी केसकर यांच्या परिचयाचा लाभ

*रामचंद्र बाळाजी केसकर ह्यांच्या १८९३ साली प्रसिद्ध झालेल्या*
*'सत्यस्वीकार' ह्या अल्पचरित्रात हरिपंत केळकर यांनीं लिहिलेला लेख*

सन १८८१ च्या फेब्रुवारी महिन्यांत पेण येथील फ्री चर्च मिशनच्या मराठी शाळेवर हेड मास्तरच्या जागीं रे. गणपतराव रघुनाथ नवलकर यांनीं माझी नेमणूक केली. व त्याप्रमाणें त्या महिन्याच्या १५व्या तारखेस मीं आपल्या कामाचा चार्ज घेतला. तेव्हांपासून माझा आणि मि. केसकर यांचा एके ठिकाणीं संबंध आला. कारण ते त्या ठिकाणीं फ्री चर्च मिशनाचें क्याटिकिस्टचें, शाळेच्या देखरेखीचें व शाळेंत मुलांस धर्मशिक्षण देण्याचें काम करीत असत.

प्रथम कांहीं दिवस आमची शाळा इस्राएल लोकांच्या मशिदीच्या पडवींत असे. तेव्हां मि. केसकर यांचा व माझा अर्थाअर्थी संबंध नसे. त्यांची दिवसांतून एकदोनदां फेरी होई त्यावेळीं केवळ सलामी मात्र होई. पुढें फ्री चर्च मिशनानें एक मोठें घर घेऊन त्यांतच मि. केसकर व त्यांचें कुटुंब यांची राहण्याची व एका भागांत शाळा बसण्याची सोय केली. तेव्हांपासून त्यांचा सहवास मला विशेष होऊं लागला.

ब्राह्मण लोकांच्या बोलण्यांत बसल्या उठल्या शिव्या कशा येतात हें आपणांस प्रत्यक्ष अनुभवावरून ठाऊकच असेल. त्याप्रमाणेंच माझ्याही तोंडांत शिव्या वारंवार येत. एके दिवशीं आम्ही दोघेजण बोलत बसलों असतां त्यांचा मेहुणा दाराची कडी काढीत होता. ती त्यांस कांहीं केल्या निघेना, तेव्हां मी म्हटलें ती …कडी तशीच आहे. त्यांनीं म्हटलें ती …ची आहे कीं गरतीची* आहे हें सांगणें अमळ कठीण. मि. केसकर यांजकडून मला जो पहिला उपदेश झाला तो हाच. त्या दिवसापासून मी जी शिवी सोडून दिली ती दिलीच.

मि. केसकर हे माझ्या वर्गांतील मुलांस धर्मसंबंधीं शिक्षण देत असतां, मला तेथेंच राहावें लागत असें, व जरी मी कधीं कधीं खालच्या वर्गावर जाऊन त्यावेळीं त्यांचे धडे म्हणून घेत असे तरी हा सगळा खटला एकाच दालनांत असल्यामुळें, ते जें कांहीं पहिल्या तीन वर्गांस शिकवीत ते रोज रोज मला ऐकावेंच लागे. ते मार्कसाचें शुभवर्तमान शिकवीत असत. धर्मशिक्षणाचा वर्ग चालला असतां, वारंवार माझ्या मनांत येई कीं, या पुस्तकांतल्या कथा शिकवीत असतां हे नीति शिकवितात हें काय? त्यांत नीति कोठून आली? व दुसऱ्या अनेक शंका उत्पन्न होत. पण त्या त्यावेळीं विचारण्यासारिख्या नव्हत्या. म्हणून मी सुटी झाल्यावर घटका अर्ध घटका बसून मि. केसकर यांजपाशीं वादविवाद करूं लागलों. ते वादविवाद करण्याच्या भरीस फारसे न पडतां मला पुस्तकें वाचावयास देत व तीं लक्षपूर्वक वाचण्याविषयीं आग्रह करीत. त्यांचीं धर्मसंबंधीं मतें जरी मला प्रिय व मान्य नसत तरी त्यांचा सहवास मला फार प्रिय वाटे. पहिल्या प्रथमच जें त्यांनीं मला पुस्तक वाचावयास दिलें तें 'सिद्धांत रत्नमाला' नामक होतें असें वाटतें. एकामागून एक अशीं ख्रिस्ती पुस्तकें वाचण्याचा मला नाद लागला. मि. केसकर यांजपाशीं मराठी ख्रिस्ती पुस्तकांचा भरणा फार असे. त्यावेळीं जीं मीं पुस्तकें वाचलीं, त्यांत एक दोन खेरीज करून बाकीचीं सर्व आमचे प्रसिद्ध पंडित बाबा पदमनजी यांनीं लिहिलेलीं होतीं. परमेश्वर त्या पुरुषास शतायुषी करो. अस्तु.

या प्रकारें करून मि. केसकर यांचा आणि माझा फारच घट्ट परिचय झाला. त्यांशीं अनेक वादविवाद झाले. त्यांची मला आतां आठवण नाहीं. पण दोन गोष्टींची मात्र मला फारच चांगली आठवण आहे. एकदां यांनीं असें

* कुलीन स्त्रीची

म्हटलें कीं ख्रिस्ती धर्माविषयींचा अनुभव मनास येतो. मीं म्हटलें, बरें माझ्या मनास जर असा कांहीं साक्षात्कार होईल तर मी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करीन. दुसरी गोष्ट मला आठवते, ती ही कीं, ते म्हणाले, कोणताही भक्त एकदम पूर्ण होत नाहीं, तर सद्गुणांत वाढत वाढत पूर्णत्वापर्यंत जाऊन पोंचतो. ह्या ज्या दोन गोष्टी मीं लिहिल्या आहेत ह्यांचें कोणास त्या वाचून फार महत्व न वाटेल तर न वाटो, पण माझ्या मनावर त्यावेळीं त्यांचा जो सुपरिणाम झाला त्याची माझी मलाच फारशी कल्पना होत नाहीं. मग बिचाऱ्या तिऱ्हाईत वाचकाचा काय पाड?

अशा रीतीनें त्यांचा मला सहवास फारच होऊन मी अर्धामुर्धा ख्रिस्तीच बनलों. तेव्हां ते मला वारंवार फिरावयास घेऊन जाऊन नदी-तीरीं मजसंगतीं एकांतीं प्रार्थना करीत, व अनेक भक्तांच्या धर्मांतराच्या वेळच्या गोष्टी सांगत.

पुढें मी ख्रिस्ती झाल्यावरही त्यांच्याच घरीं बिऱ्हाडास असे. त्यावेळीं त्यांजकडून मला अनेक लाभ झाले आहेत. पुढें मी अलिबागेस गेलों. तेथें जाण्यापूर्वीं एक दोन दिवस त्यांनीं नित्याच्या सायंकाळच्या भक्तीच्या वेळीं तिमथ्यसाला पौलसानें जें म्हटलें आहे कीं, ‘मुला, तिमथ्यसा, ही ठेव सांभाळ’ त्यावरून त्यांनीं मला फार चांगला उपदेश केला. तो उपदेश मी विसरलों, पण ते शब्द मात्र ध्यानांत राहिले आहेत. ते तसेच जन्मभर ध्यानांत राहिले म्हणजे पुरें.

मि. केसकर हे वादविवादाच्या कामांत मोठे बहादर होते. तरी वर्मी भाषण त्यांच्या बोलण्यांत कधीं येत नसे. हे फार अशक्त असत पण कष्टाळू असत. प्रत्येक आठवड्यांत एक दिवस लायब्ररींत, एक दिवस दवाखान्यांत व शनिवारीं इस्राएल लोकांच्या मशिदींत बसावयास जाऊन तेथें मुद्दाम बोलण्याचा प्रसंग आणून धर्मसंबंधीं वादविवाद करण्याचा त्यांचा क्रम असे. याशिवाय चांभारवाड्यांत मिशनाची शाळा झाल्यावर तर शाळेंतील मुलांच्या अनुषंगानें त्यांच्या वडील माणसांस उपदेश होत असे. उत्तम उपदेश पुष्कळांस करितां येतो, पण यांच्या उपदेशाची मुख्य खुबी ही असे कीं, ते प्रसंगास अनुसरून उपदेश करीत. ही खुबी थोडक्यांसच साधते. ती मि. केसकर यांस साधली होती.

मि. केसकर हे मोंगलाईंत बरेच दिवस राहिलेले असल्यामुळें त्यांस हिंदुस्थानी बोलण्याचा चांगला सराव पडला होता. ती त्यांची विद्या त्यांस बरीच उपयोगी पडे. पेण येथें मुसलमान लोकांची बरीच वस्ती असून आमची शाळा भर मुसलमान मोहल्यांत व इस्राएल मोहल्याच्या शेजारीं अशी असे. व त्यामुळें मि. केसकर यांना मुसलमान लोकांशीं वादविवाद करण्यांस वारंवार प्रसंग मिळे. व जेव्हां जेव्हां दोन शब्द बोलण्याचा प्रसंग येई तेव्हां तो साधण्याचें तर त्यांचें ब्रीदच असे. मुसलमान लोक त्यांशीं फार मित्रत्वानें वागत.

इस्राएल लोकांचा तर त्यांनीं फारच लोभ संपादिला होता. मि. केसकर हे एक इस्राएलच बनून गेले होते. हे आपल्या मुलांस हिब्रू शिकण्यांस त्यांच्या शाळेंत पाठवात. त्यांच्या अनेक जमातीच्या प्रकरणांत त्यांस सल्लामसलत देण्यांस एका पायावर तयार असत. इस्राएल लोकांत ज्या कित्येक मूर्तिपूजकांच्या चाली आढळत त्यांचा समूळ निःपात करण्याविषयीं ते आग्रहपूर्वक विनंति करीत. इस्राएल लोकांत त्यांनीं अनेक सुधारणा केल्या. त्यांपैकीं महत्वाची ही कीं, मराठी जुना करार वाचण्याकडे त्यांनीं त्यांचें लक्ष फार लाविलें. इस्राएल बहुदा जुना करार हिब्रूमध्यें त्याचा अर्थ न समजतां वाचतात व तेवढ्यानें आपण कृतकृत्य झालों असें मानितात. ही शोचनीय स्थिति पाहून मि. केसकर यांनीं जीवापाड मेहनत करून अशी व्यवस्था केली कीं, शनिवारीं नित्यक्रमाप्रमाणें हिब्रू प्रार्थना वगैरे आटोपल्यावर त्यांनीं एका ठिकाणीं बसून मराठी जुन्या कराराचा एक अध्याय

वाचावा. मि. केसकर हेच बहुदा वाचीत व त्याचा अर्थ सांगत. याशिवाय इतर दिवशीं ख्रिस्ती धर्मसंबंधानें त्यांच्याशीं अनेक वेळां वादविवाद होई तो वेगळाच.

हिंदु लोकांतही यांचा थोडाथोडा परिचय होऊं लागला होता व कित्येक ठिकाणीं हिंदु गृहस्थांकडूनही त्यांस धर्मसंबंधीं भाषण करण्याकरितां निमंत्रणें येऊं लागलीं होतीं, व कित्येकांचा त्यांच्याच घरीं येऊन भाषण करण्याचा परिपाठ पडत चालला होता. पण इतक्यांत फ्री चर्च मिशनानें आपलें काम संपुष्टांत आणल्यामुळें त्यांस पेण सोडून जावें लागलें.

मि. केसकर हे पेणेस केवळ दोन वर्षें होते. इतक्यांत त्यांनीं आपला बराच रिघाव* करून घेतला होता. इस्राएल लोक तर त्यांस आपला खरा हितचिंतक मानीत. इस्राएलांची जमात भरली आणि त्यांत मि. केसकर नाहींत अशी गोष्ट बहुदा घडत नसे.

मि. केसकर यांचा ज्यांच्या ज्यांच्याशीं म्हणून सहवास झाला होता, त्यांस त्यांस संगती फार गोड वाटे, त्यांच्यावर मि. केसकर यांच्या सद्वर्तनाची इतकी छाप बसे कीं, ती सांगतां पुरवत नाहीं. एकदां त्यांजबरोबर मी संध्याकाळीं एका दुकानावर कांहीं माल खरेदी करण्यांस गेलों होतों. तो दुकानदार तर त्या दिवशीं दारू प्याला होता. तो चांगला खडखडीत हुशार होता पण त्याच्या तोंडाचा दर्प मारीत होता. त्यानें मि. केसकर यांस दुकानांत येऊन बसतां क्षणींच म्हटलें, मि. केसकर, मला माफ करा. माझें पोट दुखत होतें. अशा अनेक गोष्टी सांगतां येतील. ही वरील गोष्ट केवळ उदाहरणार्थ दाखविली आहे.

रेव. गणपतराव रघुनाथ नवलकर यांची मि. केसकर यांच्या चांगुलपणाविषयीं व प्रामाणिकपणाविषयीं फार पूज्य बुद्धि असे व ते मि. केसकर यांजवर फार लोभ करीत.

मि. केसकर यांचीं मुलें त्यांजवर फार लोभ करीत. कित्येकांच्या घरीं अशी स्थिति असते कीं, बाबा आले कीं, जिकडे तिकडे सामसूम. मुलें कोनांत आणि बायको चुलीशीं. मि. केसकर यांच्या घरची गोष्ट अगदीं निराळी असे. ते बाहेरून घरीं आले कीं, सर्वांस आनंद व्हावा. असें जरी असे तरी यांचा मुलांवर दाब नसे असें अगदीं नाहीं. मारकुट्या बापाचा जो आपल्या मुलांवर दाब असतो त्यांपेक्षां यांचा कांकणभर सरसच असे.

मि. केसकर यांचा स्वभाव फार दयाळू असे. पेण एथें एक शिंपी असे, तो जब्बर दारुड्या असे. त्यानें दारु पिऊन झिंगून मुसलमान मोहल्ल्यांतून बरळत जावें. मुसलमान हे स्वभावानें पडले हूड. ते त्याची चेष्टा करीत. त्यासरसें तो चिडून त्यांची त्रयी उद्धरी. मग काय विचारतां! हे पाषाणहृदयी त्यास फरमाशी मार देत. त्याच्या नाकावर बुक्के मारून त्याचा गुणगुणा फोडीत. अशा वेळीं हा पाप्यांच्या मित्रांचा एकनिष्ठ भक्त मध्यें पडून त्यांस सोडवी. तो शुद्धीवर आल्यावर त्यास बोध करी. ह्याचा परिणाम असा झाला कीं, तो भर झिंगला असतां मि. केसकर यांनीं लक्षुमण! म्हटल्याबरोबर पोरासारखा त्यांच्याजवळ येऊन बसे. असाच क्रम कांहीं दिवस चालला तर तो खचीत सुधरता. थोडथोडा सुधरूं लागलाच होता.

ज्या पुरुषाकडून या पाप्यास ख्रिस्त पाप्यांस उद्धरितो ही आनंदाची बातमी कळली, त्याविषयीं प्रेमपुरस्सर व सन्मान्यबुद्धीनें ज्या ह्या चार ओळी लिहिल्या आहेत, त्यांकडून त्या पुरुषाचीं पेण येथील सर्व कृत्यें किंवा

* प्रवेश

त्याच्या सद्गुणाचें यथातथ्य वर्णन जसें व्हावें तसें बिलकुल झालें नाहीं म्हणून माझें मन विषण्ण (उदास) झालें आहे. तरी यांत जें लिहिलें आहे तें सर्व खरें आहे. त्यांत वाढवून कांहीं एक लिहिलें नाहीं. उलटें ज्या पुष्कळ गोष्टी अवश्यमेव लिहावयास पाहिजे होत्या त्या लिहावयाच्या राहिल्या आहेत. फार दिवसांमुळें त्या माझ्या आठवणींतून निघून गेल्या आहेत.

मि. केसकर हे आम्हांस आणखी पुष्कळ वर्षें पाहिजे होते. पण ईश्वर जें कांहीं करितों तें चांगलेंच करितों. परमेश्वराच्या शास्त्रांत म्हटलें आहे कीं, 'बलाकडून नाहीं, पराक्रमाकडून नाहीं, तर माझ्या आत्म्याकडून ...' (जखर्या अ. ४:६). तरी पवित्र आत्मा मनुष्यरूपी साधनांकडून आपलें कार्य करवितो व अशा प्रकारचीं साधनें जीं आजपर्यंत झालीं तशांतलेच हे आमचे प्रिय व सन्मान्य स्वर्गवासी बंधु रामचंद्र बाळाजी केसकर होते यांत संशय नाहीं.

------------

# आत्मिक कृपादानें

*ज्ञानोदय, २२ फेब्रुवारी १८९४*

१ आत्मिक देणग्या विश्वासणाऱ्यांमध्यें सर्वत्रांस वांटून दिलेल्या आहेत. त्या देणग्या तालांताप्रमाणें* व मोहरांप्रमाणें पुरुष स्त्रिया या उभयतांसही वांटून दिलेल्या आहेत. आपण प्रत्येक जण त्यांबद्दल जबाबदार आहों. त्या देणग्या मिळण्याचें वचन अवघ्यांस आहे. तसेंच एका शरीराच्या सर्व अवयवांस, मग ते साधारण असोत, अगर असाधारण असोत, त्या सर्वांस त्यांची गरज आहे.

२ राजा जशा आपल्या इच्छेनुरुप आपल्या सेवकांस देणग्या देतो त्याप्रमाणें ह्या देणग्या दिलेल्या आहेत. ह्या देणग्या आपल्या आपण वांटून अगर निवडून घेण्याच्या नाहींत. ईश्वराचें प्रत्येक करणें सकारण असतें. पण तें कारण नेहमींच प्रकट करीत नाहीं. आमच्या प्रभूची आई होण्यास मारयेलाच कां निवडलें? हल्लींच्या काळच्या उपदेशकांत इतरांपेक्षां कित्येकांस मात्र पवित्र आत्म्याचें दान विशेषेंकरून कां आहे? लाक्षणिक अर्थानें म्हटलेल्या शरीराच्या प्रत्येक अवयवांस - त्यांतल्या अगदीं अशक्त अवयवांस सुद्धां - एकमेकांनीं एकमेकांची काळजी वहावी व एकमेकांची आत्मिकसेवा करावी म्हणून, ईश्वरानें आपल्या इच्छेनुरुप ह्या देणग्या दिलेल्या आहेत. ह्या देणग्यांविषयीं करिंथकरांस पहिलें पत्र याच्या बाराव्या अध्यायाच्या ८, ९, १० ह्या ओव्यांत वर्णन केलेलें आहे.

३ आपलें शरीर एक पण अवयव वेगळे वेगळे व प्रत्येक अवयवाचें काम वेगळें वेगळें. जरी प्रत्येक अवयवाचें काम निरनिराळ्या प्रकारचें व वेगळें वेगळें आहे तरी परमेश्वरानें त्या सर्व अवयवांस एकाच शरीरांत ठेविलें आहे. प्रत्येकाचें काम वेगळें आहे तरी ही गोष्ट त्यांच्यांत फूट पडण्यांस कारण होत नाहीं. आपल्या ठायीं एखादी विशेष देणगी आहे म्हणून आपण चढून जाऊं नये. तसेंच आपल्या ठायीं असलेल्या देणग्या क्षुल्लक आहेत म्हणून खिन्न होऊं नये. शरीरांत आपली जागा कोठें आहे ती शोधून तेथें सेवा करीत रहावें. सर्व प्रकारची सेवा, मग ती मोठी असो कीं हलकी असो, ती आत्म्याच्या सामर्थ्याकडून ख्रिस्ताच्या भागीदारपणांतली अशी आहे.

४ आत्मिक देणग्या ह्या, सेवेसाठीं सर्वांस वांटून दिलेल्या आहेत. ही गोष्ट आपण ओळखावी व प्रचारांत ती उपयोगांत आणावी. प्राचीनकालिक मंडळी ही गोष्ट ओळखून ती ते पुष्कळपणें प्रचारांत उपयोगांत आणीत असत. मनुष्याच्या ठिकाणीं ज्या नैसर्गिक देणग्या आहेत त्यांच मात्र ते उपयोगांत आणीत असें नाहीं. तर ज्या आत्मिक देणग्या परमेश्वरानें मनुष्यांस दिलेल्या आहेत त्याही ते उपयोगांत आणीत असत. मनुष्याचें ज्ञान व शक्ति हीं अपूर्ण समजून तीं तें एका बाजूस ठेवीत. त्याकाळीं मंडळींत एकच मनुष्य सेवा करी असें नाहीं, तर सर्वजण - अगदीं हलके देखील - आपल्या देणग्यांचा उपयोग करीत असत. ह्या गोष्टीमुळें पद्धतवारीनें व नियंत्रित रीतीनें होणारीं कामें हीं एका बाजूस रहात. पण आत्म्याच्या स्वतंत्रतेकडून नेमशास्त्राचें बंधन नष्ट होतें हें उघडच आहे. हे सेवेचे प्रकार व ही सेवा करणारे ह्यांचें वर्गीकरण पहिलें करिंथ १२:२७-३० यांत केलें आहे.

५ ख्रीस्त हा देवाचा पुत्र व मनुष्याचा जेष्टबंधु या नात्यानें ह्या सर्व देणग्या त्याच्या आहेत. आत्मे ख्रिस्ताला पतकरितात किंवा नाकारितात ह्याची ह्या गोष्टीवरून परीक्षा होते. ख्रिस्त हा शुभवर्तमानाच्या द्वारें उपदेश व काम करूं लागला. मंडळीला सुद्धां ख्रिस्त - अर्थात् मर्यादित अर्थानें - असें म्हटलें आहे.

---

* तालांत = talent, एक नाणे

६ पवित्रांची आत्मिक गोष्टींत वृद्धि व्हावी, पाप्यांनीं ईश्वराकडे फिरावें ह्यासाठीं ह्या देणग्या दिलेल्या आहेत. रिकामटेंकड्या चौकसणांकरितां, जगीक नफ्याकरितां अगर स्वतांच्या नफ्याकरितां ह्या देणग्या दिलेल्या नाहींत. त्या साक्ष पटविण्यासाठीं व दुसऱ्यांवर उपकार करण्यासाठीं नाहींत. त्यांचा कसा विनियोग करावा ह्याविषयीं (१ करिंथ १२:७, प्रे. ६:३, १:८, १ करिंथ १४:२३-३१) या शास्त्रभागांत नियम घालून दिलेले आहेत.

७ आत्मिक देणग्यांचा उपयोग करणें हें साधारणपणें पवित्राच्या इच्छेवर अवलंबून आहे. या देणग्यांचा उपयोग करणें ही आपल्या स्वाधीनची गोष्ट आहे. जर आपण शब्दांवाचून आत्मिक देणग्यांचा उपयोग करूं तर आपण धर्मवेडे असे होऊं. तसेंच जर आपण आत्मिक देणगी असल्यावांचून शब्दांचा उपयोग करूं तर आपण कर्मनिष्ठ बनूं. प्राचीन काळच्या भक्तांस पाळीपाळीनें बोलण्यास, अर्थ सांगण्यास व अशा रीतीनें गोंधळ न होऊं देण्यास सांगितलें होतें.

८ जेव्हां आपणांस न्यायीपणा व पुत्रपणा हीं प्राप्त होतात तेव्हां ह्या देणग्या प्राप्त होतात व आपल्या ठायीं सदोदित रहातात. न्यायीकरण व पवित्रीकरण ह्यापासून त्या अगदीं वेगळ्या आहेत. जुन्या धर्म व्यवस्थेच्या काळीं जरी त्या अल्पकाळ रहाणाऱ्या होत्या तरी पन्नासाव्या दिवसाच्या सणापासून पुत्रपणाच्या पूर्ण आत्म्याकडून, त्या सतत रहाणाऱ्या आहेत. जसजशी आपली धारणशक्ति वाढत जाईल तसतशा ह्या आत्मिक देणग्या अधिकाधिक व पुन्हां पुन्हां मिळत जातील. 'तुम्ही विश्वास धरून पवित्र आत्मा पावलां काय?' जेव्हां आपण पवित्र आत्म्यानें भरलें जातों त्यावेळीं व विशेषेंकरून आपण सेवा करीत असतां आपल्या मनांस त्याविषयीं ज्ञान होते. ह्या पवित्र आत्म्याच्या भरण्याकडून आपण धीट, उद्योगी, उत्सुक, शहाणे व उपयोगी असे होतों. साधारणपणें आपणांस हें सामर्थ्य मान्य होण्याकडून, प्रार्थनेकडून व आज्ञा पाळण्याकडून प्राप्त होतें. आपण आपल्या ठायीं असलेल्या देणग्यांची हयगय करूं नये तर त्यांस अधिकाधिक उत्तेजित करीत जावें. आपण त्यांचा उपयोग केला नाहीं तर त्या गमावून बसूं.

९ ह्या देणग्या विश्वासाच्या द्वारें, ईश्वरी प्रीतीच्या स्वभावाकडून उपयोगांत आणण्यांच्या आहेत. पहिल्या करिंथकरांच्या पत्राच्या तेराव्या अध्यायावरून हें दिसून येतें. आत्मिक देणग्यांची हांव धरण्यापेक्षां आपला आवेश दाखविण्याचा हा अधिक चांगला मार्ग आहे. प. क. तेरावा अध्याय हा एक प्रीतीचें स्तोत्र आहे. पवित्र आत्म्याच्या कामाबद्दल ज्या दोन अध्यायांत वर्णन केलेलें आहे. तो आपणांस शिकवितो कीं जसा तारणाचा उगम प्रीतींत झाला आहे तसाच त्याचा प्रसारही प्रीतीची आवड व प्रीतीचा नियम ह्यांच्या संमेलनाकडून झाला पाहिजे. आज्ञा म्हणून एखादी गोष्ट आपणाकडून होणार नाहीं पण प्रीतीमुळें सहज होते. विश्वास ठेवणें, प्रीति करणें, दुःख सोसणें हा साधूंचा नित्यक्रमच आहे. म्हणून आपणांस प्रीतीची आवश्यकता, प्रीतीचे गुणधर्म व प्रीतीचें श्रेष्ठत्व ह्या गोष्टी उघड करून सांगितलेल्या आहेत.

१० भविष्य सांगणें म्हणजे लौकिकांत उपदेश करणें हीही प्रीतीसारखी एक मोठी देणगी आहे. जगास प्रकट केलेला जो राजकीय विधि तो हाच होय. जीवंत, अभिषिक्त साक्षीदारांकडून जो शास्त्राचा उपदेश केला जातो तो पवित्र आत्म्याचें सर्वश्रेष्ठ साधन आहे. आपणांस प्रीतियुक्त अंतःकरणें व अग्नीच्या जिव्हा पाहिजेत.

------------

## न्यायांत पक्षपात करणें बरें नाहीं

*ज्ञानोदय, ५ एप्रिल १८९४*

थोडे दिवसांपूर्वी मी आपल्या हुद्याच्या कामाच्या संबंधानें मावळांतील एक गांवीं गेलों होतों. त्यावेळीं तेथील सरकारी शाळेंतील मुलांस दिलेल्या इनाम पुस्तकांत 'ख्रिस्ती बंधुजनांस विनंति' हें पुस्तक पाहून मी चकित झालों. सरकार धर्मसंबंधानें अगदीं तिऱ्हाईतपणानें वागतें. ख्रिश्चन लिटरेचर सोसायटीनें केलेलें 'आरोग्यमार्ग' हें पुस्तक सरकारनें घेतलें तेव्हां त्या पुस्तकांतील अख्रिश्चन लोकांस नाटतील असे शब्द व वाक्यें खोडून काढून त्याची सोवळी आवृत्ति तयार केली तेव्हां तें पुस्तक सरकारी शाळांत सुरूं केलें. आतां सरकारचा धर्मसंबंधीं तिऱ्हाईतपणा वाजवीपेक्षां फाजील आहे. पण, तसा जर आहे, तर बुद्ध्या ख्रिस्ती धर्माविरुद्ध लिहिलेलें हें पुस्तक सरकारी शाळेंत डे. ए. इन्स्पेक्टर यांनीं कसें इनाम द्यावें हें मला कळत नाहीं. अख्रिस्ती लोकांच्या धर्मभोळेपणाविरुद्ध ज्यांत एखादें दुसरें वाक्य आहे असें पुस्तक ख्रिस्ती सरकारच्या विद्याखात्याच्या अधिकाऱ्यांस खपत नाहीं. पण ख्रिस्ती धर्माविरुद्ध लिहिलेलें पुस्तक खुशाल खपतें हा मोठा विचित्र बाणकोटी न्याय आहे. बरें या पुस्तकांतील वादश्रेणी मोठी जोरदार आहे अगर भाषा मोठी प्रगल्भ आहे असेंही नाहीं. तसें असतें तरी देखील असलें पुस्तक सरकारी शाळेंत इनाम देणें योग्य झालें नसतें. ट्राक्ट सोसायटीनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांपैकीं एखादें दुसरें पुस्तक सरकारी शाळेंत इनाम दिलें असें कधीं झालें आहे काय? निदान मला तरी असें कोठें आढळलें नाहीं. झालें तें झालें. पण यापुढें तरी अशी गोष्ट होऊं नये म्हणून शाळा खात्याच्या अधिकाऱ्यांच्या नजरेस ही गोष्ट आणण्याकरितां ह्या चार ओळी लिहिल्या आहे.

------------

## क्षत्रियांचीं कुलें

*ज्ञानोदय, १७ मार्च १८९५*

हल्लीं या हिंदुस्थान देशांत मराठे लोकांचीं जीं अनेक कुलें विद्यमान आहेत, तीं सर्व मूळचीं क्षत्रिय कुलें असून मुख्य तीन पुरुषांच्या वंशविस्तारापासून झालेलीं आहेत. म्हणून सरेव मराठ्यांचे सूर्यवंशी, सोमवंशी व शेषवंशी असे तीन मुख्य भेद आहेत. पण यदु हा सोमवंशांतील होता तरी यदुवंश हा मानिलेला आहे.

सूर्यवंश, सोमवंश अगर चंद्रवंश, व शेषवंश हे प्रथम कोणत्या पुरुषापासून सुरूं झाले ह्याविषयीं कथा अशी आहे.

सूर्यवंश :- ब्रह्मदेवापासून अत्री जन्मला. त्यापासून सोम अगर चंद्र झाला. त्या चंद्रापासून बुध जन्मला. बुधापासून पुरुखा झाला. पुरुखापासून दक्ष झाला. त्या दक्षास एक कन्यारत्न झालें. तिचें अदिती असें नांव ठेवलें. दक्षराजानें कश्यप ऋषीस बोलावून आणून त्यास ती आपली कन्या अदिती अर्पिली. त्या अदितीच्या पोटीं सूर्याचा जन्म झाला. सूर्यापासून सूर्यवंशाचा विस्तार झाला.

सोमवंश अगर चंद्रवंश :- श्रावण म्हणून एक महान पराक्रमी सूर्यवंशी राजा होता. त्यानें सूर्याबरोबर युद्ध करून सूर्यास जिंकिलें. तेव्हां सूर्यानें आपली कन्या सोमप्रभा श्रावणराजांस दिली. त्या सोमप्रभेस जो मुलगा झाला त्यापासून सोमवंश झाला.

शेषवंश :- द्वापारयुगीं मांधाता नामक सोमवंशी राजा राज्य करीत असे. त्याच्या स्त्रीचें नांव भानुमती असें होतें. त्या राजानें अविचारानें तिच्याशीं अबोला धरिला. ती भानुमती एके दिवशीं गंगातीरीं स्नानांस चालली असतां तिनें विश्वामित्र ऋषीस येतांना पाहिलें. तिनें विश्वामित्रांस राजानें आपल्याशीं अबोला धरल्याची कथा सांगून स्वामींनीं कृपा करून 'आम्हां उभयतांची प्रीती व्हावी' असें करावें म्हणून विज्ञापना केली. तेव्हां ऋषीनें जल अभिमंत्रून तें एका कुपींत भरून तिला दिलें व घरीं गेल्यावर पतीचें मस्तकीं हें जल सिंचन कर म्हणजे क्षण न लागतां तो तुला वश्य होईल म्हणून सांगितलें. याप्रमाणें बोलून ऋषी निघून गेल्यावर भानुमतीनें ती कुपी उघडून पाहिली तों त्या कुपींतल्या जळाचा एक थेंब 'अवचट' भूमीवर पडला. तो जलबिंदु धरणी भेदीत जाऊन त्यानें शेषाच्या फणेस स्पर्श केला. तेव्हां शेष पृथ्वीवर येऊन तिला भोग देऊन निघून गेला. तेव्हां या शेषापासून भानुमतीस श्रीधर नामक पुत्र झाला. त्या श्रीधरास सोमवंशांतील महीपाल राजानें आपली लावण्यवती कन्या देऊन त्यांस आपला घरजांवई केलें व पुढें त्या श्रीधरास राज्याभिषेक करून महीपाल राजा तपश्चर्येस निघून गेला. त्या श्रीधरांस लावण्यवतीचें उदरीं जो पुत्र झाला त्यापासून शेषवंशाचा विस्तार झाला.

यदुवंश :- यदुवंशांत ययाती नांवाचा एक महापराक्रमी राजा होऊन गेला. त्याचा प्रथम पुत्र यदु हा मोठा प्रख्यात झाला व त्यापासून पुढें यदुवंशाचा विस्तार झाला.

### या प्रत्येक वंशांतील शककर्ते पुरुष

सूर्यवंशः- या वंशांत विक्रम म्हणून जो राजा झाला त्यानें युधिष्ठिराचा शक बंद करून आपला शक चालूं केला. या शकास विक्रमादित्य संवत् अशी संज्ञा आहे. हा शक हिंदुस्थानांत अद्याप चालूं आहे.

सोमवंश अगर चंद्रवंशः- या वंशांत पांडव जन्मले. पांडवांतील वडील भाऊ युधिष्ठिर याचा शक बराच काळ चालूं होता, पण पुढें तो विक्रमानें बंद केला.

शेषवंशः- या वंशांत शालीवाहन हा 'पैठण नगरामाझारीं ब्राह्मण कन्येचिया उदरीं शेष विर्याचिया भरोवरीं जन्मला.' त्यानें दक्षिणेंत विक्रम शक बंद करून आपला शक चालूं केला. त्याचा शक महाराष्ट्र देशांत अद्याप चालूं आहे.

### या प्रत्येक वंशांतील कुळ्या

### सूर्यवंशांतील कुळ्या

(१) सुर्वे - अजपाळ राजा सूर्यवंशीयांचे कुलांत झाला. तक्तगादी -अयोध्या पट्टण. यांचीं कुलेंः- १ सितोळे २ गवसे ३ नाईक ४ थाड ५ राऊत ६ सुर्वे. हीं सहा कुलें मिळून सुर्वेकुळी.

(२) पोवार - मयूरध्वज राजा सूर्यवंशी याचे कुलांत झाला. तक्तगादी- पायगड. यांचीं कुलें - १ पोवार २ धारराव ३ पाळवे ४ दळवी ५ कदम ६ बिचारे ७ सालव. हीं सात कुलें मिळून पोवारकुळी.

(३) भोंसले - भोजराजा सूर्यवंशी याचें कुल. तक्तगादी - नागपूर. यांचीं कुलें - १ भोंसले २ संकपाळ ३ राव ४ नकासे. हीं चार कुलें मिळून भोंसलेकुळी.

(४) घोरपडे - हरिश्चंद्र राजा सूर्यवंशी यांचे कुल. तक्तगादी - पैठण. यांचीं कुलें - १ घोरपडे २ मालप ३ पारंधे ४ बलवडे. हीं चार कुलें मिळून घोरपडेकुळी.

(५) राणे - सुधन्वा राजा सूर्यवंशी याचें कुल. तक्तगादी - उदेपूर. यांचीं कुलें -१ राणे २ दुधे ३ सीगवन ४ मुलीक ५ पाठक. हीं पांच कुलें मिळून राणेकुळी.

(६) शिंदे - भद्रसेन राजा सूर्यवंशी याचें कुल. तक्तगादी - ग्वाल्हेर. शिंदे बारा प्रकारचे आहेत तरी त्या सर्वांचें उपनांव एकच.

(७) साळुंके - हंसध्वज राजा सूर्यवंशी याचें कुल. तक्तगादी - दिल्ली. यांचीं कुलें - १ साळुंके २ वाघमारे ३ घारगे ४ घाग ५ पाताडे किंवा पटोले. हीं पांच कुलें मिळून साळुंकेकुळी.

(८) सिसोदे - सिंहकेत राजा सूर्यवंशी याचें कुल. तक्तगादी - तुळजापूर. यांचीं कुलें - १ सिसोदे २ अपराधे ३ भोवर ४ जोजी ५ सालव. हीं पांच कुलें मिळून सिसोदेकुळी.

### सोमवंशी कुळ्या

(१) जगताप - वसुसेन राजा सोमवंशी यांचें कुल. तक्तगादी - मरदपूर. यांचीं कुलें - १ जगताप २ शेलार ३ म्हात्रे ४ शितोळे. हीं चार कुलें मिळून जगतापकुळी.

(२) मोरे - मांघाता राजा सोमवंशी याचें कुल. तक्तगादी - काश्मीर. यांचीं कुलें - १ मोरे २ केशरकर ३ कलपाते ४ दरबारे. हीं चार कुलें मिळून मोरेकुळी.

(३) मोहिते - विजयाभि नामक राजा सोमवंशी याचें कुल. तक्तगादी - मंदोसर. यांचीं कुलें - १ मोहिते २ माने ३ कामरे ४ कांठे ५ काठवटे. हीं पांच कुलें मिळून मोहितेकुळी.

(४) चवाण - मणिभद्र राजा सोमवंशी याचें कुल. तक्तगादी - पंजाब. यांचीं कुलें - १ चवाण २ धमण ३ वारंगे ४ दलपते. हीं चार कुलें मिळून चवाणकुळी.

(५) दाभाडे - भद्रपाणी राजा सोमवंशी याचें कुल. तक्तगादी - द्वारकापट्टण. यांचीं कुलें - १ दाभाडे २ निंबाळकर ३ राव ४ रणदिवे निकम. हीं चार कुलें मिळून दाभाडेकुळी.

(६) गायकवाड - कार्तवीर्य राजा सोमवंशी याचें कुल. तक्तगादी - गुजराथ देश. यांचीं कुलें - १ गायकवाड २ पाटणकर ३ भाते. (हीं तीन कुलें मिळून गायकवाडकुळी.)

(७) सावंत - भद्रसेन राजा सोमवंशी याचें कुल. तक्तगादी - सावंतवाडी. यांचीं कुलें - १ सावंत २ कंबले ३ इनसूलकर ४ घाडगे. हीं चार कुलें मिळून सावंतकुळी.

## यदुवंशी कुळ्या

(१) शिरके - कर्णध्वज राजा यदुवंशी याचें कुल. तक्तगादी - अहमदाबाद. यांचीं कुलें - १ शिरके २ फांकडे ३ शेलके ४ बागवान ५ गावंड ६ मोकल. हीं सहा कुलें मिळून शिरकेकुळी.

(२) तोवर - जसुमती राजा यदुवंशी याचें कुल. तक्तगादी - कर्नाटक (सांवनूर - बंकापूर). याचीं कुलें - १ तोवर २ तामटे ३ बुलके ४ धावडे ५ मालयवार, हीं पांच कुलें मिळून तोवरकुळी.

(३) जाधव उर्फ यादव - यदु राजा याचें कुल. तक्तगादी - मथुरा. यांचीं कुलें - १ जाधव २ जालिंधरे ३ जसवंत ४ जगपाळ ५ पाटेल ६ जागले ७ जारे ८ धुमक ९ घोगले १० सीरगोरे ११ यादव १२ घरत. हीं बारा कुलें मिळून जाधवकुळी.

## शेषवंशी कुळ्या

(१) म्हाडीक - सुमंती राजा शेषवंशी याचें कुल. तक्तगादी - बागलकोट. यांचीं कुलें - १ म्हाडीक २ गवळी ३ भोगले ४ भोईर ५ ठाकूर. हीं पांच कुलें मिळून म्हाडीककुळी.

(२) तावडे - नागामन राजा शेषवंशी याचें कुल. तक्तगादी - इंदर. यांचीं कुलें - १ तावडे २ सांगल ३ नामजादे ४ जांवले ५ चिरफुली. हीं पांच कुलें मिळून तावडेकुळी.

(३) धुलप - महीपाल राजा शेषवंशी याचें कुल. तक्तगादी - नाशिक त्रिंबक आणि विजय दुर्ग. यांचीं कुलें - १ धुलप २ धुमाल ३ धुले ४ धुरे ५ कासले ६ लेंडपवार. हीं सहा कुलें मिळून धुलपकुळी.

(४) बागवे - गोप्ती राजा शेषवंशी याचें कुल. तक्तगादी - कोटबुंधी. यांचीं कुलें - १ बागवे २ परव ३ मोकाशी ४ दिवटे. हीं चार कुलें मिळून बागवेकुळी.

परिसमाप्ति - वंशावळी शाणवकुळी नामक गद्यपद्यात्मक पोथीच्या आधारानें वरील माहिती दिली आहे. ती ऐतिहासिकदृष्ट्या कितपत खरी आहे हें सांगतां येत नाहीं. तरी इतिहासाचा अभ्यास करणारांस तिजपासून थोडासा तरी प्रकाश प्राप्त होईल व सामान्य जनांचा बहुश्रुततेचा सांठा वाढविण्यांस थोडी तरी साधनीभूत होईल अशा आशेनें ही खटपट केली आहे. बाकी परमेश्वरानें 'मनुष्याचीं सर्व राष्ट्रें पृथ्वीच्या सर्व पाठीवर राहण्याकरितां एकाच रक्तापासून केलीं आणि त्यांचे पूर्वी नेमलेले समय व त्यांच्या वस्तीच्या सीमा त्यानें नेमून ठेविल्या आहेत.' (प्रे.कृ. १७:२६). ही एक गोष्ट मात्र मानववंशावळीच्या संबंधानें निश्चित आहे.

------------

## संवाद

*ज्ञानोदय, २७ जून १८९५*

तर्कशास्त्री - ह्या वेळपर्यंत तुम्ही जें कांहीं सांगितलें त्यावर माझा तर बाबा विश्‍वास बसत नाहीं. तुम्ही म्हणतां हें प्रमाणपूर्वक सिद्ध करून दाखवा. जी गोष्ट तर्कशास्त्र रीत्या सिद्ध होऊं शकत नाहीं ती मी तर बाबा कधीं खरी मानायचा नाहीं.

ख्रिस्ती - अहो महाराज, अशा उंटावरून शेळ्या वळूं नका. आमचें म्हणणें तूर्त एकीकडे ठेवूं. पण मी तुम्हांस एक गोष्ट तर्कशास्त्र रीत्या सिद्ध करण्यास सांगतो. ती तुम्ही कशी सिद्ध करितां पाहूं.

तर्कशास्त्री - ती कोणती? विचारा तर खरीं. झाली सिद्ध तर पाहूं नाहीं तर राहिलें.

ख्रिस्ती - तुम्हांस आजन्मांत कधीं तरी गाढ झोप लागली होती हें तुम्ही तर्कशास्त्र रीत्या सिद्ध करून दाखवा.

तर्कशास्त्री - अहो काल रात्री मला गाढ झोप लागली होती हें मला पक्कें ठाऊक आहे.

ख्रिस्ती - 'काल रात्रीं मला गोढ झोप लागली होती हें मला पक्कें ठाऊक आहे' असें जें तुम्ही म्हणतां त्यास प्रमाण काय?

तर्कशास्त्री - काल रात्रीं मला मुळींच शुद्धबुद्ध नव्हती.

ख्रिस्ती - पण तुम्हांस शुद्धबुद्ध नव्हती यास प्रमाण काय? शिवाय एकादा मनुष्य अतिशय मद्यप्राशन करून बेहोष होऊन पडल्यास त्यास तरी कोठें शुद्धबुद्ध असते? किंवा एखाद्याच्या डोक्यावर कोणी तडाकून गुद्दा दिल्यास तो बेशुद्ध होऊन पडतो तेव्हां त्यास तरी शुद्धबुद्ध कोठें असते?

तर्कशास्त्री - पण मी आंथरुणास आंग लावल्यापासून तों जागा होईपर्यंत ज्या कांहीं गोष्टी झाल्या त्यांतलें मला कांहींच कळलें नाहीं.

ख्रिस्ती - पण कांहीं मनुष्यांची अशी गोष्ट आहे कीं, ते जागे असले तरी देखील त्यांच्या देखत ज्या गोष्टी घडतात त्यांतल्या बऱ्याच त्यांना कळत नाहींत. शिवाय तुम्हांस कांहींच कळलें नाहीं यास प्रमाण काय? आणि तुम्हांस कांहीं कळलें कीं न कळलें यासही कांहीं प्रमाण नाहीं. शिवाय कित्येक मनुष्यें गाढ झोपेंत असतांही त्यांस पुष्कळ गोष्टी कळतात. कांहीं मनुष्यें गाढ झोपेंत असतां चालतात, अभ्यास करितात, कामकाज करितात, तरी पुढें त्यांतून कांहींच त्यांस आठवत नाहीं.

तर्कशास्त्री - पण आमच्या घरांतल्या माणसांनीं मी गाढ झोपेंत असतां मला पाहिलेलें आहे.

ख्रिस्ती - महाराज, माफी असावी. तुमच्या घरांतल्या माणसांनीं तुम्ही गाढ झोपेंत असतां तुम्हांस पाहिलें असें तीं म्हणतात इतकेंच तुमच्या म्हणण्यापासून निष्पन्न होतें, पण तुमच्या घरांतलीं माणसें खोटें सांगत नसतील कशावरून? शिवाय तीं खोटें सांगत नसली तरी तुम्ही खरोखरच गाढ झोपेंत होता किंवा तुम्ही झोपेचें सोंग केलें होतें हें त्यांस कसें कळलें?

तर्कशास्त्री - अहो पण मनुष्यें येथून तेथून सर्व निजतातच.

ख्रिस्ती - झाडून सर्व मनुष्यें निजतातच हें तुम्हांस कशावरून माहीत? तुम्ही झाडून सर्व मनुष्यें डोळ्यांनीं पाहिलीं आहेत काय? किंवा निजतांना त्यांस तुम्ही पाहिलें आहे काय? कांहीं मनुष्यें निजत नाहींत ह्या गोष्टीच्या प्रमाणार्थ जगजाहीर झालेली अशी कित्येक उदाहरणेंही आहेत. तेव्हां महाराज, आपणांस क्षणभर तरी कधीं झोप लागली होती ही गोष्ट तर्कशास्त्र रीत्या सिद्ध होण्यास आपणाकडून भक्कम पुरावा आला नाहीं. (भाषांतर)

------------

## चुकीची दया

*ज्ञानोदय, ८ मार्च १८९७*

मुक्या प्राण्यांवर दया करणें अयोग्य आहे असें कोणीही विचारी मनुष्य म्हणणार नाहीं. पण मुक्या प्राण्यांकडून मनुष्यांच्या जीवितास धोका येण्याची भीती असताही त्याजवर दयाच करावी, त्यांची हत्या करूं नये, हें म्हणणें मात्र योग्य दिसत नाहीं. ढेकुण, चिलटें वगैरे किडे, विंचू, सर्प वगैरे विषारी प्राणी, सिंह, वाघ वगैरे क्रूर श्वापदें यांची मनुष्यें जशी हत्या करितात त्याप्रमाणेंच कोणत्याही प्राण्याकडून मनुष्याच्या जीवितास अपाय होऊं लागला म्हणजे कींव न करितां त्यांचा नाश करणें हेंच योग्य आहे. पण कित्येक लोकांच्या मनांत चुकीची दया भरली असल्यामुळें मनुष्याच्या जीवितास धोका येण्याची खातरी असूनही ते मुक्या जनावराचा नाश करीत नाहींत. इतकेंच नाहीं पण कोणी तसें करूं लागल्यास त्याच्या मार्गांत विघ्नें आणितात यास काय म्हणावें?

एक दोन वर्षांपूर्वीं सातारा व माटुली येथें वानरांनीं पराकाष्टेचा उपद्रव मांडिला होता. पण वानर पडले रामाचे सेवक तेव्हां स्वतां कोणी त्यांस मारीना, इतकेंच नव्हे पण, जे सरकारी अंमलदार वानरांस मारून लोकांस त्यांच्या उपद्रवांतून सोडविण्यांस कबूल होते त्यांसही तसें करूं देतना. मुंबईस सांप्रतच्या मोहल्यांत उंदीर धरण्याकरितां अधिकाऱ्यांनीं मांडिलेले सापळे लोकांनीं उडविले. सुरतेस पिसाळलेल्या कुत्र्यांचा असाच उपद्रव झाला होता पण लोकांची धन्य असो कीं त्यांनीं कुत्र्यांचेंही युक्तीनें रक्षण केलें व पोलिसांस धाब्यावर बसविलें.

वरील तीन उदाहरणांवरून ध्यानांत येईल कीं, शेंकडों मनुष्यांच्या जीवितास अपाय होण्याची भीति असतांही जनावरांच्या जीवांचें रक्षण करणें हा मुक्या जनावरावर दया करणें याचा अर्थ लोक करितात. दया करण्याच्या संबंधाची यापेक्षां चांगली तत्त्वें लोक शिकतील तो सुदिन. स्वतां मला तर मुक्या जनावरांपेक्षां बोलक्या मनुष्यांवर जास्त दया करणें हेंच योग्य दिसतें.

------------

## बुद्ध विष्णूचा अवतार नाहीं असें प्रतिपादन करणारा
## एक महत्त्वाचा उतारा

*ज्ञानोदय, २९ डिसेंबर १८९८*

सदरहू उतारा म्हणजे, पुणें येथें गेल्या वसंत व्याख्यानमालेंतील रा. महादेव गोविंद अभ्यंकर यांच्या महाभारतावरील मराठी निबंधांतील आठवा परिच्छेद हा होय. तो तारिख २८ माहे ज्यून सन १८९८ इ. च्या केसरीच्या अंकावरून येथें उतरून घेतलेला आहे.

**अवतार**

विष्णूचे एकंदर अवतार किती झाले हेंही निश्चितपणें सांगतां येत नाहीं. कांहीं ठिकाणीं प्रथम वराह अवतार झाला असें वर्णन आढळतें, व वराह अवतार चालूं कल्पाचे आरंभीं झाला म्हणून वराह अवतार पहिला असें म्हटलेलें आहे असें सध्याचे लोक समाधान करितात. प्रचारांत अवतार दहा धरलेले असून ते मत्स्य, कूर्म, वराह, नरहरि, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध व कलंकी हे होत असा सार्वत्रिक समज आहे. शांतिपर्वांत ३३९वे अध्यायांत हंस, कूर्म, मत्स्य, वराह, नरहरि, वामन, परशुराम, राम, सात्वत (कृष्ण), व कल्की अशीं दहा अवतारांचीं नांवें आढळतात. ह्यांत मत्स्य अवतार पहिला नसून तिसरा आलेला आहे, व हंस हा पहिला अवतार नवीन दिलेला असून, बुद्ध ह्या नवव्या अवतारांस त्याबद्दल रजा मिळालेली आहे. ह्यावरून बुद्ध हा खरोखर विष्णूचा अवतार नसून, त्याची जेव्हां प्रख्याति झाली व त्यास चोहोंकडून मान मिळावयास लागला, तेव्हां 'यद्य द्विभूति मत्सवं श्रीमदूर्जितमेव वा । तत्त देवा गच्छं त्व। मम तेजोंश संभवम्' ह्या गीतावचनाप्रमाणें त्याची अवतारांत गणना होऊं लागली. या उताऱ्यांत आलेल्या संस्कृत श्लोकाचा अर्थः- जी जी वस्तु ऐश्वर्ययुक्त, किंवा शोभायुक्त किंवा कांहीं तरी प्रभावानें युक्त असेल, ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झालेली आहे असें तूं जाण. (गीता अ. १० श्लोक ४१)

सदरहू अर्थ रा. गुंजीकरकृत गीतेच्या अर्थाच्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तिवरून दिला आहे.

सदरहू उतारा ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या उपयोगी पडेल व तसेंच 'पंढरपूरची यात्रा' या पुस्तकाची नवी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यास त्या वेळीं त्याचा उपयोग होईल अशी आशा आहे.

------------

## पर्जन्य-निमित्त अख्रिस्ती लोकांचा प्रार्थनेचा आठवडा
## (अलीबाग ३-८-१८९९)

*ज्ञानोदय, १० ऑगस्ट १८९९*

या अष्टागर प्रांतांत चौल हें हिंदुधर्मदृष्ट्या मोठें प्रसिद्ध गांव आहे. या गांवांत रामेश्वर हें प्रसिद्ध शिवमंदीर आहे. त्या मंदिरांत पर्जन्य, अग्नि व वायु अशी तीन कुंडें आहेत. पाऊस पडेनासा झाला तर पर्जन्यकुंड उघडून अनुष्ठान केलें म्हणजे पाऊस पडतो अशी लोकांची दृढ समजूत आहे. शके १६५३ सालीं आवर्षण पडलें त्या वेळीं हें पर्जन्यकुंड उघडिलें होतें. तसेंच शके 'सत्राशें नवसप्तति पिंगल संवत्सरीं' हें कुंड पुन्हां उघडिलें होतें, आणि शके १७९९ सालीं हें कुंड आणखी एकदां उघडिलें होतें. त्या तिन्ही वेळीं अनुष्ठान पुरें होतांच पर्जन्यवृष्टि होऊं लागली असें 'श्रीरामेश्वर वर्णन' नामक पुस्तकांत लिहिलें आहे. यंदाच्या सालीं पावसाचा नायनाट झाल्यामुळें अष्टागर प्रांतांतील हिंदु लोकांनीं वर्गणीनें द्रव्य जमा करून या आठवड्यांत हें कुंड पुन्हां एकदां उघडिलें आहे. अनुष्ठान एक आठवडा चालेल व त्यांस एक हजार रुपये खर्च येईल असें म्हणतात. तेव्हां या प्रांतांतील हिंदु लोकांचा पर्जन्यनिमित्त प्रार्थना करण्याचा हा आठवडा आहे, असें म्हटलें पाहिजे.

मुसलमान लोकांत अशा प्रकारचीं अनुष्ठानें करीत नाहींत. तर संकटाच्या प्रसंगीं उपासना करून 'पोथी' करतात. त्याप्रमाणें इकडच्या मुसलमानांनीं एक आठवडाभर पावसाकरितां उपास व प्रार्थना कराव्या असें ठरविलें आहे, व त्याप्रमाणें हल्लीं त्या लोकांत उपास व प्रार्थना सुरू आहेत. हें त्यांचें अनुष्ठान एक आठवडा चालावयाचें आहे, व आठवड्याच्या शेवटल्या दिवशीं ते निशाणांची मिरवणूक काढणार असें ऐकिवांत आहे. तेव्हां मुसलमान लोकांचा पावसाकरितां प्रार्थना करण्याचा हा आठवडा आहे, असें म्हटलें पाहिजे.

ख्रिस्ती मित्रांनो, पाऊस पडावा म्हणून तुम्ही सभा जमवून ईश्वराची आग्रहानें प्रार्थना करीत आहां काय? किंवा ईश्वरापेक्षां पदार्थविज्ञानादि शास्त्रांचें स्तोम अधिक माजवून प्रार्थनेची हयगय करीत आहां? माझी आपणांस सविनय विनंती आहे कीं पाऊस पडावा व दुष्काळ टळावा म्हणून अनन्य भावानें ईश्वराची प्रार्थना करा.

------------

## श्वानपूजा

*ज्ञानोदय, २४ ऑगस्ट १८९९*

मनुष्यानें एकदा ईश्वराची भक्ति सोडिली म्हणजे मग तो कोणाची व कशाची भक्ति करूं लागेल याचा नेम नाहीं. कुत्र्याची पूजाअर्चा कोणी समंजस मनुष्य करील असें प्रथमदर्शनीं वाटत नाहीं. तरी या हिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं व कित्येक लोकांत कुत्र्याची पूजाअर्चा चालूं आहे. जेथें कोठें दत्तात्रयाचें देऊळ असतें तेथें दत्ताच्या मूर्तीच्या अनुषंगानें कुत्र्याच्या मूर्तीचीही पूजा होते. खंडोबाच्या कुत्र्याविषयींही तीच गोष्ट आहे. रायगडावर 'महाराज' यांच्या कुत्र्याची समाधि आहे. 'समर्थाच्या घरींचें श्वान। त्यास सर्वही देती मान॥' या न्यायानें या समाधीस फूल नाहीं तर फुलाची पाकळी मिळते. साताऱ्याजवळ कृष्णावेण्या या नद्यांच्या संगमावर माहुली म्हणून एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. त्या ठिकाणीं एका उंच चौथऱ्यावर कुत्र्याच्या मूर्तीची स्थापना केलेली आहे. त्या मूर्तीचें नाक कापिलेलें आहे. तरी लोक तिची पूजा करितात व तो नवसास पावतो असें समजून त्यास नवसही करितात.

अल्लीबाग येथील एका बड्या नेटिव गृहस्थाचा एक कुत्रा होता. तो मोठ्या किंमतीचा असून त्या गृहस्थाचा लाडका असें. थोड्या दिवसांमागें तो पिसाळल्यामुळें त्यास पोलिसांकडून मारवावें लागलें. दुसरें दिवशीं त्याजवर मोठ्या किंमतीचें कफण घालून त्यास पुरिलें. नंतर एक दोन दिवस त्यास पुरलेल्या जागीं फुलांच्या माळा, उदबत्त्या वाहण्याचा विधी झाला. नंतर त्यावर एक सुंदर कबर बांधण्याची सुरुवात होऊन थोडे दिवसांत तें काम पार पडलें. ज्या वाडींत हा कुत्रा पुरिला आहे त्या वाडीचा मालक (स्थळदेवता) ज्या कोपऱ्यांत हल्लीं कबर झालेली आहे त्याच कोपऱ्यांत रहातो असा पुष्कळ दिवसांपासून लोकांचा समज आहे. गुदस्त सालीं तर तो एका गड्याच्या अंगांत संचारला होता. तेव्हां त्या भुतास असें सुंदर केलेलें घर आयतेंच मिळाल्यावर मग तो नुसता झाडाखालीं कशास रहातो? लोक आपल्या कल्पनेनें देव करूं लागले म्हणजे त्यांची मजल कोठपर्यंत जाऊन पोंचेल याचा नेम नाहीं.

रोमकरांस पत्र अध्याय १:१८-२५ या शास्त्रभागावर वरील ओळी म्हणजे एक लहानशी टीकाच आहे. निदान त्या भागावर टीका लिहिणारांस त्यांचा उपयोग होण्यासारखा आहे.

------------

## स्मरणशक्तीचे चमत्कार

*ज्ञानोदय, १८ ऑक्टोबर १९००*

अल्लीबाग येथील फ्रीचर्च मिशन इंग्रजी विद्यालयांत शुक्रवार तारीख ६ माहे ऑक्टोबर सन १९०० इसवी रोजीं तिसरें प्रहरीं, पुणें येथील प्रसिद्ध नानावधानी राजश्री ना. गं. भानू यांचे स्मरणशक्तीच्या चमत्कारांचा प्रयोग झाला. एकीकडे सहा इसमांबरोबर पत्त्यांनीं खेळत असतां, व खेळतां खेळतां एका इसमाबरोबर (खेळगड्यांपैकीं नव्हे) संभाषण करीत असतां मशारनिल्हे* नानावधानी गृहस्थांनीं गणितविषय, भाषाविषय, ज्योतिषविषय वगैरे विषयांच्या संबंधाचे सुमारें चाळीस प्रश्न विचारून घेऊन व एकीकडे फळांचीं नांवें, पत्त्यांचीं पानें, गंजिफांचीं पानें, घंटेचे ठोके वगैरे कित्येक अवधानें राखून शेवटीं बहूतेक सर्व प्रश्नांचीं बिनचूक उत्तरें दिली. एकंदरींत प्रयोग उत्तम वंठला यांत संशय नाहीं.

परमेश्वरास कार्यबाहुल्यामुळें ज्या ज्या इसमाच्या प्रार्थनेकडे लक्ष्य देण्यांस फुरसत मिळण्याचा संभव नाहीं, आणि म्हणून त्याची प्रार्थना करण्यांत कांहीं जीव नाहीं असें म्हणणाऱ्यांनीं इकडे लक्ष्य दिल्यास बरें होईल. यःकश्चित बुद्धीचा मनुष्यप्राणी देखील जर दोनचार वर्षांच्या अभ्यासानें निरनिराळ्या चाळीस पन्नास गोष्टींकडे एकदम अवधान ठेवूं शकतो तर सर्वज्ञानी जो परमेश्वर तो एकंदर सर्व जगाच्या घडामोडींकडे व त्यांतील मनुष्यांच्या प्रार्थनांकडे एकसमयावच्छेदें करून सहज अवधान राखूं शकेल. शकणार नाहीं म्हणणें त्याच्या सर्वज्ञत्वाविषयीं कल्पना नसणें अगर संशय बाळगणें होय. दुसरें कांहीं नाहीं.

‘पृथ्वीवरील लोकांनो, देवाचें भय बाळगा, मनुष्यजातीच्या कुटुंबांनो, देवाची प्रार्थना करा.’

------------

* उपरिनिर्दिष्ट

## पंजाबी आर्यसमाजिष्टांचीं धर्मसंबंधीं मतें

*ज्ञानोदय, ४ जुलै १९०१, ५ सप्टेंबर १९०१, २८ नोव्हेंबर १९०१*

(भाग १)

१ एकराष्ट्रीयत्वास एक धर्म असणें अवश्य आहे.
२ परमात्मा एक आहे.
३ द्वैत मत मात्र ग्राह्य आहे.
४ जन्मामुळें जात समजण्याची पद्धति अयोग्य आहे.
५ बालविवाह बंद करणें अवश्य आहे.
६ विवाहामध्यें वधुवरें प्रौढ असलीं पाहिजेंत.
७ स्नान, संध्या, उपासना व प्रार्थना हाच ब्रह्मयज्ञ होय.
८ जीवंत असलेल्या पिता-पितामह-प्रपितामह यांची योग्य सेवा करणें व त्यांच्या आज्ञा मानणें हाच पितृयज्ञ होय.
९ मूर्तिपूजा सर्वस्वी निषिद्ध आहे.
१० मांसभक्षण निषिद्ध नाहीं.
११ स्त्रीशिक्षणाचा प्रसार करणें व मुलींस शिक्षकिणीकडून शिक्षण देणें योग्य आहे.
१२ गोपाची पद्धति त्याज्य आहे.
१३ आठवड्यांतून एकदां स्नान, संध्या व प्रार्थना यांचा साप्ताहिक उत्साह करणें अवश्य आहे.
१४ सर्व लोकांनीं मिळून प्रार्थना करणें अवश्य आहे.
१५ पूर्वी हिंदु असून परधर्मांत गेलेल्या मनुष्यांस शास्त्रोक्त प्रायश्चित्त देऊन त्यांस पुन्हां समाजांत घेण्यांस हरकत नाहीं.
१६ संहिता ग्रंथ हाच वेद.
१७ वेद मात्र प्रमाणग्रंथ आहे.
१८ पुराणग्रंथ सर्वतोपरी त्याज्य आहे.
१९ पुराणामुळेंच हिंदुस्थानची अवनती झाली आहे.
२० शाळांतून व कालेजांतून धर्मशिक्षण देणें अवश्य आहे.

केसरी पत्राच्या ता. २८ माहे मे च्या अंकांत पंजाबांतील मुलतान येथील आर्यसमाजाच्या हायस्कुलाचे हेड मास्तर रा. रामचंद्र हरि देवधर बी. ए., यांणीं पुण्यांस दिलेलें व्याख्यान प्रसिद्ध झालेलें आहे. त्या व्याख्यानाचा संकोच करून वरील तत्त्वें काढिलीं आहेत. वरील तत्त्वें प्रचारांत आल्यास प्रचलित हिंदु धर्म रसातळास जाऊन हिंदु लोकांचें हिंदुत्व नष्टप्राय होणारें आहे. तसेंच वरील आर्यसमाजिष्टांची तत्वें व ख्रिस्ती धर्मप्रचारक जीं तत्वें प्रतिपादन करितात तीं तत्वें यांची तुलना करून पहाणारांस आर्यसमाजिष्टांचा धर्म म्हणजे बहुतेक ख्रिस्तव्यतिरिक्त ख्रिस्ती धर्म असें दिसून येईल. आनी बिझांट यांच्या हिंदुधर्माची बहुतेक हीच स्थिति आहे. तेव्हां जुन्या बुधल्यांत नवा द्राक्षरस घालण्याच्या प्रयत्नांपैकीं हा एक प्रयत्न आहे असें निष्पक्षपाती सत्यशोधकास खास दिसून येईल.

(भाग २)

पंजाबी आर्यसमाजाची सद्यःस्थिति

१ आरंभ - सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी.

२ मूळसंपादक - दयानंद सरस्वती.
३ उद्देश - सनातन हिंदुधर्माला रूढीनें व लोकांच्या अज्ञानानें जें अशुद्ध स्वरूप प्राप्त झालें आहे, त्यांत सुधारणा करून मूळ वेदाप्रमाणें लोकाचार चालू व्हावें व खऱ्या धर्माकडे त्यांची प्रवृत्ति व्हावी म्हणून वेदप्रतिपादित धर्माचा प्रसार करणें.
४ धर्मप्रचारक - पुरुष शंभर, स्त्रिया दहा.
५ विद्यालयें - मुलांकरितां फुकट शिक्षणाच्या शाळा शंभर, कन्याशाळा पन्नास, अनाथबालसंगोपनगृहें प्रसिद्ध दहा, पाठशाला लाहोर येथील दयानंद आंग्लोवैदिक कॉलेज. ह्या सर्व विद्यालयांत धर्मशिक्षण दिलें जातें.
६ वर्तमानपत्रें - अकरा. पैकीं दोन स्त्रियांकरितां आहेत. त्या दोहोंपैकीं एकाचें कर्तृत्व स्त्रीकडे असून दुसऱ्यांत स्त्रियांचे लेख येत असतात.
७ सोबती संस्था - वाचनालयें, मित्रसंघ.
८ पोटसंस्था - कायस्थ कानफरन्स, क्षत्रिय सभा, भार्गव कान्फरन्स, रजपूत सभा.
९ धर्मप्रसाराचीं मुख्य स्थळें - पंजाब, वायव्येकडील प्रांत, मद्रासकडील शनार जातीच्या वस्त्या.
१० बळ - (अ) सभासद - एकंदर सभासद एक लक्षांपेक्षांही अधिक असून त्यांत राजे, संस्थानिक, जहागिरदार, वगैरे सर्व प्रकारचे लोक आहेत.
(ब) हितचिंतक - राजपुतान्यांतील व मध्य हिंदुस्थानांतील पुष्कळ संस्थानिक ह्या समाजाचे हितचिंतक आहेत.
११ पतितोद्धार - ह्या समाजानें पंजाब प्रांतामध्यें दहा बारा वर्षांमध्यें एक हजार मुसलमान लोक हिंदुजातींत घेऊन त्यांस आर्यसमाज पंथानुयायी केलें.
१२ परदेशगमन - निष्प्रतिबंध असल्यामुळें बारा आर्य विद्यार्थी जपानामध्यें कलाकौशल्याचें काम शिकत आहेत.
१३ फंड - (अ) वेदप्रचार फंड जवळ जवळ दोन लक्ष रुपये. (ब) लाहोर येथील आंग्लोवैदिक कॉलेजाकरितां चार लक्ष रुपये. (क) ह्याशिवाय मुलांच्या शाळा, उच्च प्रतीचीं विद्यालयें, कन्यामहाविद्यालयें, अनाथाश्रम, शुद्धीसंस्था ह्यांच्याकरितां वेगळे वेगळे फंड असून ते चांगले भरभराटींत आहेत.
१४ सरकारी मदत - (अ) या समाजानें स्थापन केलेल्या अनाथबालसंगोपनगृहांपैकीं सात गृहांतील मुलांस सरकारकडून प्रत्येक मुलामागें २॥ रुपये मदत मिळते, (ब) अजमीर येथील अनाथगृहांस सोळा हजार रुपये बक्षीस दिले, (क) त्याच गृहाकरितां दुष्काळाचें वेळीं दरमहा १५० रुपये प्रमाणें मदत मिळाली.
१५ परिणाम - (अ) हल्लीं आर्यसमाज म्हणजे सर्व जातींतील उत्तम प्रकारच्या लोकांस 'खरे ऋषि ' बनण्याचा एक उत्तम मार्ग झाला आहे. (ब) पंजाबमध्यें ती एक विशेष शक्ति होऊन राहिली आहे. (क) या समाजाच्या चळवळीमुळें मिशनरी लोकांच्या प्रयत्नांस फारसें यश येईनासें झालें आहे.
१६ दुफळी - पंजाबी आर्यसमाजांत अलीकडे दोन पक्ष झालेले आहेत. एका पक्षांस मांस-पक्ष व दुसऱ्या पक्षांस घास-पक्ष अशीं नांवें आहेत.

वरील कलमबंदी 'करमणूक' (२-२-१९०१) पत्रांतील 'आर्यसमाज' या लेखाच्या आधारें तयार केली आहे. १५व्या कलमांतील (क) हें सदर व १६वें कलम हीं मात्र केसरी (२८-५-१९०१) पत्रांतील 'पंजाब व आर्यसमाज' या लेखाच्या आधारें लिहिलीं आहेत. कलमबंदींतील बहुतेक भाग सदरहू दोन्ही पत्रांतील शब्दांनींच लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. ख्रिस्तभक्तांनीं पवित्रशास्त्रांतील (निर्गम ९:१६, यशाया ५४:१५) हीं स्थळें वाचून पहावीं. म्हणजे प्रस्तुत आर्यसमाजास जरी एवढें भव्य व विशाल स्वरूप प्राप्त झालेलें आहे तरी त्यांस भिण्याचें कारण नाहीं असें दिसून येईल.

(भाग ३)

## आर्यसमाजाचें खरें स्वरूप

आर्यसमाजाचा आरंभ मुळीं महाराष्ट्रांत झालेला असून या प्रांतांत कित्येक शहरीं त्याच्या शाखाही आहेत. पण त्या समाजास पंजाबचें हवापाणी मानवल्यामुळें त्या प्रांतांत जसा त्याचा बेलविस्तार झाला तसा दुसऱ्या कोणत्याच प्रांतांत झालेला दिसत नाहीं. पंजाबी आर्यसमाजाची धर्मतत्वें व त्याची हल्लींची स्थिति यांविषयीं मागील दोन लेखांत ज्ञानोदयाच्या वाचकांस ओळख करून दिली. आज त्याच्या खऱ्या स्वरूपाविषयीं दोन शब्द लिहितों.

आर्यसमाजाचीं धर्मतत्वें म्हणजे खऱ्या हिंदु धर्माचीं तत्वें होत असें भासविण्याचा त्या धर्मानुयायांचा प्रयत्न आहे. पण आर्यसमाज धर्मतत्वांस हिंदुधर्माचीं तत्वें म्हणतां येत नाहीं. हिंदु धर्माचे चार प्रकार कल्पितां येतील. १ वैदिक हिंदुधर्म, २ तात्विक हिंदुधर्म, ३ पौराणिक हिंदुधर्म, आणि ४ लौकिक हिंदुधर्म.

जातिभेद ईश्वरस्थापित आहे असें मानणें, मूर्तिपूजा करणें, 'पोथीपुराणांत' वर्णिलेले देव, देवी ह्यांची उपासना करणें, तीर्थयात्रा करणें, ह्या व ह्या प्रकारच्या धर्मभोळेपणाच्या दुसऱ्या हजारों गोष्टी ह्या लौकिक व पौराणिक हिंदुधर्माचें जीवित आहेत. पण या सर्व गोष्टी आर्यसमाजी यांच्या मतांविरुद्ध आहेत. जातिभेदास झुगारून देऊन पुराणें कुचकामाचीं असें या समाजिष्टांनीं ठरविलेलें आहे. तेव्हां हा आर्यसमाजप्रपादित धर्म लौकिक अगर पौराणिक हिंदुधर्म आहे असें म्हणतां येत नाहीं. आतां त्यास तात्विक हिंदुधर्म म्हणावें तसेंही म्हणतां येत नाहीं. कारण सर्व हिंदुतत्वज्ञानाचें सार वेदान्त व वेदान्ताच्या परवलीचा शब्द म्हटला म्हणजे 'मी ब्रह्म आहे' म्हणजे तात्विक हिंदुधर्म अद्वैतवादी आहे. पण आर्यसमाजी यांस अद्वैत मत मान्य नाहीं. त्यांचा सर्व भरंवसा द्वैतमतावर. कृतीनेंही, ते द्वैतवादीच आहेत. कारण 'जगांत दुःख अथवा पाप असें कांहींच नाहीं' हा जो वेदान्ताचा मुख्य सिद्धांत त्याच्या विरुद्ध त्यांचें वर्तन आहे. जगांत दुःख जर नाहीं तर हिंदुस्थानची 'अवनति' कसची आणि त्याची भरभराट कशाला? जगांत जर पाप नाहीं तर पतित कसले आणि त्यांचा 'पतितोद्धार' कसला? पण आर्यसमाजी ह्यांचा अवतार 'भरभराट' व पतितोद्धार करण्यासाठीं. तेव्हां मतानें व कृतीनें हे द्वैतवादी खरे, अद्वैतवादी नव्हत व त्यांचा धर्म तात्विक हिंदुधर्म नव्हे. राहतां राहिला वैदिक हिंदुधर्म. आर्यसमाजी आपण संहिता ग्रंथ प्रमाण मानितों असें म्हणतात व 'हवाशुद्धीकरितां' होमहवन हीं करितात हें खरें तरी त्यांच्या धर्मास वैदिक हिंदुधर्म म्हणतां येत नाहीं. कारण वैदिक ऋषी ज्या देवांची भक्ति करीत नाहींत, अगर जनावरांचा यज्ञ करीत नाहींत. म्हणून त्यांच्या धर्मास वैदिक हिंदुधर्म म्हणतां येत नाहीं. तस्मात् आर्यसमाजी यांचा धर्म हा हिंदुधर्म नव्हे. आर्यसमाजी आपल्या धर्मास हिंदुधर्म म्हणवोत, पण वास्तविक गोष्ट तशी नसून त्यांच्या धर्माचें मूल स्थान दुसरीकडेसच आहे.

या देशांत इंग्रजी लोकांची पैरवी सुरूं झाल्या दिवसापासून त्यांचें वाङ्मय, त्यांची विद्या, त्यांचा धर्म ह्या त्रयीचा प्रवेश झाला. पहिल्यानें त्यांची गति मंद होती. पण गेल्या साठ पाऊणशें वर्षांपासून त्यांची वाढ झपाट्यानें होत आहे. हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरीं तर काय पण खेड्यांपाड्यांतूनसुद्धां ख्रिस्ती धर्माचा उपदेश सुरूं आहे. ख्रिस्ती पुस्तकें झपाट्यानें लोकांच्या घरांत प्रवेश करीत आहेत. हजारों मुलें प्रतिदिवशीं बैबलाचें अध्ययन करीत आहेत. हजारों गोरगरीब ख्रिस्ती कळवळ्याचा उपभोग घेत आहेत. अशा रीतीनें ख्रिस्ती धर्मतत्वांचा प्रत्यक्ष रीतीनें प्रसार होत आहे. शिवाय इंग्रजी वाङ्मयांत गढून जाणाऱ्या मंडळीची संख्या झपाट्यानें वाढत आहे, त्याच्या अनुसंगानें ख्रिस्ती धर्माची तत्वें पर्यायेंकरून लोकांच्या विचारसंग्रहांत मिसळून जात आहेत.

या गोष्टींचा परिणाम असा झाला आहे कीं, लोकांचा हिंदुधर्मावरून विश्वास उडत चालला आहे. ही गोष्ट लोकहितवादी, मालाकार शास्त्रीबोवा, केसरीकार टिळक, सुबोधपत्रिका व सुधारक यांचे संपादक अशा निरनिराळ्या मताच्या लोकाग्रणींनीं आपल्या लेखांत स्पष्ट नमूद केलेली आहे. ह्या निरनिराळ्या मतवाद्यांच्या प्रतिनिधींची इतर बाबतींत मतें निरनिराळीं आहेत पण 'हिंदुधर्मावरून लोकांचा विश्वास उडाला आहे' ह्या एका गोष्टीविषयीं सर्वांची एकवाक्यता आहे.

आज हजारों वर्षांपासून पडत आलेलें हिंदुधर्माचें दडपण उडून सर्व बंधारणें सुटल्यामुळें हिंदुसमाजाची शोचनीय स्थिति झाली. कोणी नास्तिक, कोणी अज्ञेयवादी, कोणी एकेश्वरी, कोणी बाहेरून जातीचे आचार पाळणारे पण मनांतून धर्माविषयीं उदान बनलेले*, असे सुशिक्षित लोकांचे वर्ग झाले. व साधारण लोकांचीही धर्मबंधारणें बरींच शिथिल झालीं.

पण अशी स्थिति इष्ट नाहीं, लोकांस धर्मबंधारण असलेंच पाहिजे ही गोष्ट कित्येक विद्वानांच्या ध्यानांत येऊन चुकली. तेव्हां पश्चिमात्य शिक्षणद्वारा प्राप्त झालेलें धर्मतत्वरूपी सुवर्ण घेऊन त्याचे इकडच्या घाटाचे व नांवाचे अलंकार बनवून ते आपल्या देशबांधवांस अर्पण करण्याच्या उद्योगासही ही कारागीर मंडळी लागली. ब्रह्मसमाज, परमहंस मंडळी, प्रार्थनासमाज ह्या व अशा प्रकारचीं दुसरीं शेकडों नांवें धारण करून अस्तित्वांत आलेल्या मंडळ्या हीं सर्व ह्या प्रयत्नांचीं फलें आहेत. जुन्या बुधल्यांत नवा द्राक्षारस घालण्याचा हा प्रयत्न आहे.

पण ही गोष्ट अश्रुतपूर्व किंवा अभूतपूर्व आहे असें नाहीं. रोमन राज्यांत ख्रिस्ती धर्माचे प्रचारक जेव्हां ख्रिस्ती धर्माची घोषणा करूं लागले व त्यांच्या प्रयत्नांस यश येऊं लागलें तेव्हां जुन्या मताच्या अभिमान्यांनीं घाबरून जाऊन अशा प्रकारचे उद्योग आरंभिले. त्यांच्या प्रयत्नांस प्रारंभीं यश येऊन थोडा काळपर्यंत ख्रिस्ती धर्मप्रसारास अडथळाही आला. पण कुसक्या दोरीनें जखडून बांधिलेल्या मोठ्या उंचीवर लटकणाऱ्या झुंबराची जी स्थिति होते म्हणजे त्या कुसक्या दोरीस त्या झुंबराचा भार सहन होत नाहींसा होऊन जसें त्याचें हजारों तुकडे होतात व ते पुन्हां कधींच पूर्व स्थितीवर येत नाहींत तीच स्थिति त्या नव्या संस्थांची झाली. म्हणजे त्या ज्या एकदा रसातळास गेल्या त्या कायमच्या गेल्या. त्यांनीं पुन्हां कधीं वर डोकें काढिलेंच नाहीं. हल्लीं रोमन व ग्रीक लोकांचे ग्रंथाचा व त्यांचे धर्माचा मनापासून अभ्यास करणारे हजारों लोक आहेत. पण रोमन अगर ग्रीक धर्मावर विश्वास ठेवणारा एकही मनुष्य नाहीं.पण ही गोष्ट होण्यास ३०० वर्षांचा अवधि लागला व कैक बळी पडले.

हीच इष्ट स्थिति या देशांतील धर्माची होणारी आहे. 'देव गेले काशी, पीर गेले मक्का' असें हल्लींचे लोक म्हणूं लागले आहेत. यथाकाळीं या देशांतील देव, देवी नामशेष होतील. प्रत्येक तत्वज्ञान ख्रिस्ती धर्मांतर्गत तत्वज्ञानास अग्रस्थान देईल. पाखंडी मताचा पाडाव होईल. प्रत्येक गुढगा प्रभु येशुच्या नांवानें टेकेल.

मात्र ही स्थिति घडवून आणण्यासाठीं ख्रिस्ती लोकांचे प्रयत्न अनेक दिशांनीं सुरूं आहेत ते तसेच राहिले पाहिजेत, नव्हे त्यांची वाढ झाली पाहिजे. आजपर्यंत आलेल्या फळाबद्दल ईश्वराचे आभार मानून ते प्रयत्न तसेच चालूं ठेवण्याविषयीं व त्यांची वृद्धि करण्याविषयीं तनमनधनें करून प्रयत्न करणें, स्वतांचें वर्तन चोख ठेवणें व ईश्वराची प्रार्थना करणें हीं ख्रिस्ती लोकांचीं कर्तव्यें आहेत. तीं करण्यांस ख्रिस्ती लोकांस परमेश्वर सहाय देवो अशी प्रार्थना करून हा मर्यादेपलीकडे गेलेला लेख संपवितो व तूर्त आर्यसमाजाची रजा घेतो. विनंती

* श्वास कोंडलेले

- ह्या लेखासंगतीं सुधारक (१९-८-१९०१) पत्रांतील ‘सामाजिक सुधारणेंसंबंधानें इतकें औदासिन्य कां?’ हा लेख वाचून पाहण्याविषयीं शिफारस केल्यावांचून रहावत नाहीं.

------------

## गीता आणि कृष्ण

*ज्ञानोदय, ३१ ऑक्टोबर १९०१*

युद्धारंभीं भीष्म - द्रोण - प्रभुखाखिलाप्त - वध - भीता
शक्रसुता त्रि - जगद्गुरु - कृष्णें उपदेशीली स्वयें गीता

मोरोपंत - भीष्मपर्व

भगवद्गीता हा ग्रंथ सर्वप्रसिद्ध आहे. भारती युद्धाच्या आरंभीं कोरवपांडवांकडचीं सैन्यें सिद्ध होऊन युद्धार्थ उभीं राहिलीं असतां, युद्धांस आरंभ होणार तों उभयसैन्यांमध्यें चुलते, आजे, गुरू, मामा, भाऊ, पुत्र, नातू, मित्र, सासरे, आप्त उभे आहेत असें पांडवांकडील महायोद्धा जो अर्जुन त्याच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्याच्या मनांत मोठी खिन्नता उत्पन्न झाली आणि विरक्त होऊन, धृतराष्ट्राच्या पुत्रांनींच मला मारिलें असतां माझें अधिक कल्याण होईल असें म्हणून धनुष्यबाण टाकून रथाच्या पुढल्या भागीं जाऊन बसला. तेव्हां कृष्णानें मनुष्याच्या कर्तव्याविषयीं अर्जुनास उपदेश केला आणि त्याच्या अनेक शंकांचें उत्तम प्रकारें समाधान केलें. तेणेंकरून त्याचा मोह नाहींसा होऊन तो उठून पुन्हां युद्ध करण्यास सिद्ध झाला इतका कथाभाग या ग्रंथांत आहे.

ही कथा महाभारतांत भीष्मापूर्वी संपूर्ण झाली आहे. महाभारत हा ग्रंथ व्यासानें रचिला. तरी गीतेंतील उपदेश ग्रंथकाराच्या पदराचा बिलकूल नाहीं. तर प्रत्यक्ष कृष्णानें केवळ अर्जुनाला बोध करण्याकरितां नव्हे पण सर्व सृष्टीच्या उद्धारास्तव सर्व शास्त्राचा जो मथितार्थ या प्रसंगीं सांगितला तोच व्यासांनीं गीतेंत अठरा अध्यायांत गोविला आहे.

पृथ्वीचें थोर भाग्य म्हणून हा अमृतोपम, अद्वितीय पुण्यग्रंथ उपलब्ध झाला असें या देशांतील जुन्या व नव्या प्रकारच्या विद्वानांचें व एकंदर सर्व लोकांचें म्हणणें आहे.

आतां भगवद्गीता हा ग्रंथ खरोखर अद्वितीय आहे कीं काय अगर त्यांत सर्व शास्त्राचा मथितार्थ आला आहे काय अगर या ग्रंथांत अमृताचा अंश अल्प असून त्यांत बहुतेक विषय कालविलेलें आहे हा प्रस्तुत लेखाचा विषय नव्हे. या प्रसंगीं इतकेंच पाहावयाचें आहे कीं या ग्रंथांतील नीति सर्वोत्कृष्ट आहे असें क्षणभर कबूल करून त्या नितितत्वांचा उपदेष्टा जो कृष्ण त्याचें वर्तन आपल्या बोलवण्याप्रमाणें होतें कीं त्याच्या उपदेशांत आणि वर्तनांत जमीनअस्मानाचें अंतर होतें.

कोणी ख्रिस्ती मनुष्यानें अशा प्रकारचा लेख हातीं घेतला म्हणजे त्यांजवर हिंदुधर्माविषयक अज्ञानाचा आरोप करण्याची एक टूम निघालेली आहे. म्हणून या ठिकाणीं पदरचें कांहीं न लिहितां ज्यांच्या हिंदुत्वाविषयीं अगर विद्वत्तेविषयीं कोणत्याही समंजस हिंदूस शंका घेणें शक्य नाहीं अशांच्या ग्रंथांतले कित्येक त्रोटक उतारे वाचकांस सादर करितों. हे उतारे आमचें काम आमच्यापेक्षां उत्कृष्ट करितील अशी आमची पक्की खातरी आहे.

रामजोशी म्हणतातः-

श्लोक

नंदाज्ञेतें कटिवरि हरि घेई राधा
गेहा जातां मनसिज बहु देई बाधा

कुंजारण्याप्रति हरिसह राधा गेली
तेथें त्यांनीं बहुविध चिर केली केली १

या श्लोकांतील चवथ्या चरणांत केली हा शब्द दोनदां आलेला आहे. त्यांतील पहिल्या केली शब्दाचा अर्थ क्रीडा असा आहे. ती क्रीडा कोणती याचा निर्णय दुसऱ्या चरणांतील 'मनसिज बहु देई बाधा' या शब्दांकडे लक्ष दिलें असतां सहज होणारा आहे.

तुकाराम म्हणतातः-

अभंग

गौळिणी करिती । देवासीं व्यभिचार
सांडोनी आचार । भ्रष्ट होती १
तुका म्हणे त्यांचा । धन्य व्यभिचार
साधिलें अपार । निज सुख २

कृष्णलिलेच्या संबंधानें तुकारामाच्या अभंगापासून बरेच उतारे देता येतील. नग्नगोपीवस्त्र हरण्याच्या प्रसंगाचें त्यानें लांबच लांब वर्णन केलें आहे. पण विस्तारभयास्तव आणखी स्थळें उतरून घेता येत नाहींत.

विष्णूशास्त्री चिपळूणकर हे आपल्या 'मोरोपंतांची कविता' या विषयावरील एका निबंधांत म्हणतातः-

'आमच्या कवीचा (मोरोपंतांचा आणि अर्थात् मालाकारांचा) देव गोकुळवृंदावनांतः-

शिलष्यति कामपि चुंबति कामति कामती रमयति रामाम्
पश्यति सस्मितचारु परामपरामनगुच्छति वामाम् ॥१ ॥

कोणास अलिंगन देतो, कोणाचें चुंबन करितो, कोण्या स्त्रियेस रमवितो, एकीकडे सस्मित अवलोकन करितो, व दुसरीच्या मागून चालतो! अशा प्रकारचा धुमाकूळ करून देणारा (होता)'.

वरील उताऱ्यांत कंसांत लिहिलेले शब्द हे लिहिणाराचे होते अशा प्रकारची 'धुमाकूळ' सुरु झाल्यावर 'या कृष्णाच्या बळें सोडितों आम्ही गोकुळ तुमचें' असें लोक नंदापाशीं म्हणूं लागले यांत नवल तें कोणतें?

इतके उतारे बस्स आहेत. कृष्ण कोणत्या प्रकारचा मनुष्य होता हें वरील त्रोटक उताऱ्यांवरून स्पष्ट दिसतें. कृष्णवर्तनाचा कोणी प्रांजळपणें विचार करितील त्यांस हेंही पण दिसून येईल कीं बोलणें सोपें पण करणें फार कठीण आहे. शेक्सपियर नामक इंग्रज कवीनें आपल्या एका नायिकेच्या तोंडांत खालील शब्द घातले आहेत. 'अमुक अमुक बोलणें चांगलें जसें सोपें आहे त्याप्रमाणेंच तें करणेंही जर सोपें असतें, तर लहान देवळेंही मोठीं देवालयें बनलीं असतीं आणि गरीबगुरीबांच्या खोपटांचे टोलेजंग राजवाडे झाले असते.'! तेव्हां गीतेंतला उपदेश कितीही चांगला असला तरी गीतेचा उपदेश करणारा जो कृष्ण तो चांगला ठरत नाहीं. इतकेंच नव्हे, तर एकीकडे गीतेंतल्या सारख्या तत्वांचा उपदेश करणें व दुसरीकडे शिलष्यति इ. श्लोकांत वर्णिलेली धुमाकूळ उडविणें हीं दोन्हीं कृत्यें त्याजकडून झाली तो पुरुष नुसत्या अनीतिमान् पुरुषापेक्षां अधिक दोषपात्र होय.

------------

## उत्पत्तीच्या पुस्तकावरील एक नवी टीका

*ज्ञानोदय, ९ ऑक्टोबर १९०२*

पवित्र शास्त्रांतील पहिलें पुस्तक म्हणजे उत्पत्ति, ह्यावर मराठी भाषेंत केवळ एकच टीका आहे. पण इंग्रजी भाषेंत ह्या पुस्तकावर अनेक टीका आहेत. प्रस्तुतच्या लेखांत त्यापैकीं एकाद्या टीकेविषयीं कांहीं लिहिण्याचा विचार नाहीं. तर ह्या पुस्तकावरील प्रसिद्ध झालेल्या एका नव्या टीकेविषयींची बातमी ज्ञानोदयाच्या वाचकांस करून देण्याचा विचार आहे.

वास्तविक म्हटलें असतां हा टीकात्मक ग्रंथ नवा नाहीं, जुनाच आहे. पण तो आजपर्यंत छापला गेलेला नसून थोडे दिवसांपूर्वी तो नव्या पोषाकानें जगासमोर आला आहे म्हणून व सोयीसाठीं त्यांस ‘नवी टीका’ असें म्हटलें आहे.

हा ग्रंथ मूळ हिब्रु भाषेंतला आहे. तो ख्रिस्तापूर्वींच्या दुसऱ्या शतकाच्या उत्तरार्धांत रचिलेला आहे. या टीकेस ‘थोबेल ग्रंथ’ असें नांव दिलेलें आहें. ह्या ग्रंथांत उत्पत्तीचें सर्व पुस्तक व निर्गमाच्या पुस्तकांतील थोडेसे अध्याय इतक्या शास्त्रभागावर टीका आहे. तरी ह्या ग्रंथाचा बराच मोठा भाग उत्पत्तीवरील टीकात्मक लेखानें व्यापिलेला असल्यामुळें व त्या पुस्तकांच्या अध्यायांची संख्या ५० असल्यामुळें त्या टीकाकारानें आपल्या कृतीस ‘थोबेल ग्रंथ’ हें नांव दिलें असावें. ह्या ग्रंथाचें मराठी भाषांतर मूळ ग्रीक भाषेंत व ग्रीक भाषेंतून इथिओपिक व लाटीन भाषेंत झालें. हल्लीं ह्या ग्रंथांतील जी प्रत सांपडली आहे ती इथिओपिक भाषेंतली आहे. तरी तिच्या संगती मूळ हिब्रु ग्रंथाचे तुटक तुटक बरेच भागही हातीं लागले आहेत.

ख्रिस्ती वाचकांस हा ग्रंथ अनेक प्रकारें उपयोगी होणारा आहे. (१) एक तर पंचग्रंथांतील जितका भाग ह्या पुस्तकांत आला आहे तितक्यापुरता, हिब्रु बायबलाच्या प्रतिकाच्या संबंधानें हा ग्रंथ म्हणजे ख्रिस्तापूर्वींच्या दोन शतकांमागला एक स्वतंत्र साक्षी होणारा आहे. (२) दुसरें ख्रिस्ताच्या पूर्वीं लिहिलेल्या टीकेंत उत्पत्तीच्या पुस्तकांतील ह्या ग्रंथांत ग्रथित केलेल्या भागांतील वादग्रस्त स्थळांचा ग्रंथकारानें काय अर्थ केला हें समजेल. (३) शिवाय सप्त आजीन्ट हा ग्रंथ जसा वारंवार उपयोगी पडतो तसा हाही ग्रंथ उपयोगी पडणारा आहे.

असा हा मोलवान् ग्रंथ छापवून प्रसिद्ध करण्याचें यश ब्ल्याकी नामक मंडळीनें घेतलें आहे. तसेंच ह्या ग्रंथाच्या आरंभीची प्रस्तावना, शेवटील सूचीपत्र, व खुद्द ग्रंथाच्या प्रतीकाखालच्या ठिकठिकाणच्या समजुतीकरितां टीपा इ. लिहिण्याचें विशेष जबाबदारीचें काम डब्लीन येथील ट्रिनिटी कॉलेजांतील गुरु प्रोफेसर चार्लस यांणीं केलेलें आहे.

गेल्या महिन्याच्या १७ व्या तारखेच्या बांबे गझेटच्या अंकांतील ‘लेखक व वाचक’ ह्या मथळ्याखालील एका तुकड्याच्या आधारानें प्रस्तुत लेख तयार केला आहे.

------------

## तो खरा सुखी पुरुष

*ज्ञानोदय, ११ जानेवारी १८८३*

दाविदाचें पहिलें गीत

**आर्या**

दुष्टांच्या मसलतीनें।
वर्तेना तो खरा सुखी पुरुष॥
पाप्यांच्या मार्गीं जो।
राहत नाहीं उभा कधीं निमिष॥ १॥

तैसे न निंदकांच्या।
आसनिं बैसे, सदां जया तोष॥
शास्त्री परमेशाच्या।
त्याचा रात्रीं दिनीं करी घोष॥ २॥

पाण्याच्या जवळीं जें।
झाड तया नेहमीं मिळें पाणी॥
यास्तव तेंचि सुकाळीं।
देतें फळ कोमतें न तें पानीं॥ ३॥

करितो तो कांहीं जें।
साधें, नाहींत दुष्ट जन तैसे॥
वारा जें उडवूनी।
विखरीतो भूस जें तथा सरिसे॥ ४॥

न्यायांत दुष्ट जन ते।
पापी न्यायीसभेंत राहीना॥
नाशांत मार्ग त्याचा।
न्यायी लागी प्रभू विसंबेना॥ ५॥

------------

## ईश्वरास प्रार्थना

*ज्ञानोदय, २१ नोव्हेंबर १८८३ आणि उपासनासंगीत*

**पद**

हो प्रसन्न, मंदक्रोध वंद्य ईश्वरा।
करुनि कृपा अंगिकार दीन पामरा॥ ध्रु.॥

हस्त, पाद, नेत्र, घ्राण, कर्ण, मुख नरा॥
इंद्रियेंहि दीधलींस काय गोजिरा॥
खर्चिलीं न भक्तिसाठिं तव परात्परा॥
राया। ध्याया। पायां। बेशरमी। किंकर मी।
पतकरिं मी। हे दयाकरा॥ हो प्रसन्न॥ १॥

भ्रष्ट, दुष्ट, खष्ट, पापि जाहलों खरा॥
तुल्य जरि मी तूं अतुल्य, प्रभु सुधी खरा॥
कीं अखंड दंडिलेंस मज न पामरा॥
सदया। न्याया। द्याया। पाप्याला। कळवळला।
अवथीला। बेत अघहरा॥ हो प्रसन्न॥ २॥

एकुलता प्रीय पुत्र जवळिं जो उरा॥
वसत तुझ्या, दीधलास ख्रिस्त कोंकरा॥
मरुनि त्यानें खंड भरुनि दीधला पुरा॥
येवो। भावो। ठेवो। अघहरणीं। भवतरणीं।
प्रभुमरणीं। ही वसुंधरा॥ हो प्रसन्न॥ ३॥

मी पापें पतकरितों न्यायसागरा॥
ख्रिस्तमरणिं धरुनि भाव शरण सुंदरा॥
शुद्धात्मा ठेवी मम हृदयमंदिरा॥
तारी। वारी। सारी। भयचिंता गुणवंता।
भगवंता। देई आसरा॥ हो प्रसन्न॥ ४॥

------------

## स्फुट श्लोक व आर्या

*ज्ञानोदय, १९ जून १८८४*

### श्लोक

(भुजंगप्रयात)

॥ जया मानवा सत्यता मुक्तता दे ॥
॥ खरा मुक्त तो मर्त्य लोकांत नांदे ॥
॥ नसे मुक्तता अन्य कोणा मिळाली ॥
॥ परी गुंतले सर्वही दास्यजालीं ॥ १ ॥

### आर्या

(गीति)

असती बिलें वसाया कोल्हा कोठीही पक्षियाला कीं ॥
परि मज मानवपुत्रा अल्प न थारा म्हणे प्रभू लोकीं ॥ १ ॥

------------

## अवतीर्ण प्रभूचें स्तवन

*ज्ञानोदय, ३ जुलै १८८४ आणि उपासनासंगीत*

मेंढपाळांनीं गायिलेलें गीत - मात्थी २:११

**पद**

प्रभुजी, वंदन तव चरणीं ॥ प्रभुजी ॥ ध्रु. ॥

मूळ पूर्वजां भाष्य दिलेंसी ।
मानवतनु धरणीं ॥ प्रभुजी ॥ १ ॥

ज्या तुजविषयीं गत साधूंनीं ।
धरिली आस मनीं ॥ प्रभुजी ॥ २ ॥

ईश्वर आत्म्यें बोधित होऊनि ।
साधू सत्त्वगुणीं ॥ प्रभुजी ॥ ३ ॥

धरुनि देहाप्रति मनुज्याच्या ।
आलासी धरणीं ॥ प्रभुजी ॥ ४ ॥

पापसमुद्रीं बुडत्या जनिता ।
झालासी तरणी ॥ प्रभुजी ॥ ५ ॥

दासाप्रति ह्या बहु आनंदचि ।
तव गुण गण कवनीं ॥ प्रभुजी ॥ ६ ॥

------------

## सद्भक्त

*ज्ञानोदय, २४ जुलै १८९०*

कौपरकृत ‘ख्रिश्चन’ नामक पद्याचें भाषांतर

**अभंग**

सन्मान सत्सुख। एकत्र मिळती॥
गाया नामस्तुति। सद्भक्ताची॥ १॥

किती ते सुंदर। मनोरम किती॥
दिन तो जे क्षीति। कंठीतसे॥ २॥

सर्व राजगुण। नांदती हृदयीं॥
कधीं क्षय नाहीं। याजकत्वा॥ ३॥

अभंग अढळ। घाली तो मुगूट॥
आनंदासी खूट। नसे त्याच्या॥ ४॥

स्वर्गीय वैभवें। दिसे शोभिवंत॥
मुख प्रफुल्लित। मुक्ति तेजें॥ ५॥

जगिक सन्मान। द्वेषी मन त्याचें॥
स्तुतीसी लोकांचे। सातुटेना॥ ६॥

साहित्य जें स्वांगें। त्याचे करी देव॥
मग हो उणीव। कैंची त्यास॥ ७॥

मृत्युलोकीं जरी। तयाचें रहाणें॥
राज्य त्या कारणें। सिद्ध वरी॥ ८॥

देव तया देत। सर्वस्व आपुलें॥
अक्षय त्या मिळे। देवप्रीति॥ ९॥

तयाच्या विषयीं। विचार मानसी॥
येतां आनंदासी। पूर येत॥ १०॥

वाटे स्वर्गीं जातां। मर्त्य लोकांहुनि॥
तया मी लोचनीं। पाहतसे॥ ११॥

दूत आनंदानें । येताति भेटाया ॥
स्वर्गीं त्या न्यावया । भक्त राजा ॥ १ २ ॥

हर्षनादें सर्व । स्वर्ग दणाणत ॥
आनंद सर्वत्र । सर्वत्रांसी ॥ १ ३ ॥

------------

## पाळणा

*ज्ञानोदय, २३ फेब्रुवारी १८९४*

जो जो जो जो रे । प्रिय बाळा
हालवि माता । तुजला ॥ ध्रु. ॥

निद्रा करिं सखया । वेल्हाळा
रक्षी ईश्वर । तुजला ॥ १ ॥

वस्त्रें, अन्न, सुखें । पुरवीती
आप्त तुझे तुज । प्रीती ॥ २ ॥

ईश्वरसुत आला । जगतांत
निजला तै । गोठ्यांत ॥ ३ ॥

चारा ढोरांचा । पसरून
केलें आंथ-रूण ॥ ४ ॥

त्यावरि सृष्टीचा । प्रभु निजला
अज्ञ पशू । बाजूला ॥ ५ ॥

तारक तव झाला । बहुकष्टी
बालपणीं । या रीती ॥ ६ ॥

चांगली त्याहूनी । तरि किती
आहे बा तव । स्थिती ॥ ७ ॥

तुझा बिछाना । मऊ मऊ
नाहीं जवळीं । बाऊ ॥ ८ ॥

परि तव प्रिय माता । तुज जवळीं
बैसुनि पालख । हलवी ॥ ९ ॥

मोठा होशिल तैं । प्रिय बाळा
प्रभुसी स्मर । वेल्हाळा ॥ १० ॥

तुजला ताराया । आपुला
प्राण तयानें । दिधला ॥ ११ ॥

प्रभुनें रक्षावें । वाढवावें
तुजला तारण । द्यावें ॥ १ २ ॥

विनंति आमुची ही । प्रभुपाशीं
होईल बा प्रति-दिवशीं ॥ १ ३ ॥

शिणली हालवितां । तुज माता
चुंबी तर निज । आतां ॥ १ ४ ॥

------------

## ख्रिस्त हा मशीहा

*उपासनासंगीत*

योहान ४:२६

तोच ख्रिस्त बोलतसे। आजि तुशीं, बाई॥
वाट पाहतात संत। ज्याचि सर्वदाही॥ ध्रु.॥

आत्मरूप ईश, त्यास। दृश्यरूप नाहीं॥
विद्यमान सर्व ठायिं। भरुनि दिशा दाहीं॥ १॥

प्रेमयुक्त भक्ति त्यास। मान्य सर्व ठायीं॥
उच्च नीच भेद मुळीं। तेथ कांहिं नाहीं॥ २॥

शरण रिघे पापि तरी। चरणिं ठाव देई॥
करुनि त्यास पापक्षमा। मायबाप होई॥ ३॥

दास म्हणे ईशचरण। प्राप्ति मला होई॥
करुनि कृपादान असें। मजशिं, प्रभो, देईं॥ ४॥

------------

## आशोत्पादक पवित्र शास्त्र

*उपासनांगीत*

**अभंग**

जीवनाचीं फळें सुखदायक हीं।
तव शास्त्रीं पाहीं दीसताती ॥ १ ॥

माझी आवडती सर्वही संपत्ति।
असो, जगत्पती, शास्त्र तूझें ॥ २ ॥

तव शास्त्रीं माझें सुख समाधान।
होती सर्व पूर्ण मनोरथ ॥ ३ ॥

तैसा सर्व माझ्या आशेचा उद्‌गम।
सुमंगलधाम, शास्त्रीं तूझ्या ॥ ४ ॥

मरूनीयां केलें प्रायश्चित्त ख्रिस्तें।
सर्व मानवांतें तारावया ॥ ५ ॥

आनंदाची वार्ता शास्त्रीं ही तुझीया।
नसे, देवराया, अन्य ग्रंथीं ॥ ६ ॥

शास्त्राचें पठण, श्रवण, मनन।
हर्षें करो मन सदा माझें ॥ ७ ॥

------------

## पवित्र शास्त्राचें श्रेष्ठत्व

*उपासनासंगीत*

**अभंग**

देवराया, तुझीं थोर कार्यें आम्ही।
पाहतों नेहमीं चहूंकडे॥ १॥

अंतरंग कोंदे आश्चर्यें आमूचें।
मुखानें स्तुतीचें गान नीघे॥ २॥

तरी तव ज्ञान, दया आणि बळ।
शास्त्रीं हीं सोज्वळ दिसताती॥ ३॥

असंख्य जे तारे नभांत असती।
गति संभाळिती अपुलाली॥ ४॥

तयांसी पाहतां बहु ज्ञान आम्हां।
तुझें, मंगलधामा, होय नित्य॥ ५॥

परी तव शास्त्र आम्हां सांगतसे।
स्वर्गीं जावें कैसें चढूनीयां॥ ६॥

देवा, तव शास्त्र मजला शिकवीं।
अपराध दावीं माझे मज॥ ७॥

------------

## दिव्य त्राता सत्य गुरू

*धर्मतुला*

**पद**

(चाल - रामचंद्र नाहीं घरीं इ.)

दिव्य त्राता सत्य गुरू । येशू हा खरा ॥
कोणी मुक्तिदाता नाहीं । जगीं दूसरा ॥ ध्रु.॥

देव बापें फार प्रीति करुनि आपला ॥
पुत्र देऊनियां पहा लोभ दाविला ॥
दोषी नसूनियां खलांहातीं सोंपला ॥
प्राण देऊनियां  त्यानें न्याय राखिला ॥ १ ॥

दुष्टांसाठीं प्राण ख्रिस्तें दीधला अहा ॥
न्याय दया ईश्वराची पूर्ण हीं पहा ॥
वार्ता ऐकतांच व्हावा तोष तो महा ॥
सर्व पापियांनों त्राता येशू ख्रिस्त हा ॥ २ ॥

ईश्वराचें आत्मरूप येशू हा असे ॥
कोणी शुद्धभावें त्यासी शरण येतसे ॥
पापक्षमा दत्त पुत्रपण देतसे ॥
आणि प्रभू येशू त्याचा मित्र होतसे ॥ ३ ॥

सर्व लोकांप्रती म्हणे तो कृपानिधी ॥
अहो पापीयांनों मला शरण या अधीं ॥
मुक्तिदाता आणि खरा देव हा सुधी ॥
तारणाचा सेतु येशू या भवांबुधी ॥ ४ ॥

------------

## ख्रिस्त हाच तारक

### पद

तारक ख्रिस्त खरा।
या जगीं तारक ख्रिस्त खरा॥ ध्रु.॥

पाप्यांसाठीं त्यागुनि स्वर्गा।
झाला गार हिरा॥ १॥

लोकां सांगे, सर्वहि ढोंगें।
त्यागुनि सत्य धरा॥ २॥

मानवला तो नच लोकांना।
नसुनी दोषि जरा॥ ३॥

द्वेषानें त्या मारविलें तैं।
कंपित झालि धरा॥ ४॥

तिसरे दिवशीं उठला पुढती ।
झाला लेख पुरा॥ ५॥

होता जगतीं बोधितसे तो।
देवाविषयिं बरा॥ ६॥

पाप्यांनो, या ओळखुनीयां।
याचे चरण धरा॥ ७॥

------------